शनिवार । १३ डिसेंबर १९८० । एक रुपया

# माणूस




## शेतकरी आंदोलनाचा पहिला बळी...

" इथला एक तानाजी मालुसरा आज गेला. पण उद्या आपल्यातूनच शेकडो तानाजी मालुसरे तयार होणार.... ही लढाई चालू राहणार. या लढाईचा शेवट ठरलेला आहे. आपल्या धर्मात सांगितल्याप्रमाणे ज्या दिवशी सत्याचा विजय होईल– त्याच दिवशी ही लढाई संपेल. "

–शरद जोशी

पृष्ठ....१९

## याशिवाय...

आठव अण्णांचा

पृष्ठ....३

## पुणे वार्ता

# पुनश्च एकदा नामांतर आंदोलन

शनिवारचीच गोष्ट. पुण्यातल्या ससून हॉस्पिटल रस्त्यावरची वर्दळ सकाळी ७ पासूनच वाढतीये. समोरचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान आज कधी नव्हे ते माणसांनी भरून गेलेलं. डॉ. आंबेडकरांचा निर्वाणदिन साजरा करण्यासाठी ही सारी माणसं जमली होती. या दिनानिमित्तानेच मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराची मागणी पुन्हा एकदा जोरदारपणे करायची अशा इराद्याने नामांतरवादी कृतिसमितीने दिवसभर धरणाचा कार्यक्रम आखला.

उद्यानाला हळूहळू जत्रेचं स्वरूप प्राप्त होऊ लागलं. हे स्वरूप अलीकडे क्वचितच आढळून येणारं. कुणा नेत्याच्या निर्वाणदिनी एवढी गर्दी- हे विशेष खरं; पण या निमित्ताने अस्मितेची पुनश्च जाणीव होत आहे हे अधिक विशेष.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराची मागणी शरद पवाराच्या कारकीर्दीत प्रथम मांडण्यात आली. त्यासाठी मराठवाडा पेटून उठला; पण हाती फारसं पडलं नाही. आता अंतुलेसाहेब तर काय नावं बदलण्यात भलतेच यशस्वी झालेले दिसतात! कुणाच्याही, कोणत्याही तलवारीला 'भवानी' म्हणणे किंवा कुलाबा जिल्ह्याला 'रायगड' म्हणणे व तसे म्हणायला भाग पाडणे या अंतुलेंच्या कृती पाहिल्या म्हणजे मग मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराबाबत त्रास होईलसं वाटत तरी नाही !

पुण्यातल्या या उपोषण, सत्याग्रह, धरणे या कार्यक्रमात एकूण १३१ जणांना अटक करण्यात आली. सकाळी निदर्शनापूर्वी प्रा. गं. बा. सरदार याच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जाहीर सभेत बोलताना श्री. नानासाहेब गोरे अगदी ठणकावून बोलले. ते म्हणाले, "कुलाबा जिल्ह्याला रायगड हे नाव एका क्षणात दिले जाऊ शकते; पण विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव देण्याच्या मागणीवर हजारो दलितांची घरे जाळली जातात याची आपण दखल घेतली पाहिजे ! दिवसेंदिवस जाती-जमाती संघटित होत आहेत त्यामुळे दलिताचा लढा लाब पल्ल्याचा होणे अपरिहार्य आहे. वरिष्ठ जातीना खुष ठेवण्याच्या प्रयत्नात शासन नामांतराबाबत करीत असलेली चालढकल खपवून घेणे कठीण जाणार आहे !"

नानासाहेबासारख्या विचारवंताने नामांतराबाबत आपली भूमिका पुन्हा एकदा सुस्पष्टपणे माडली. जनता-डावी आघाडी याच्या राजवटीत जनतावाल्याची मोठीच कुचंबणा झाली होती,आता मात्र ते सरकार-विरोधी (आणि नि:पक्षपाती) धोरण कडक शब्दात मांडू शकतात.

नामांतरासाठी लढा उभारण्यात यावा या मागणीसाठी लांब पल्ल्याच्या लढ्यासाठी डॉ बाबा आढाव यांनी नेतृत्व करावे अशी सूचना खोब्रागडे गटाचे नेते श्री. व्ही. एस. माने यानी केली. त्याला उत्तर देताना, आढावानी प्रथम समतेवर विश्वास ठेवणारे सर्वजण एकत्र आल्याबद्दल आनंद व्यक्त केला. रिपब्लिकन पक्षाचे भारतीय पातळीवर गट, तुकडे (तुकडे !) झाले. त्यामुळे अ. भा. रिप. पक्ष यापुढे पुन्हा नेत्याचे नाव...शॉर्ट फॉर्म तरी किती करायचा) जनता पक्षाचंही काही वेगळं झालं नाही; पण आढावांना ही गंमतच वाटली असावी. एवढी सगळी छकलं एकत्र येतात म्हणजे काय ?

ते म्हणाले, "आबेडकरी विचाराच्या लोकानी आपसात लढण्याऐवजी एकत्र येऊन हा लढा पुढे न्यावा. मागील वेळी आम्ही जे कमावले ते वाटाघाटीत गमावले. त्यामुळे आजच्या एकजुटीचा विचार केला पाहिजे.

गेल्या वर्षी लाँग (लाँग) मार्चनंतर आम्ही, गवई, खोब्रागडे, कांबळे, पँथर्स वगैरे नेत्यांसह सरकारशी तीन महिने बोलणी करत होतो; पण सरकारशी बोलणी करताना दलित नेत्यांची तोंडे विभिन्न दिशेने असायची. आमच्यातील मतभेद सरकारला उपयोगीच पडायचे.'

प्रा. गं. बा. सरदारांनी आपला मुद्दा नेहमीप्रमाणे स्वच्छपणे मांडला. नामांतराचा प्रश्न हा केवळ एका विद्यापीठाची पाटी बदलण्याचा प्रश्न नसून लोकशाही जीवनाची प्रतिष्ठा जपण्याचा व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा तो झगडा आहे. घटनेने व कायद्याने मान्य केलेला सामाजिक न्याय दलितांना मिळवून देण्याच्या बाजूने शासन उभे राहाणार आहे की ती परिस्थिती कायम ठेवू इच्छिणाऱ्या विषमतावाद्यांच्या बाजूने उभे राहाणार असा खडा सवाल प्रा. सरदारांनी केला.

या सभेत उत्तमराव पाटील, ठकसेन पाडळे, एल्. डी. भोसले, सौ. वसुधा सरदार, व्ही. एस. माने इत्यादींची भाषणे झाली. सत्यशोधक समाज, रिपब्लिकन पक्ष, दलित पँथर, हराळे वैष्णव समाज, रिप. खोब्रागडे गट, उजवा कम्युनिस्ट पक्ष, जनता पक्ष एवढ्या संघटनांनी-गटानी या नामांतराबाबत एकत्र व्हावे ही घटना आश्चर्यकारकच म्हणायला हवी. एक दिवस, एका कार्यक्रमासाठी, एका मागणीसाठी हे सारे


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : विसावे**

**अंक : अठ्ठाविसावा**

**१३ डिसेंबर १९८०**

**किंमत : एक रुपया**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

गट एकत्र आल्याचे हे चित्र आशादायी आहे.

सभेनंतर कृतिसमितीच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कचेरीसमोर धरणे धरले. संध्याकाळी जिल्हाधिकाऱ्याना द्यावयाच्या निवेदनावर नागरिकाच्या सह्या घेण्याचे काम दिवसभर चालू होते. निवेदनात म्हटले होते की, 'समताविरोधी चळवळीना दबून शासनाने नामांतर ठरावाची अमलबजावणी करण्यात टाळाटाळ चालविली असून त्यामुळे या देशात आपल्याला न्याय मिळणार नाही अशी दलितामध्ये भावना निर्माण झाली आहे. या प्रकरणी शासन व सर्वच राजकीय पक्ष हतबल झाले असून लोकशाही, समतावादी नागरिकाना संघटित चळवळी करण्यावाचून गत्यतर राहिलेले नाही. नामांतर होईपर्यंत स्वस्थ न बसण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे !

मराठवाडा आदोलनाबाबत पुण्यासारख्या शहरी भागातील दलितनेत्याची ही जागरूकता यापुढील काळातील आंदोलनाला कोणती दिशा देणार ? हा प्रश्न आता उभा आहे, पण आंदोलनाची ठिणगी पडल्याचे आज तरी दिसते यात शंका नाही. ¤

## हिंदुस्थानपुढील समस्या

के. श्री. बन्सीलाल रामनाथ अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्टतर्फे गेल्या वर्षापासून व्याख्यानाचे ज्ञानसत्र चालवण्यात येत आहे. गरीब शाळकरी मुलाना मदत, वैद्यकीय सेवा इत्यादीसारखीच ज्ञानसत्रे चालवणे हीसुद्धा एक प्रकारची समाजसेवाच आहे असे म्हणायला हरकत नाही. एखाद्या व्याख्यानाने प्रश्नांची उकल जरी धाडकन झाली नाही तरी ते ते विषय लोकाच्यासमोर येतात, कळत-नकळत चर्चा होते हेही नसे थोडके—

या वर्षी तिसऱ्या दिवशीचे वक्ते भारताचे माजी राजदूत बॅ. आप्पासाहेब पत याच्याकडे 'हिंदुस्थानपुढील समस्या' हा विषय होता.

आपल्या देशात व देशाशी निगडित इतक्या अगणित समस्या आहेत की हा 'समस्यांचा देश' म्हणावयास हरकत नाही. बॅ. पंतानीही हे प्रथमच मान्य केले आणि महत्त्वाच्या आतरराष्ट्रीय व अंतर्गत सामाजिक समस्या असा विषय त्यांनी निवडला

आतरराष्ट्रीय समस्याकडे सामान्य माणूस 'मला काय त्याचे' अशा नजरेने बघतो. कुठलीही आतरराष्ट्रीय घडामोड अथवा समस्या ही त्या त्या देशाच्या सरकाराचीच नसून त्या प्रत्येक घटनेचा सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होतोच, असे बॅ पंत यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. या क्षेत्रात ते अनेक दशके वावरले असल्याने या एकाच विषयावर ते बराच वेळ बोलू शकले असते; परंतु त्यानी अमेरिका व रशिया हे दोन 'लोकप्रिय' देश निवडून यासंबधी विवेचन केले हे बरे झाले.

अमेरिका-रशिया ही दोन राष्ट्रे काय किंवा विविध हितसबंधी गट काय, या लोकांची सत्तास्पर्धा काही काळ बाजूला ठेवली तर जी स्पर्धा उरते ती 'संपत्ती'साठी आहे आणि ती जास्त जीवघेणी आहे. तेल, खनिजे, बाजारपेठा जास्तीत जास्त काबीज करण्यासाठी ही स्पर्धा आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती ही विशिष्ट भागातच केंद्रित झाली आहे आणि गेली कित्येक वर्षे हे मोठे देश व गटच त्यांचा उपयोग करीत आहेत. ज्या संपत्तीचा उपयोग जगातल्या सर्वांच्या सुखासाठी करता येईल त्या सपत्तीचा हे दुरुपयोग करीत आहेत; पर्यायाने हे देश गुन्हेगार आहेत.

उदाहरणादाखल त्यांनी एक जरा जुना किस्सा सागितला. इराणकडून तेल घेऊन त्याच्या बदल्यात इराणमध्ये अमेरिकेने बांधकामे वगैरे करून दिली निक्सन-राजवटीत २२ अब्ज डॉलर्सची शस्त्रे तेलाच्या बदल्यात इराणला देण्यात आली. या असल्या व्यवहारामुळे छोटचा आणि विकसनशील राष्ट्राची अर्थव्यवस्था कोलमडते. (असे न्हावे हीही 'बडयां'ची इच्छा असतेच.)

हिंदी महासागरात जी या प्रकारच्या संपत्तीसाठी मारामारी चालू आहे, भू-प्रदेशांची वाटणी करण्याचे जे बेत चालू आहेत त्याविषयी भारत काय करू शकतो ?

दुसरे एक असे की, रशिया व चीन हे दोघेही आपले शेजारी एकमेकाचे कट्टर विरोधक आहेत येत्या काही दशकांत त्याचे एकमेकाशी पटण्याचा सुतराम संबंध नाही आणि पटू लागल्यास अमेरिका, जपान वगैरे देश तसे घडू देणार नाहीत. अशा परिस्थितीत भारत दोघाशीही मैत्री ठेवू शकेल का ? रशियाला जवळ करावे तर चीन काही तरी गडबड या ना त्या मार्गाने उडवतो. सर्वांशी मैत्री असावी हे भारताचे एक स्वप्न आहे; पण वस्तुस्थिती तशी नाही. मैत्रीचा पाया सहकार्य आहे चीन व भारत यांमध्ये कुठल्याच बाबतीत सहकार्य नाही. दोघाचीही प्रगती वेगळया पातळयावर व वेगळया पद्धतीने झाली. त्यामुळे या दोघात सामंजस्य नजीकच्या काळात निर्माण होण्याची शक्यता कमीच.

बरे, अमेरिकेच्या समोर आपण दुर्बळ पडतो. भारतावर कोणत्याही मार्गाने नियंत्रण कसे मिळवता येईल हा अमेरिकेचा विचार.

तेव्हा या सर्व वस्तुस्थितीचे बुद्धिनिष्ठ विवेचन करूनच ही आतरराष्ट्रीय समस्या सोडविली पाहिजे.

देशाच्या बहुतेक सर्व अंतर्गत समस्याचे मूळ हे भारतीय समाजाच्या मानसिक जडणघडणीमध्ये आहे असे बॅ. पंत यांना वाटते. त्याच्या मते आम्हा भारतीयाना स्वप्नांमध्ये किंवा आभासमय (Illusious) जगतात राहणे आवडते. ही भूमी देवदेवताची, त्याचे आम्ही वंशज ही भावना मनातून जात नाही. मग जर आपण एवढे थोर किंवा सुपर मानव आहोत तर मग आपल्या समाजात हे संघर्ष का ? हा विचार आपण कधीच करत नाही. आपल्या देशाच्या समाजाकडे पलायनवाद व स्वप्नवाद यापासून अलिप्त राहून पाहिले पाहिजे.

हे युग यंत्रयुग आहे. या युगात रहाण्यासाठी हवी आहे सुबुद्धता (Intelegance), समर्थता (Competance) आणि सहिष्णुता किंवा सहानुभूती (Companions) यंत्रयुगाचे नियम आणि संयम पाळले तरच या युगात टिकाव धरणे शक्य होईल.

भारतीयाची बुद्धी व समर्थता ही सरंजामशाही मध्ययुगीन आहे. उच्चनीचता, सरकारवर पूर्ण विश्वास, 'आम्ही राजाची चाकरी करावी त्यान आम्हाला भाकरी द्यावी' हे विचार अत्यंत पुराणे आहेत. नव्या युगात शिस्त नाही म्हणून भरपूर उत्पादन नाही. मग 'सर्वांना सर्व काही' हे कसे साध्य होणार ? समाजाचा अव्यवस्थितपणा कसा जाणार ? नव्या युगाचे नियम व शिस्त शिकवायला शाळेतूनच सुरुवात केली पाहिजे.

दुसरे म्हणजे राष्ट्राच्या उभारणीत, प्रत्येक व्यक्तीचा काही ना काही वाटा असतो हे भारतीय पूर्ण विसरून गेले आहेत. प्रत्येक समस्या सरकारनेच किंवा नोकरशाहीनेच सोडवावी हे कसे शक्य आहे ? अनेक गोष्टीची उकल विचारविनिमयाने व परस्पर सामंजस्याने होऊ शकते हा विचार लोकांनी आपल्या मनात रुजवलाच पाहिजे.

(पण हे लक्षात कोण घेतो ? सरकार कृपया इकडे लक्ष देईल काय ?)

—प्रतिनिधी

# भागलपूर

## मानवी मूल्ये कोठे गेली ?

वा. दा. रानडे

भागलपूरच्या घटना वाचल्या म्हणजे पहिला प्रश्न मनात येतो माणसे माणसांशी असं वागू शकतात ? पण आता हा प्रश्न राहिलेला नसून या घटनांसंबंधी जी माहिती हळूहळू बाहेर येत आहे त्यावरून हे एक क्रूर, अमानुष सत्य आहे हे उघड झाले आहे. माणसाला माणूस म्हणून आम्ही वागविणार की नाही ? माणुसकीची, मानवी मूल्याची कदर ठेवणार की नाही ? हा या घटनेच्या मुळाशी असलेला मुख्य प्रश्न आहे. भागलपूर तुरुंगात पोलिसानी केवळ कच्च्या कैदेतील कैद्यांचे डोळे काढलेले नाहीत तर माणुसकीचेच डोळे काढले आहेत!

पोलिसानी डोळे काढले म्हणून केवळ पोलिसांवर या घटनेचे खापर फोडून आपण मोकळे होऊ शकत नाही. असे अमानुष, क्रूर प्रकार करण्यास ते कसे निर्ढावले ? आरोपीकडून कबुलीजवाब घेण्यासाठी पोलिस त्यांचा छळ करतात. डोळे काढणे हा त्या छळाचाच एक प्रकार. आरोपीचा असा अमानुष प्रकारे छळ करणे कायमचे थाबले पाहिजे ! कायद्याच्या भाषेत 'थर्ड डिग्री मेजर्स' असे या छळाला नाव आहे. पोलिसानी या मार्गाचा अवलंब करू नये अशा सूचना त्यांना आहेत तरीही हे मार्ग अवलंबिले जातात आणि त्या बाबतीत कारवाई करण्याकडे दुर्लक्ष केले जाते म्हणूनच असे प्रकार करण्यास पोलिस निर्ढावले आहेत. आरोपीना कबुलीजबाबासाठी त्यांनी मारहाण केल्याच्या बातम्या मधूनमधून येतात. आरोपीनी कोर्टाकडे तक्रार केली तरच हे प्रकार उजेडात येतात; पण तसे धैर्य फारच थोडे आरोपी दाखवितात. कैद्यांचे डोळे काढणे हा मात्र छळाचा कळस आहे गुन्हेगारीच्या इतिहासात हा मार्ग अवलंबिण्यापर्यंत पोलिसाची मजल गेल्याचे प्रथमच दिसत आहे .

पोलिसानी ज्याचे डोळे काढले त्यात खून,-दरोड्यांचे आरोप असलेले सराईत गुन्हेगार आहेत. त्याचे गुन्हे गंभीर असतील, त्याबद्दल कोर्टात कायद्याप्रमाणे त्यांना काय व्हावयाची ती शिक्षा होईल; पण ही शिक्षा करण्याचा अधिकार पोलिसाना कोणी दिला ? कायदा हाती घेण्याचा अधिकार नागरिकांना नाही तसाच तो पोलिसानाही नाही, पण हा विवेक पोलिसाना राहिला नाही तसाच भागलपूरच्या नागरिकानाही राहिलेला दिसत नाही. डोळे काढण्याचे प्रकरणी पंधरा पोलिसअधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले त्यांच्या विरुद्धची ही कारवाई रद्द व्हावी यासाठी पोलिससंघटनेतर्फे भागलपूर बंद पाळण्यात आला. त्यात तेथील नागरिकही सहभागी झाल्याची बातमी आहे नागरिकाना पोलिसांनी केले ते योग्यच वाटते असा याचा अर्थ होतो. लोकांची अशी प्रतिक्रिया का व्हावी ? डोळे काढण्याचा प्रकार त्यांना अमानुष वाटत नाही का ? अट्टल गुन्हेगारांना त्यानी सहानुभूती दाखवावी असे कोणीच म्हणणार नाही पोलिसानी त्यांचे डोळे काढून त्याना शिक्षा दिली हे बरेच झाले अशी त्याची सुप्त प्रतिक्रिया असल्याचे दिसते. ही प्रतिक्रिया चुकीच्या दिशेने असेल पण त्यामागील मनोवृत्तीही आपण समजून घेतली पाहिजे. हल्लीच्या न्यायदानपद्धतीतील दिरंगाईबद्दलची ती प्रतिक्रिया आहे अट्टल गुन्हेगारांना त्वरित आणि जरब बसेल अशी शिक्षा व्हावी असे सामान्य नागरिकाना वाटते आणि सध्याच्या न्यायालयात ती लवकर मिळत नाही आणि कित्येकदा कायद्यातील पळवाटाचा फायदा मिळून आरोपी निर्दोषी सुटतात हा त्याचा नित्याचा अनुभव आहे. अट्टल गुन्हेगाराना त्वरित शिक्षा झालेली पाहून त्यांना सुप्त समाधान झाले ही शिक्षा पोलिसांनी केली, ती अमानुष होती, त्यांना ती करण्याचा अधिकार होता की नाही या प्रश्नांचा विचार करीत बसण्याची त्याना सवड नाही. नागरिकाची ही मनोवृत्तीही विचारात घेतली पाहिजे आणि न्यायदान त्वरित होण्यासाठी अविलंब उपाय योजायला हवेत. तसे न झाल्यास कायदा हाती घेण्याची आणि तसे कोणी केल्यास त्याची बाजू घेण्याची प्रवृत्ती वाढत जाण्याचा धोका आहे ही प्रतिक्रिया चुकीच्या दिशेने आहे. त्याबद्दल नागरिकाचे शिक्षण करायला हवे.

पोलिस माणुसकीला पारखे होणार नाहीत तसेच पोलिस व इतर दलात माणुसकीबद्दल कदर असणारी माणसे अधिक संख्येने कशी जातील यासाठी प्रयत्न करायला हवेत असा विचार या प्रश्नावरील लोकसभेतल्या चर्चेत भाग घेताना पंतप्रधान श्रीमती गांधीनी मांडला; पण केवळ पोलिसापुरताच असा विचार करणे पुरेसे नाही. पोलिसामध्ये ही अपप्रवृत्ती आली कशी ? एकूण समाजामध्ये माणुसकीच्या मूल्याबद्दल कदर राहिलेली नाही त्याचा हा परिणाम आहे. तेव्हा समाजामध्येच या मूल्याबद्दलची जाणीव आणि ती जपण्याबद्दलची जागरूकता बाणवायला हवी. पक्षनिरपेक्षप्रवृत्तीने हे काम करायला हवे. खून, दरोडे यासारख्या गंभीर गुन्ह्याचे आरोप असलेले आरोपी न्यायालयात त्याच्या खटल्यांचा निकाल लागून शिक्षा होईपर्यंत निर्दोषीच मानायला हवेत. त्यांचा कोणत्याही प्रकारे छळ न होता त्यांना माणुसकीची वागणूक मिळायला हवी. ही वृत्ती नागरिकामध्ये आणि त्याहीपेक्षा अधिक प्रमाणात पोलिसांमध्ये बाणवायला हवी. कारण आरोपीशी नागरिकापेक्षा पोलिसांचाच संबंध अधिक येतो हे खरे. तरीही समाजाच्या सर्वच थरात ही जाणीव वाढायला हवी आणि त्या बाबतीत अधिक जबाबदारी निरनिराळ्या क्षेत्रात जबाबदारीच्या जागांवर काम करणाऱ्या माणसाकडे येते. त्यांनी ढिलाई केली, दुर्लक्ष केले तर असे प्रकार वाढत जातात आणि यात काही गैर नाही अशी मनोवृत्ती त्यातून वाढत जाते आणि तिच्या समर्थनाची प्रवृत्ती बळावते.

डोळे काढण्याचा पहिला प्रकार ऑक्टोबर १९७९ मध्ये घडला. तेव्हापासून वर्षभर हे प्रकरण अंधारात कसे राहिले ? देशात लोकसभेच्या व नंतर विधानसभेच्या निवडणुका झाल्या. त्यात कोणत्याच राजकीय पक्षाने हे प्रकरण कसे उपस्थित केले नाही ? की सर्वच पक्षांचे यात काही हितसंबंध गुंतले असल्याने त्यानी मौन राखले ? एकाही वार्ताहराला या प्रकरणाचा सुगावा कसा लागला नाही ? कैद्यांचे डोळे काढल्याने त्यांची दृष्टि गेली पण बाकीच्यांची दृष्टि तर शाबूत होती ना ? हा केवळ गाफीलपणा होता की जाणूनबुजून या घटनेकडे काणा डोळा करण्यात आला ? सरकारी यंत्रणा आपल्याविरुद्ध काही कारवाई करणार नाही याची खात्री असल्यानेच पोलिस असे अमानुष प्रकार करण्यास धजावले. बिहारचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स यानी गेल्या सप्टेंबरात सरकारला एक अहवाल पाठविला होता; पण काहीच कारवाई न होता तो धूळ खात पडला हा केवळ गाफीलपणा नसून प्रकरण दडपण्यासाठी केलेली ही हेतुपूर्वक दिरंगाई आहे असा सशय येतो. ८५ कैद्यांचे डोळे काढले गेल्याच्या अनधिकृत बातम्या आहेत; पण तुरुंगात कोणाही कैद्याचे डोळे पोलिसानी काढलेले नाहीत असा दावा बिहारचे मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्र अजूनही करतात ! पोलिसाच्या बचावाचा हा पवित्रा त्यांनी कशासाठी घेतला आहे ? न्यायालयीन चौकशीला सरकार नकार का देत आहे ? या प्रकरणी खटले भरण्याचा देखावा करून पुराव्याअभावी सबधित पोलिसअधिकारी निर्दोषी सुटतील असे प्रयत्न होण्याचीही शक्यता आहे हे प्रकरण दडपले जात नाही. चौकशीची केवळ रगसफेदी होत नाही. याबद्दल न्यायाची व मानवी मूल्याची आस्था बाळगणाऱ्या सर्वांनीच जागरूक असायला हवे आणि या प्रकरणी न्याय मिळेपर्यंत शेवटपर्यंत ते धसास लावायला हवे. तसेच असे प्रकार पुनः घडणार नाहीत यासाठी कायद्यातच तरतूद करायला हवी. □

ग. दि. मा – तिसरा स्मृतिदिन

१४ डिसेंबर १९७७



# आठव अण्णांचा

भीमराव कुलकर्णी

भर दुपारची वेळ होती. कपडे करून मी बाहेर जाण्याच्या तयारीत घराबाहेर उभा होतो. एवढ्यात पोस्टमनने एक पत्र हाती दिले. मी ते तत्परतेने उघडले. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे ते पत्र होते.

अखंडित लक्ष्मी अलंकृत श्रीमान राजश्री
भीमरावजी कुलकर्णी
प्रती स्नेहांकित बाबासाहेब पुरंदरे
सप्रेम दंडवत, विज्ञापना...'

मी भराभर पत्र पुढे वाचत गेलो. अण्णा माडगूळकरांचे गीतरामायण मराठीत अवतीर्ण झाल्याला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल एक ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा मानस बाबासाहेबांनी व्यक्त केला होता. त्या ग्रंथामध्ये एक लेख लिहिण्यासाठी मला अगत्याची सुपारी पत्ररूपाने पाठविण्यात आली होती.

मी तसाच घरी आत आलो आणि भावनावेगातच त्यांना उत्तर लिहिले,

'श्रीमत् सकल तीर्थस्वरूप राजप्रिया विराजमान
स्वामी बाबासो. पुरंदरे वडिलांचे सेवेशी–
अपत्ये भीमराये दंडवत विनंती उपरी...'

वडिली आशीर्वादेकरून आम्हाशी आज्ञापत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले. आमचे थोरले पिते तीर्थरूप कैलासवासी अण्णास्वामींनी लिहिले. गीतरामायण पोथीनिमित्ते रजतमहोत्सवसोहळा वडिली योजिला असे. तत्कारणे बालकासी चार शब्द लिहावयाची केली आज्ञा ऐकून परम संतोष जाहला. स्वामींची आज्ञा आम्हास सर्वथा प्रमाण असे, तीर्थरूप अण्णास्वामींचा सर्व गोष्टींचा स्वामीस उचित अभिमान. सदरहू कार्यास आमचाही हातभार लागावा ही मनींची अभिलाषा स्वामींच्या कृपाप्रसादेकरून सुफल संपूर्ण होईल हा दृढ विश्वास. आम्ही आमच्या लघुबुद्धीसामर्थ्ये गीतरामायणास अर्घ्य अवश्यमेव अर्पण करू. अभ्यासे करून यथावकाश स्वदस्तूरचा लेख पाठवू.

स्वामींनी मनावर घेतले ते कार्य यश पावेलच. यश येते ते स्वामींच्याच पुण्यप्रतापेकरून येते. वरकड केवळ निमित्त मात्र.

स्वामींनी आमचे अगत्य असो द्यावे, ही प्रार्थना.

सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

राजते लेखनावधि
भीमराव कुलकर्णी

पत्र लिहून मी ते लगेच पोस्टात टाकले आणि घरी येऊन खूप वेळ अस्वस्थचित्त होऊन बसून राहिलो. अण्णांच्या आठवणींनी मनात गर्दी केली. बाबासाहेबांचे पत्र आल्यावर ज्या ऊर्मीने मी पत्राला उत्तर लिहिले, तिच्यामागच्या मनोभूमिकेचा मी जसजसा विचार करू लागलो, तसतसा अण्णांच्या सान्निध्यातल्या आठवणींचा पट आणखीनच उलगडत गेला. पाण्याच्या प्रचंड झोताबरोबर आपण वाहवत जावे, तशी माझी स्थिती झाली.

अण्णांच्या सान्निध्यात आल्यानंतर दरखेपेस एक गोष्ट प्रकर्षाने जाणवायची की, 'देणे ईश्वराचे' या जातीचा हा एक कलावंत आहे. असा अनुभव साऱ्याच श्रेष्ठ साहित्यिकांसंबंधाने येत नसतो. किंबहुना तो अण्णांसारख्या एखाद्याच व्यक्तीबाबतीत येत असतो म्हणून त्याला विशेष महत्त्व असते. अण्णांच्या सहज साध्या लिहिण्यात, गद्यांत किंवा अनौपचारिक बोलण्यातही एक उत्स्फूर्त अशी प्रतिभेची झळाळी असे. पक्ष्याने सहजगत्या आकाशात झेप घ्यावी आणि डौलदार आवर्तने घेऊन पुन्हा ऐटीत अवती–भवती पाहत लीलेने पुन्हा मूळच्या जागी येऊन बसावे, त्याप्रमाणे अण्णांचे बोलणे-लिहिणे असे. एखाद्या मार्मिक आणि ध्वनियुक्त शब्दाने अण्णांचे बोलणे एकदम वेगळे, उंचीवर गेल्यासारखे वाटायचे. शब्दांच्या, वाक्यांच्या भरदारपणावर, नेमकेपणावर, अर्थसघनतेवर अण्णांची नेहमीच हुकमत असायची. लय नसलेल्या अनिश्चिततादर्शक आणि नीरस

वाक्यांनी ते अस्वस्थ व्हायचे. मराठीतल्या नववाङ्मयाने म्हणून त्याच्या मनाची केव्हाच पकड घेतली नाही. समृद्ध आशयघनता, ध्वन्यर्थकता आणि कमालीची लयबद्धता याचे त्याना मनापासून आकर्षण होते. अण्णांना आपल्या या सामर्थ्याची पुरेपूर जाणीव होती आणि दुसरीकडे जीवनाच्या धकाधकीत आयुष्य भरकटत चालल्याची त्याना एक विलक्षण खंत होती. या विषयासबंधी त्याचे माझे जे अनेक वेळा संवाद झाले, त्यातून ती मला नेहमीच दिसून आली. आपणाला फारसे शिकता आले नाही, इंग्रजी टीकावाङ्मय वाचून आजकालची पोरे काहीही तोंडावर फेकून आम्हाला नॉनप्लस करू पाहतात, असे त्यांना वाटे. त्यांच्या बोलण्यामध्ये असे 'नॉनप्लस', 'डिफिडंट' वगैरे शब्द नेहमी यायचे. अत्यंत शुद्ध, प्रासादिक बोलणाऱ्या अण्णाच्या बोलण्यातील हे इंग्रजी शब्द नेहमीच खटकायचे.

त्याना व्याख्यानाला बोलवायचे म्हणजे त्याच्या एका विशिष्ट युक्तिवादाला नेहमी तोंड द्यावे लागायचे.

'आम्ही काय खेडवळ माणसं. तुमच्या त्या एस्‌फ्यास्‌वाल्या पोरापोरींसमोर बोलाया भ्या वाटतंय गड्या.' ते गंमतीने म्हणायचे, परंतु त्याच्या या गंमतीच्या म्हणण्यामागे एक सूक्ष्म विशाद नेहमीच लपलेला असे.

'अण्णा, तुम्ही ज्या वेळी बोलता त्या वेळी कलावंताचे एक उत्स्फूर्त अनुभवविश्व साकारल्याचा मला नेहमीच साक्षात्कार होतो. तुमचे बोलणे नेहमीच ओरिजनल, अस्सल असते. ते आम्हाला खूप आवडते. 'तू उगीच शेंड्या लावू नकोस. पण खरं सागायचं म्हणजे तुम्हा प्राध्यापकमंडळीसमोर बोलायला मला डिफिडंट वाटतं.'

अण्णाची समजूत सहजासहजी घालता येत नसे. परन्तु एक दोन वेळेला त्यांच्या भाषणाच्या वेळी विद्यार्थ्यांचे उजळलेले चेहरे पाहून अण्णांना खूप आनंद झाला होता.

अण्णाचा नववाङ्मयावरचा जो राग होता तो बराच सकारण होता. मौज–सत्यकथावाल्यानी त्याच्या एन उमेदीच्या काळात त्याना 'गीतकार' म्हणून हिणविले होते आणि ती गोष्ट शेवटपर्यंत त्याच्या मनाला खोलवर जखम करून गेली होती.

अण्णाच्याबरोबर एकदा शासकीय ग्रंथपारितोषिकसमितीवर काम करण्याचा मला प्रसंग आला होता. पहिल्या दोन बैठकांना अण्णा स्वस्थ होते. पुढच्या वेळी त्यानी जवळ जवळ बजावलेच,

'तुम्ही ऊठसूठ मौज–सत्यकथावाल्याना बक्षिसे द्यायला लागलात तर चालायचे नाही सांगून ठेवतो!

आणि खरोखर शेवटच्या बैठकीमध्ये वसंत आबाजी डहाके यांच्या 'योगभ्रष्ट'ला पारितोषिक द्यायचे, अशी सूचना आली, तेव्हा अण्णा 'निषेध निषेध !' म्हणून उभे राहिले आणि 'मी तुमच्या निषेधार्थ बाहेर चाललो म्हणून उठून चालायला लागले. मी अण्णाचा हात धरून त्यांना थांबवले. आर्जव करून खुर्चीवर बसवले आणि त्याना म्हटले,

'अण्णा, तुम्ही मोठे कवी आहात. कवितासंग्रहाना पारितोषिके तुमच्या सल्ल्यानुसारच देण्यात येतील !'

अण्णा शांत झाले आणि हळूच म्हणाले,

'मंडळी, माफ करा. मी उगाच प्रक्षुब्ध झालो नाही. कवितेच्या नावाखाली आजकाल जो भ्रष्टाकार चालला आहे तो माझ्यासारख्या जुन्या माणसाला सहन होत नाही, त्याचाच हा उद्रेक समजा!'

त्या दिवशीच्या संध्याकाळच्या डेक्कन क्वीनने आम्ही दोघे पुण्याला परत आलो. त्या वेळी सारा वेळ आम्ही याच गोष्टीची चर्चा करण्यात घालविला.

अण्णावर लहानपणापासूनचे जे संस्कार होते ते प्रामुख्याने लोकवाङ्मयाचे आणि लोकसंस्कृतीचे होते. लहानपणापासून श्रीधरादिकांच्या संस्काराने आपोआपच मराठी भाषेचे एक समृद्ध वळण त्याच्या वाणीलेखणीला जडून गेले. त्यातच तमाशा–लावणीच्या संस्काराने ही वाणी आणखीच लावण्यवती झाली. या संस्कारामध्ये आपल्या आईचा एक मोठा वाटा आहे, असे त्यांना वाटायचे. त्या मानाने वडील त्याना थोडे दूरचे वाटत. आपले वडील अतिशय शांत वृत्तीचे असून आयुष्याच्या शेवटी संसाराची जी परवड झाली त्याने ते अधिकच मूक बनले होते. परंतु त्या तशा अवस्थेतही आपला गजानन उद्या कोणी मोठा प्रतिभावंत होणार याची त्याना जाणीव होती, असे अण्णांना वाटायचे. त्यांच्या नजरेतील सखोल मार्दव आणि नवोलत च त्यांनी मोठा मुलगा म्हणून आपल्यावर टाकलेला विश्वास, यामुळे आपल्या कुटुंबियांशी आपण घट्ट बांधले गेलो आहोत, असे त्यांना वाटे.

'अण्णा, तुमच्या लेखणीवरचे संतसाहित्याचे संस्कार स्पष्टपणे दिसतात, परंतु तुलनेने ज्ञानेश्वराकडे तुमचा ओढा कमी दिसतो असे नाही तुम्हाला वाटत ?'

'गड्या, तुझे म्हणणे खरे आहे. श्रीधर, महिपती आणि तुकाराम यानी माझ्या मनाचा कबजा अगदी लहानपणीच घेतला. मग राम जोशी, होनाजीबाळा या आमच्या गोत्राच्या लोकानी मला पुरते झपाटले. हा सर्व वारसा समृद्ध करण्याच्या जिद्दीने मी मोरोपंत-वामन पंडितही नीट पचविले; परंतु काय झाले कुणास ठाऊक या सगळ्या गोतावळ्यातून ज्ञानेश्वर माझ्या हातातून सुटले. ते माझ्यापासून खूप दूर राहिले. राजकारणाच्या धकाधकीतून आता मी मुक्त होत असल्याने आयुष्याच्या उत्तरकाळात ज्ञानेश्वरांशी मी सलगी करण्याची इच्छा बाळगून आहे !'

'पण अण्णा, तुलसीदास–सूरदासांचे काय ? '

'अहो, तो तर फारच मोठा माझ्यावरचा संस्कार आहे. तुलसी, सूर आणि मीरा यानी मराठी लोकवाङ्मयाप्रमाणेच माझे सारे भावविश्व व्यापून टाकले आहे. माझ्या गीतामागे या साऱ्याचीच पुण्याई उभी आहे. मी त्यांच्या सावलीत उभा आहे, असेच म्हणा ना !'

अण्णाच्या संस्काराची बीजे, जुन्या निष्ठा आणि श्रद्धा यामधून प्रस्फुरित झाली असल्याने आजच्या युगातील तुटकपणा. माणूसघाणेपणा आणि जीवनाबद्दलची तुच्छता वृत्ती याचा अर्थच आपणाला कळत नाही, असे ते नेहमी म्हणायचे. अण्णावरच्या या संस्कारांमुळे त्याची होत असलेली तारांबळ नेहमी दिसायची. देशस्थात जन्माला आल्यामुळे आणि लहानपणीच मोठा भाऊ म्हणून अंगावर पडलेल्या जबाबदारीने जुन्या संस्काराचे भावबंध उरी बाळगीत त्याना आपल्या साऱ्या गोतावळ्यामध्ये स्वतःची होत असलेली गुंतवणी एकीकडे अति प्रिय असे, तर दुसरीकडे त्यामुळे आर्थिक आणि कौटुंबिक दृष्टीने होणारी ओढाताण पाहून ते कमालीचे

पृष्ठ २१ वर

# मुख्यमंत्री, कोकणचा विकास आणि अॅड. खानविलकर

## काही प्रश्नोत्तरे

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. ए. आर अंतुले याची प्रचंड मताधिक्याने विधानसभेवर निवड ही गोष्ट जुनी झाली आहे. त्यानंतरच्या पत्रकार परिषदेत त्यांनी कोकणविकासाचे कित्येक प्रकल्प जाहीर करून टाकले लोणेरच्या विमानतळापासून मेडिकल कॉलेज कोकण विद्यापीठ मार्गे-उसरपर्यंत. विकासच विकास. ही पत्रपरिषद आटोपून बॅरिस्टरसाहेब हाजला जातात ना जातात तोच ' ह्या योजनाची केन्द्राला कल्पना नाही, विद्यापीठ अनुदानमंडळाची मान्यता नाही. हे आम्ही वृत्तपत्रातच वाचले ' अशा बातम्या दिल्लीहून आल्या. साहजिकच कोकणचा गरीब ' हेचि फल काय मम तपाला ?' म्हणत कपाळाला हात लावून तर बसणार नाही ना अशीही शंका येते. मुख्यमंत्र्यांचे निवडणुकीतील प्रमुख विरोधक अॅड. दत्ता खानविलकर याची निवडणुकीच्या काळातच श्रीवर्धनला एकदा भेट झाली होती. कोकणविकास आणि कोकणचे प्रश्न याबाबत त्यांनी मार्मिक विश्लेषण केले. निवडणूकप्रचाराचे मुद्दे चर्चेत येणे (त्या वेळी) अपरिहार्यच होते. ' निकाल ' आता जुना झाला असला तरी या धावत्या भेटीत काही चांगली प्रश्नोत्तरे झालीं ती येथे देत आहोत–

प्रश्न : श्रीवर्धन मतदारसंघात तुम्ही ' परके' आहात असा प्रचार इंदिरा काँग्रेसकडून झाला हे कसं ?

उत्तर : श्रीवर्धन आणि माझं गाव अंतर आहे फक्त एका खाडीचं. मग मी परका कसा ? दुसरं म्हणजे इंदिरा काँग्रेसचा उमेदवार चिकमगळूरला नवा, परका नसतो, मेडकला परका नसतो. परका असतो फक्त विरोधी पक्षाचाच !

प्रश्न : या अडचणीच्या काळात पक्षाची उमेदवारी पत्करण्यात आपला हेतू कोणता ?

उत्तर : अंतुले सरकारनं सूत्रं हाती घेऊन चार-साडेचार महिने झाले. गेल्या अधिवेशनात त्यांची काय फट्फजिती झाली ही गोष्ट सर्वश्रुतच आहे ह्या राज्याचे मूलभूत प्रश्न मिटविण्याकडे लक्ष देण्यापेक्षा संसदीय लोकशाही नको, अध्यक्षीय हवी. मिसा पुन: आणला पाहुजे, न्यायालयांची ' हुकुमशाही' वाढलीय ती बंद करून ' बांधिलकी' हवी, असे एक ना अनेक गैरलोकशाही मुद्दे अंतुले रोज मांडीत असतात. त्यासाठी बालक-दिनाचेही व्यासपीठ त्यांना चालते. हे सरकार आज ना उद्या कसे गडगडेल हे सांगायची एक संधी म्हणून मी उभा राहिलो. ज्या सरकारप्रमुखाला ' पाया ' नाही तो काय कोकणचा विकास करणार ? ऊठसूठ ' दिल्ली'कडे पाहून राज्य चालते ?

प्रश्न : तुमच्या पोस्टरवर अंतुलेंचे फोटो?

उत्तर : बडखळनाकाप्रकरणात मी त्याची बाजू मांडून त्यांना किटाळमुक्त करण्यात मदत केली, असे त्यांनीच म्हटले आहे मग मदतीचा हात देणाऱ्याविरुद्ध अंतुले कसे उभे रहतात हे मला दाखवून द्यायचे होते.

प्रश्न : अंतुलेसाहेबानी एकूणच कोकणविकासाकडे लक्ष दिले नाही असे म्हणता येईल ?

उत्तर : नाही. तसं नाही. बांधकामखात्याचे मंत्री असताना त्यानी कोकणातील दुर्गम भागातही रस्त्याची कामे, पुलाची कामे धडाडीने पूर्ण केली होती; पण चार-दोन रस्त्यानी कोकणच्या विकासाचे प्रश्न मिटणार नाहीत आर्थिक मागासलेपणातून राजकीय मागासपणा येतो. ते चित्र कोकणात स्पष्ट दिसते. इथल्याचा विकास साधायचा असेल तर प्रकल्पावर प्रकल्पांचा मारा नकोय. शतीला जोडधंदा हवा. चार महिने शेतीचं काम आटोपल्यावर आठ महिने मनुष्य–शक्ती वाया जाते. तिला उत्पादकवळण लावलं पाह्यजे.

प्रश्न : आपणही मंत्री, पदाधिकारी होताच तसे प्रयत्न केलेत काय ?

उत्तर : नक्कीच ! अलीबाग, पेण, खालापूर, पनवेलला शेतीच्या जोडीला दुग्धव्यवसाय उभा केला. कोकणात तुम्हाला दोनच वर्ग आढळतील. एक तर ' खूप' गरीब, दुसरा ' खूप' श्रीमंत. हे चित्र बदललं पाह्यजे.

प्रश्न : ' शेतमालाला रास्त भाव' आंदोलनाची कोकणात ' हवा' आहे की नाही ?

उत्तर : ' आंदोलन' या स्वरूपात दिसत नाही; पण भाताला रास्त भाव नाही ही खंत इथं आहेच. वाढती महागाई, खताचे चढे भाव यामुळे खंडीभर भात होऊनही शेतकरी कर्जबाजारी तो कर्जबाजारीच ! एक किलो खोबरेलचा भाव २१ रुपये आहे. २१ किलो भात द्यायचं तेव्हा कुठं १ किलो तेल मिळते. पेपरची रद्दी अडीच रुपये किलो न् भात मात्र दीड रुपया किलो असा प्रकार इथंही आहे. साखर ग्रामीण भागात नाही; पण मोठमोठ्या मिठाईच्या दुकानदारांना परवाने हाही प्रकार आहे लोक बोलतातही, पण देशावरच्या शेतकऱ्याएवढ्या इथं भावना तीव्र नाहीत हे खरं.

प्रश्न . ' आपला मुख्यमंत्री ' म्हणून लोकमतदार बाकीचे प्रश्न विचारातच घेणार नाहीत असा एकूण सूर दिसतो.

उत्तर : तसा आहे; पण ही व्याख्या कशी फसवी आहे. असते, हे लोकांना पटवून द्यायला पाहयजे. स्वातंत्र्यानतर प्रथमच कोकणाला मुख्यमंत्रिपद मिळाले हे खोटय. बी. जी खेर आधीचे. खेरीज मुख्यमंत्री म्हणजे विकास हे जर समीकरण धरलं तर विदर्भाकडे सातत्याने दहा-बारा वर्षं ते होते. अजूनही विदर्भाचे प्रश्न आहेतच. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रही त्याला अपवाद नाही. मुख्यमंत्री ' राज्या'चा असतो, असावा. 'प्रादेशिक' विकास त्याला साधता येणं शक्यच नसतं. चार पूल, दोन रस्ते, एक विद्यापीठ म्हणजे ' विकास' ? अजूनही आठ महिने पिण्याच्या पाण्याचे हाल आमच्याकड आहेत. हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. आठाठ तास भरपूर पाऊस झाला तरी एक तासात रस्ते–शेतजमिनी कोरड्याच ! हे पाणी अडविण्याचे प्रयत्न महत्त्वाचे. असे झाले तर कोकणात दुबार–पिके घेता येतील. माणसं मुंबईकडे पळणार नाहीत. ' *Moneyorder nourished* ' ही कोकणची प्रतिमा बदलता येईल. ते सोडून अंतुलेसाहेब आश्वासनावर आश्वासने देत सुटलेत जी पुरी करणं शक्य नाही !

प्रश्न . याचा खुलासा ?

उत्तर : उदाहरण उरण–मुंबई पुलाचंच घेऊ. या पुलान मुंबई सरळ कोकणाला जोडली जाईल असं ते म्हणतात; पण अंतुलेंचं हे आश्वासन म्हणजे एक ' बिगेस्ट फ्रॉड आहे. न्हावा–शेवा प्रकल्प जेव्हा केंद्रानं संमत केला त्यात मुळातच अट घातलीय की उरण खाडीवर पूल नसावा. ही अट राज्यसरकारने स्वीकारली तेव्हाच हिरवा कंदील मिळाला मग हे आश्वासन कसे देतात ? रेवस–रेड्डी पुलाचं–रस्त्याचं आश्वासन बघा किती खोटं आहे ते ! या मार्गावर एक ना दोन चोवीस खाड्या आहेत. म्हणजे २४ पूल बांधावे लागतील. एका पुलाला तीन ते पाच वर्षांचा काळ लागतो, किती वर्षं लागतील ? पैसा कुठून उपलब्ध करणार ? ह्याना दवाखाने धड चालवता येत नाहीत न् मेडिकल कॉलेज काढताहेत !

प्रश्न : दवाखान्यांचं काय ?

उत्तर : महाडजवळ पाचाडला जिजामाता हॉस्पिटल आहे. डॉक्टर न् औषधाचा तिथं नेहमीच तुटवडा असतो. तोट्यातलं हॉस्पिटल म्हणून दुर्लक्ष. गेल्या पंधरा ऑगस्टला या दवाखान्याला सरकारनं ' अॅम्ब्युलन्स ' दिली. दूरदर्शनपासून वृत्तपत्रापर्यंत या गोष्टीचा गाजावाजा झाला. १ लिटर पेट्रोलला एक मैल ' धावणारी ' ही एक जुनी गाडी आहे इथे तर सगळेच ' घाट ' रस्ते ! शिवाय गंमत अशी की, ही गाडी आल्यापासून उभीच आहे. कारण ड्रायव्हरच्या पगाराची न् गाडीला पेट्रोलच्या खर्चाची तरतूदच नाही. हे असं आहे आश्वासनांचं ! !

–रघुवीर मुळे

# मनुष्य आणि कायदा

## डॉ. शरद अभ्यंकर, वाई

मनुष्य हा एक . प्राणी आहे, अशी व्याख्या करून रिकाम्या जागेत हसणारा, रडणारा, रडवणारा, गप्पा मारणारा, बोलणारा, नाचणारा, सिनेमा पाहणारा, भाडणारा यापैकी कुठलाही शब्द घातलेल्या व्याख्या तुम्ही ऐकल्या असतील. त्यात भर घालून मी आणखी एक व्याख्या करणार आहे ती ही की, मनुष्य हा कायदा मोडणारा प्राणी आहे (अर्थात मोडण्याकरता प्रथम कायदे करावे लागत असल्यामुळे मनुष्य हा कायदा करणारा प्राणी आहे हे मान्य करावे लागेल.)

या कायदामोडू प्रवृत्तीला मानवी मनाचा एक मोठा गुणधर्म कारणीभूत आहे, तो म्हणजे जी गोष्ट करू नये असे सांगितले असेल ती करायची. कॉलेजमध्ये असताना माझी एक जर्मन पत्रमैत्रिण होती. त्या वेळी महाराष्ट्रात कडक दारुबंदी होती. त्याची चर्चाही आमच्या पत्रातून चाले. एकदा नाताळची भेट म्हणून तिने एक जंगी पार्सल पाठवून दिले. त्यात गुपचूप एक कॉग्नॅक ब्रँडीची बाटली लपवली होती मुबईत कस्टम अधिकाऱ्यानी त्यामुळे हे पार्सलच जप्त केले आणि माझ्याकडे परदेशाहून मद्य आयात करायचा परवाना मागितला तो साहजिकच माझ्याकडे नसल्यामुळे बाटली तेवढी जप्त करून बाकी पार्सल माझ्या ताब्यात यायला ईस्टर उजाडला ! तोपर्यंत मुबई कस्टमच्या गोडाउनमध्ये नाताळकेकचा वाळून भुगा झाला होता आणि चॉकलेटे वितळून गेली होती ! मी थोड्या रागानेच तिला लिहिले, 'आमच्याकडे जबरदस्त दारुबंदी आहे हे तुला लिहिले असतानाही तू हा उपद्व्याप का केलास ?' यावर तिने वरील सिद्धात मला सुनावला. 'अरे, जी गोष्ट करायला बंदी असते, ती करण्यात तर खरी मजा !'

या मनोधर्माचा फायदा घेऊन एक मोठे साधू आपल्याला परमेश्वर भेटवा असा आग्रह धरणाऱ्या शिष्यांचा ससेमिरा चुकवत असत. 'परमेश्वरच पाहिजे आहे ना ? साधी गोष्ट आहे. मी सांगतो तसं करायचं. फक्त चिंतन करायचं !'

'पण कसलं चिंतन करायचं ?'

'कसलेही करायचे. फक्त माकडाचा विचार मनात आणू द्यायचा नाही !'

आठ दिवसाच्या आत शिष्य वैतागून परत येई. 'महाराज, जग जंग पछाडले; पण माकडाशिवाय एक क्षणभरही अन्य विचार डोक्यात टिकत नाही !'

त्यावर साधुमहाराज हसून म्हणत, 'अरे, एवढी सोपी गोष्ट साधण्याइतके मनोबल नाही मग परमेश्वर कसा रे भेटायचा ?'

कायदे मोडायची प्रवृत्ती माणसात वाढते याला कारण बरेच वेळा अनेक विक्षिप्त कायदेच असतात. रस्त्याने डाव्या बाजूने चालावे हा कायदा ठीक आहे. तो पाळण्यात अडचण नाही, पण पुण्यात काही वर्षांपूर्वी प्रत्येक रस्त्याच्या छेदावर 'STOP & PROCEED' अशा पाट्या लावल्या होत्या. त्यानुसार वाहन थांबवून मग पुढे जाणाऱ्या माणसाकडे आसपासचे लोक 'कोण हा चक्रम' अशा अर्थाने पाहात, इतका हा कायदा सर्रास मोडला जाई.

उत्पन्नातला ठराविक हिस्सा सरकारजमा करावा हा कायदा तंतोतंत पाळणारा माणूस गाढव समजला जातो. बड्या बड्या लोकांच्या पार्टीत उत्पन्न दडवण्याकरता वा कर चुकवण्याकरता आपण काय काय युक्त्या केल्या हा मोठ्या अभिमानाने सागण्याचा विषय असतो.

काही कायदे यंत्रवत असल्यामुळे मोडले जातात. एक ब्रिटिश माणूस पॅरिसमध्ये रात्रीच्या वेळी टॅक्सीतून चालला होता. टॅक्सीड्रायव्हर लाल दिवे ओलाडून भरधाव वेगाने टॅक्सी नेत होता हे काही त्या कायदाप्रेमी इंग्रजाला रुचले नाही. कासावीस होऊन तो म्हणाला, 'अरे, अरे, चौकात लाल दिवा असताना तू रस्ता ओलांडतोस करी कसा ?' त्यावर टॅक्सीवाला उत्तरला, 'साहेब, ते यंत्र आहे. त्यामुळे त्याला विचारशक्ती नाही. एक मिनिट लाल आणि एक मिनिट हिरवा दिवा दाखवत राहणे हे त्याचे काम; पण मी मनुष्य आहे. दोन्ही बाजूचा रस्ता पूर्णपणे मोकळा आहे हे पाहून रस्ता ओलांडण्याचा निर्णय मी घेऊ शकतो. या निर्बुद्ध यत्राचा हुकूम मी विचार करूनच पाळणार !'

'कायद्याने चाला' याचा अर्थ काही वेळा अगदीच भिन्न असू शकतो. माझ्या एका मित्राला काही किरकोळ रहदारीचा नियम मोडल्याबद्दल एकदा पोलिसाने अडकवले. 'अहो, मी परगावचा आहे. मला इथले रस्ते ठाऊक नाहीत' असे बरेच सागून पाहिले; पण पोलिसाचा एकच ठेका ! 'कायद्याने चला' शेवटी त्याच्या लक्षात आले की पोलीस म्हणत होता, 'काही द्या आणि चला !'

भारतातल्याइतके मोडले जाणारे कायदे अन्य कोठल्याही देशात नसतील ! 'फक्त १२० लोकासाठी' ही रेल्वेच्या डब्यातली पट्टी त्यात बसणाऱ्या उतारूंना उद्देशून आहे हे प्रथम समजले त्या वेळी मला हसू आवरले नव्हते. रस्त्यावर असणाऱ्या वेगमर्यादा अशाच केव्हा बंडाच्या काळात ठरवलेल्या अद्याप कायम आहेत. सतीबंदीचा कायदा झाल्यानंतर बरीच वर्षे कायदा मोडून सती गेलेली बाई जास्त पुण्यवान समजली जाई ! साधी देवीची लस टोचून घेण्याची सक्ती करणारा कायदा भारतात करावा लागला होता आणि अगदी माझ्या आठवणीत हा कायदा मोडून देवी टोचून घेण्याचे टाळणारे अनेक लोक खेडोपाडी पसरलेले होते. बालविवाहाला बंदी करणारा कायदा व्हावा म्हणून अनेक मातब्बर मंडळीना समाजाच्या विशिष्ट विचारसरणीविरुद्ध लढा द्यावा लागला होता. तरीही अद्याप शेकडोच्या संख्येने एकाच दिवशी होणारे बालविवाह, राजस्थानसारख्या राज्यात कायद्याच्या नाकावर टिच्चून होतच असतात ! हुंडाबंदीचा कायदा हा तर एक मोठा विनोदच आहे.' दारूबंदी, गोवधबंदी ही खुळे कायद्याने लोकाचेवर लादू पाहणे हे भारताखेरीज अन्यत्र आढळणार नाही! हे सर्व कायदे पाहिल्यावर अमेरिकन विधिसभेला उद्देशून एका पत्रकाराने 'Whenever they make a law it becomes a joke, and whenever they make a joke, it becomes a law !" असे उद्गार काढले होते, त्याची आठवण होते.

चेष्टेचा भाग सोडला, तरी असे कायदे करणे अनेक वेळा भाग पडते. आज आपल्याला सती जाऊ नये किंवा देवी टोचून घ्याव्या याकरता कायदे करावे लागले होते या गोष्टीचे आश्चर्य वाटते. आणखी शंभर वर्षांनी हुंडा घेऊ नये किंवा विवाहाचे वय इतके असावे याकरता आपल्या पूर्वजांना कायदे करावे लागले होते याचे त्या वेळच्या लोकांना आश्चर्य वाटेल ! आज अत्यावश्यक असणारा पण सतीच्या कायद्यापेक्षाही विरोध होईल असा कायदा व्हायला पाहिजे आहे संततिप्रतिबंधाचा. यालाही आणखी शंभर वर्षांनी 'इतकी साधी आणि कुणालाही पटेल अशी गोष्ट असताना १९८० च्या जमान्यात त्याकरता कायदे काय करावे लागले, निदर्शने आणि दंगली काय झाल्या. भलताच मागासलेला होता आमचा देश तेव्हा ! असे लोक नक्की म्हणतील !

मला वाटते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीनी याच गप्पाचे ओघात एक संस्कृत सुभाषित सागितले होते, त्याचा अर्थ असा की 'जो कायदा लोक पाळणार नाहीत असा कायदा शहाणा राजा करत नाही !' यात थोडा बदल करून आपणास असे म्हणता येईल की 'लोकांना हितकारक कायदा करून तो त्याना पाळायला लावणाऱ्याला शहाणा राजा म्हणावे !' □

कथा

# ' सर्व्हिस चार्ज '

डॉ. यशवंत देशपांडे

आर्किटेक्ट बेळगी आपल्या ऑफिसात आले, तसं त्यांच्या स्टाफनं उठून त्यांचं स्वागत केलं. त्यांची स्टेनो, त्यांचा असिस्टंट, कार्पोरेशनचं काम पहाणारे आणि अजून बरेच. सर्वांच्या अभिवादनाचा स्वीकार करीत ते आपल्या चेंबरमध्ये आले. समोर भिंतीवरच्या बालाजीच्या फ्रेमसमोर एक मिनिटभर ध्यानस्थ उभे राहिले. ध्यान संपल्यावर, खुर्चीवर बसल्या बसल्या दिसेल असं त्यांच्या आईचं भलं थोरलं पोर्ट्रेट लावलं होतं, तिथे जाऊन त्यांनी हात जोडून नमस्कार केला अन् नंतर ते आपल्या खुर्चीत बसले.

ते खुर्चीत बसल्याचं बाहेर समजल्याप्रमाणे त्यांचा असिस्टंट गंगाधर आत आला. बेळगीनी त्याला विचारलं,

'एनी स्लॅब्ज टुडे ?'

हातातल्या डायरीत पहात त्यानं म्हटलं, 'नो सर !'

हे रोजचं होतं. सकाळी आठ वाजता आल्यावर बेळगी दिवसाच्या 'एंगेजमेंटस' विचारायचे.

स्लॅब्ज नाहीत म्हटल्यावर त्यांची कळी खुलली. ते म्हणाले, 'व्हेरी गुड ! आज नशीब जोरावर दिसतंय !' गंगाधर किंचित हसला. आपले साहेब खुष झाले आहेत हे त्यानं ओळखलं. तं साहजिकच होतं. एवढ्या दिवसांच्या अनुभवानं त्याला लोकांच्या सायकॉलॉजीची कल्पना आली होती. घराच्या बाबतीत 'स्लॅब' हा लोकांचा 'वुइक' 'पॉइंट' होता बाकी कशाला नाही तरी स्लॅबच्या वेळी आर्किटेक्टनं स्वतः हजर रहावं असं लोकांना वाटत. त्यामुळं स्लॅब नाहीत म्हटल्यावर बेळगी खुष झाले होते याचं त्याला हसू आलं होतं, तरी आश्चर्य वाटलं नव्हतं.

'एनी व्हॅल्युएशन्स ? इन्स्पेक्शन्स ?' बेळगीनी पुन्हा विचारलं.

डायरीतून नजर फिरवीत गंगाधर म्हणाला, 'इट ईज रादर सरप्राइजिंग सर ! आज यापैकी कुठलही काम नाहीय !'

मोठ्यांदा हसत बेळगी म्हणाले, 'याचा अर्थ आला का तुझ्या लक्षात गंगाधर ?'

ते नक्की काय विचारतात हे लक्षात न आल्यामुळं तो गप्पच राहिला. तसे ते म्हणाले,

'तुमच्या नाही लक्षात यायचा. आज या सगळ्या एगेंजमेंटस नाहीयत याचा अर्थ...' योग्य शब्दासाठी ते थोडा वेळ थांबले अन् नंतर म्हणाले, 'याचा अर्थ, वुई आर ऑन डिक्लाइन ! समजलं ? आपली प्रॅक्टिस कमी होत चाललीय. धंदा बसत चाललाय ! तेव्हा तुम्हा सर्वांना आता आपापली व्यवस्था पहायला हवी !'

गंगाधरला काय बोलावं हे समजेना ! तसं त्यांची अजूनच थट्टा करायची लहर बेळगीना आली. ते खुर्चीतनं उठले. आपला टाय त्यांनी सैल केला. कोट काढून खुर्चीच्या पाठीवर टाकीत ते म्हणाले,

'असं होत असतं गंगाधर ! प्रत्येक प्रॅक्टिसचं असंच असतं ! ती वाढत जाते. स्थिर होते. ज्याला आपण 'प्लॅट् रिजन' म्हणतो. तो येतो. मग घसरण सुरू होते. मेडिसिन, लॉ, सेल्स ! कोणत्याही प्रॅक्टिसमध्ये हाच क्रम असतो. याचं कारण काय आहे ? ठाऊक आहे का तुला ?'

गंगाधरला काही समजत नव्हतं. आपल्या साहेबाना आज काय झालंय, हे त्याच्या लक्षात येत नव्हतं. 'रिफ्लेक्सली तो म्हणाला, 'नाही सर !'

तसं मग बेळगी पुन्हा खुर्चीवर बसले. समोरच्या टेबलावरचं स्केचपेन उचलून त्याच्याशी खेळत म्हणाले, 'याचं कारण नवं रक्त ! प्रत्येक क्षेत्रात नवं रक्त येत असतं. नवीन कल्पना मूर्त होत असतात. जुन्याना बाजूला सरावं लागतं. आलं लक्षात ? यालाच अनुसरून आपली पण प्रॅक्टिस कमी होतेय. तेव्हा सावधान !'

आपल्या सावधानवर ते स्वत:च मोठ्यांदा हसले !

गंगाधर आता बराच सावरला होता. 'नाही सर ! आय डोंट अॅग्री ! तुम्ही म्हणता ते सर्वसाधारणपणानं खरं असेल; परंतु आपल्या बाबतीत ते खरं नाही. आजचा दिवस त्या मानानं आय मीन 'कंपॅरिटिव्हली' 'फ्री' आहे, एवढाच त्याचा अर्थ ! कारण पहा ना सर ! पुढचे दोन महिने एकही दिवस 'फ्री' नाहीये !'

'आय नो ! आय नो !!' बेळगी म्हणाले, 'मला ठाऊक आहे ते ! मी तुमची थट्टा केली ! घाबरून जाऊ नका !'

गंगाधर म्हणाला, 'नाही सर. तुम्ही असल्यावर..'

त्याला मधेच थांबवीत बेळगी म्हणाले, 'ओ के ! ओ के !! आज अजून काही आहे का ?'

डायरीवरनं नजर फिरवीत गंगाधर म्हणाला 'नाही सर !'

खुर्चीवर रेलून बसत बेळगी म्हणाले, 'असा एखादा दिवस उजाडतो, तेव्हा काय करावसं वाटतं ठाऊक आहे ?' थोडं थांबून ते त्याच्या उत्तराची वाट न पहाता म्हणाले, 'असं वाटतं को कार काढून पोराबरोबर कुठंतरी लांब भटकून यावं. रस्त्यावरचे पदार्थ खावेत. नाही तर बायकोबरोबर बुद्धिबळ खेळत बसावं !'

गंगाधर म्हणाला 'मग जा ना सर ! आम्ही सांभाळून घेतो इथलं सगळं. नाही तरी तसंही आज 'हेवी' काम नाहीय !'

एक दीर्घ उसासा सोडून बेळगी म्हणाले, 'नाही गंगाधर ! ते माझ्या नशिबात नाही ! अरे, ही साइटवरची कामं नसतील; पण ऑफिसचं काय ? इथल्या 'अपॉइंटमेंट्स' पहायला हव्यात ना ! त्यातली एखादी आज निघाली म्हणजे सपलं !'

त्यानी इंटरकॉमवरून स्टेनोला आत बोलावलं. पदर सावरीत त्यांची स्टेनो आली. हातातल्या डायरीवरनं नजर फिरवीत म्हणाली,

'डिस्कशन ! दुपारी तीन वाजता ! आय. जी. पी. प्रधान यांच्याबरोबर त्यांच्या नव्या घराच्या प्लॅनवर ! त्यानंतर सव्वाचार वाजता डॉ. पटवर्धन ! त्यांच्या नवीन हॉस्पिटलच्या...'

'बास ! बास !!' तिला थांबवीत बेळगी म्हणाले, 'ही डिस्कशन्स आज अशीच चालू रहाणार आहेत, असा याचा अर्थ !' नंतर गंगाधरकडे वळून ते म्हणाले, 'सांग आता गंगाधर ! कॅन आय टेक ऑफ टुडे ? अरे, ही माणसं नाराज होतील ! एवढं महिनोगणती आधी ठरवलंय ना !'

त्याला समजावून सांगितल्याप्रमाणे ते पुढे म्हणाले, 'तुला सांगतो गंगाधर ! माझा एक शाळेतला मित्र सिनेमातले डॉयलॉग्ज फार सुरेख म्हणायचा. तो सांगायचा 'मंदीर तोड, मसजिद ! लेकिन किसीका दिल मत तोड !'

यावर गंगाधर काय बोलणार होता ?

स्टेनोचे ओठ मात्र हमल्यामुळे किंचित विलग झाले होते !

'तर ठीक आहे !' आवरतं घेण्याच्या उद्देशाने बेळगी म्हणाले,

'आजचा दिवस पण रोजच्यासारखाच उजाडला आहे. चला, आपण आता कामाला लागू या !'

त्यानी समोरच्या प्लॅनमध्ये डोकं घातलं.

गंगाधर अन् स्टेनो बाहेर जाऊन कामाला लागले.

दोन वाजले तसं इंटरकॉमवरून स्टेनोचा आवाज आला. जेवणाचं विचारत होती. म्हणाली 'सर, युवर लंच !'

बेळगी जेवणाचं पार विसरले होते. लक्षात ठेवायसारखं त्या जेवणात काही नव्हतंच मुळी ! सवयीनं त्यानी म्हटलं, 'आण ! जेवून घेतो !'

न कळत त्याना आपल्या आईची आठवण झाली. वाटलं, धावत जाऊन भूक लागलीय असा हट्ट तिच्याजवळ धरावा, घाई करावी. 'थाब थोडं. वाढतेच आत्ता !' असं तिचं वाक्य ऐकावं. नतर तिच्या हातची अंबाडीची भाजी, अन् मिरच्याचा ठेचा भाकरीशी खावा.

भाकरी आणि मिरच्याचा ठेचा !

बेळगी विलक्षण अस्वस्थ झाले.

स्टेनोनं त्याचं जेवण शेजारी छोटया टेबलावर माडलं. दोन चटणी सँडविच, नमकीन लस्सीचा एक ग्लास, उकडलेलं अंडं. मीठ आणि मिरपूड !

जेवणाकडे पाहिल्याबरोबर बेळगीची भूक गेली; परतु 'उदरभरण नोहे' आईने पाठ करून घेतलं होतं. जेवण करणं भाग होतं.

एक सँडविच आणि लस्सी पिऊन ते उठले.

नतर पंधरा मिनिट विश्राती ! टाइम्स हातात घेऊन ते इझीचेअरवर विसावले.

बरोबर तीनच्या ठोक्याला आय. जी. पी. प्रधान आपल्या पत्नीसह आले. दाराशी जाऊन बेळगीनी त्यांचं स्वागत केलं त्याना घेऊन ते आपल्या चेबरमध्ये आले.

आय. जी. पी. प्रधान ! रिटायर व्हायला आले होते. स्वतःचं घर बांधायला काढलं होतं. त्याचा नुमताच पोलिसी खाक्या नव्हता. संगीत आणि म हि्य त्याच्या हॉबीज होत्या, तेव्हा त्याच्याशी आणि त्याच्या सुविद्य पत्नीशी बोलताना, बेळगीचं धंद्यातलं सगळं कसब पणाला लागणार होतं.

आल्या आल्या प्रधानानी मुद्द्याला हात घातला. म्हणाले, 'काय वास्तुकल्पकसाहेब, आमचा प्लॅन तयार आहे ना ?'

'होय ! अगदी तयार आहे !' बेळगी म्हणाले. अन् त्यानी इंटरकॉमवरून स्टेनोला सांगितल, 'गंगाधरला पाठव !'

गंगाधर आत आला. त्यानं प्लॅन टेबलवर पसरून ठेवला. त्याच्या शेजारी प्रधानांच्या घराचं मॉडेल पण ठेवलं.

त्या सुरेख रंगसगती साधलेल्या मॉडेलकडे पहात सौ. प्रधानानी आश्चर्यानं विचारलं, 'असं दिसणार आमचं घर ? खरंच !'

'यापेक्षा जास्त सुदर !' बेळगी म्हणाले. 'कारण प्रत्यक्ष घर बाधून झाल्यावर त्यात माणसाचा वावर होणारयं ?'

'अय्या ! किती सुरेख आहे, नाही !' आय. जी. कडे पहात सौ. प्रधान म्हणाल्या.

'होय ! अग, पण थोडं थाबशील तर !' आय. जी. म्हणाले, 'हं ! पाहू या आता आमचा प्लॅन !'

बेळगीनी त्यांना मग त्याच्या घराचा प्लॅन समजावून सांगितला

आय. जी. ना ड्रॉइंगहॉलच्या एका बाजूला संपूर्ण जाळी हवी होती. सौ. प्रधानानी त्याला 'ऑब्जेक्शन' घेतलं. म्हणाल्या, 'एवढ्या मोठ्या जाळीतून धूळ किती आत येईल ! तुम्हाला काय होतंय ? घर स्वच्छ ठेवता ठेवता माझ्या नाकी नऊ येतात !'

'तू थाब ग ! आर्किटेक्टसाहेबाना सागू दे जरा !' आय. जी. म्हणाले. तसं बेळगी उत्तरले,

'वैनीसाहेब म्हणतायत त्यात तथ्य आहे.' त्यांच्या आवाजात आपोआपच गोडवा आला होता. 'धूळ हा एक आस्पेक्ट झाला. दुसरा एक आस्पेक्ट आहे. आय मीन प्रॉब्लेम ! नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी तीन महिने कडाक्याच्या थडीचे ! ही एवढी मोठी जाळी ठेवली तर व्हॉट अबाउट विंटर कमिंग इन ?'

बेळगी थोडं थाबले. आय. जी.ची रिअॅक्शन पहात म्हणाले, 'आम्हा आर्किटेक्टना सगळया बाजूनी विचार करावा लागतो. माणूस, त्याचा स्वभाव, त्याचा कल, त्याचे मूड्स् ! अन् शेवटी त्याचं वय सुद्धा ! आपण, आय. जी. साहेब, स्वतःला पूर्वीसारखं तरुण समजून चालत नाही, या वयात थडी बाधते म्हटल !'

'नाही तर काय !' सौ. प्रधानानी त्याना दुजोरा दिला. 'याना मुळी आपलं वय झालंय हे पटतच नाही !'

'वय होणं हं मुख्यतः मानसिक असतं.' थट्टेनं आय. जी. म्हणाले, 'हाउ अेव्हर आय अॅग्री ! तुम्ही म्हणता, त्याप्रमाणे थंडीत त्रास होईल, गेट रिड ऑफ धिस् जाळी !'

असा हळूहळू आय. जी. च्या घराचा प्लॅन पुढे सरकला. किचनची पाळी आली तेव्हा बेळगीनी आय. जी. ना बजावलं, 'इथे मात्र आय. जी. साहेब, आम्ही आपल्याला मुळीच प्रवेश देणार नाही! मी आणि वैनीसाहेब मिळून 'फायनालाईज' करू !'

'ओके ! ओके !!' आय. जी. म्हणाले. 'प्रत्यक्ष किचन तयार झाल्यावर मला जेवायला मिळेल ना ?'

बेळगीनी सौ. प्रधानांकडे पाहिलं. त्या म्हणाल्या, 'मिळेल ना ! पण त्या तुमच्या 'डिनर पार्टीज' नसतील तर !'

मोठ्यादा हसून आय. जी. नी चिरूट काढला.

अर्ध्या तासाभरानं आय. जी. चा प्लॅन 'फायनालाईज' झाला. त्याच्या स्टडीमधे पुस्तकाना आणि संगीताच्या कॅसेट्सना भरपूर जागा दिल्यानं ते खुष झाले होते. शिवाय घरात शिरल्याबरोबर, फाटकाच्या समोर, तुळशीवृंदावन होतं !

ते तिथे 'ऑड' दिसेल असं आय. जी. म्हणाले होते; परंतु बेळगीनी ते त्याच्या गळी उतरवलं होत. ते म्हणाले होते, 'माफ करा साहेब ! मी थोडासा वेगळा आर्किटेक्ट आहे.. आपल्या संस्कृतीतल्या या गोष्टीबद्दल मी आग्रह धरतो. घराला तुम्ही खूप सजवा ! 'फॉल्स सीलिंग, सनमायका व्हीनिअर !' सगळया महागड्या गोष्टी घर मागत असतं. पण अगण ! त्याला फक्त तुळस हवी असते. ती काढून घेऊ नका !'

आय. जी.नी कबूल केलं होतं.

सौ. प्रधानाना बेडरूम्सना खूप मोठाल्या खिडक्या हव्या होत्या. आय. जी. म्हणत होते एवढ्या मोठाल्या खिडक्याची गरज नाही. बेळगीनी त्याची चर्चा थोडा बेळ

ऐकली आणि म्हणाले, ' माफ करा आय. जी. साहेब अन् वैंनीसाहेब, तुम्ही पण ! या भांडणाचा निकाल आपण इथेच लावणार आहोत ना ? का तेही दिल्लीला नेण्याचा विचार आहे ?'

प्रचलित राजकीय परिस्थितीचा बेळगीनी केलेला सूचक उल्लेख आय. जी ना, फार आवडला. म्हणाले, 'ठीक आहे आम्ही हे भांडण दिल्लीला नाही नेत. तुमचा लवाद मान्य ! काय ग ?'

सौ. प्रधानांनी मान डोलावली.

बेळगी म्हणाले, ' आय. जी साहेब ! हे आर्किटेक्चर युरोपातून आपल्याकडे आलं. आम्ही आंधळेपणाने ते उचलल. युरोपात सूर्य क्वचित दिसतो. सारखं ढगाळ वातावरण ! त्यामुळे घराला खूप मोठ्या मोठ्या खिडक्या, उंच उंच काचा ! पण आपल्या भारतात त्याची गरज नसते.सगळ्या जगाला हेवा वाटावा असा लख्ख सूर्यप्रकाश आपल्या कडे असतो. सूर्यप्रकाश कमी कसा करायचा हा आम्हा आर्किटेक्ट लोकांपुढे प्रश्न असतो. त्यासाठी मग आम्ही खिडक्यांना फिन्स लावतो. तेव्हा वैंनीसाहेब, माझं ऐका. तुमच्या घरात पुरेसा सूर्यप्रकाश येईल याची मी खात्री देतो अगदी तुमच्या ॲक्वेरियममधल्या माशाना सुद्धा व्हिटॅमिन अे आणि डी भरपूर उपलब्ध होईल. या खिडक्या थोड्या लहान राहू द्या !'

सौ. प्रधानाना नाही म्हणणे अशक्य होतं.

आय. जी जायला निघाले तसं त्यांच्या लक्षात आलं. त्यानी बेळगीना विचारलं, ' आता शेवटचा प्रश्न. माझी दोन मुलं आहेत. वाटणीची वेळ आल्यास थोड्याशा अल्टरेशन्स करून, दोघानाही घराचा सारखाच भाग देता येईल ना ?'

सौ. प्रधान म्हणाल्या, 'जाऊ द्या हो ! एवढं पुढचं कोणी पाहिलं आहे ?'

बेळगी म्हणाले, 'नाही वैंनीसाहेब. आय. जी. म्हणतायत ते खरं आहे. भावा-भावाचं नातं फार विचित्र. त्यांच्यासारखे एकमेकाचे मित्र नसतात अन् आपसात नाही जमलं तर त्यांच्यासारखे शत्रू पण नसतात त्यामुळं आय. जी.नी उपस्थित केलेली शंका बरोबर आहे.' ' नंतर आय. जी. कडे वळून त्यानी म्हटलं, ' माझ्या प्रत्येक प्लॅनमधे मी या गोष्टीचा विचार करून ठेवतो. '

त्यांनी मग घराचे दोन भाग कसे होतील हे आय. जी. ना समजावून सांगितलं.

इंटरकॉमवरून आय. जी. साठी कोल्डिंक पाठवायला सांगून ते म्हणाले, ' वैंनीसाहेब! पाच मिनिटं मी अजून वेळ घेतो. ते बसल्यावर बेळगी म्हणाले, ' तुमच्या दोन्ही मुलांना सवडीनं माझ्याकडे पाठवून द्या. त्याना मी समजावून सांगेन !'

आय. जी. ना हे जरासं आवडल नाही. ते म्हणाले 'आर्किटेक्टसाहेब त्याना मीच समजावून सांगतो.'

'माफ करा मला !' घाईघाईनं त्याची क्षमा मागत बेळगी म्हणाले. आपल्याला दुखवायचा माझा मुळीसुद्धा उद्देश नाही; परंतु मी मघाच आपल्याला सांगितलं ना, मी नुसता आर्किटेक्ट नाही. आपल्या संस्कृतीतल्या चांगल्या गोष्टी जतन करायचा माझा नेहमी प्रयत्न असतो. ' ते थोडं थांबले. आईच्या पोर्ट्रेटकडे निर्देश करीत म्हणाले, 'ही माझी आई. आम्हा चौघा भावाना समजावून सांगता सांगता थकली, म्हणायची. ' भांडू नका रे ! एकोप्यानं रहा ! घर, शेती, पैसे, सगळं नंतर ! आधी भावाभावाचं प्रेम ! पण पिकलं तिथं ते विकलं नाही ! आम्ही तिच्या देखत एवढे भांडलो, की आमची मनं कलुषित झाली. एकमेकाकडे जाणं येणं तुटलं. आईला फार फार दु:ख झालं !'

आईच्या आठवणीनं बेळगींचे डोळे भरून आले. आय. जी. आणि सौ. प्रधान गप्प होते. बेळगींनी आईचा उल्लेख कशामुळे केला हे त्याना समजेना; परंतु बेळगीनी त्याना फार वेळ अंधारात ठेवलं नाही. खिशातून रुमाल काढून त्यानी डोळे कोरडे केले अन् ते म्हणाले, ' तुमच्या मुलांना मी समजावून सांगेन, त्यानी, आम्ही केलेली चूक करू नये म्हणून सांगेन घर शेवटी सिमेंट, विटा, लोखंड, रेती, चुना इत्यादी 'इनॲनिमेट' गोष्टींनी तयार होत ते कितीही पक्कं बांधलं, सजवलं, तरी त्याचा नाश अटळ असतो. माणसा माणसातले बंध मात्र न तुटणारे असतात. त्याना जपायला मात्र हवं असतं. '

बेळगींच्या स्वभावाची एक वेगळी बाजू आय. जी. ना दिसत होती. एवढ्यात कोल्ड्रिंक आलं. हळूहळू ते सिप करताना आय. जी. म्हणाले, ' खरं म्हणजे, आर्किटेक्टसाहेब, मी तुमची क्षमा मागायला हवी. माझ्या ' कटं' उत्तरानं तुम्ही दुखावला गेलात. तुमच्या जखमेवरची खपली निघाल्यासारखं झालं. '

' नो ! नो ! !' घाईघाईनं बेळगी म्हणाले, ' असं मुळीच समजू नका. मी माझ्या प्रत्येक ' क्लायंट 'ला हे सांगत असतो अन् याचं कारण ठाऊक आहे ?'

आय. जी आणि सौ. प्रधान गप्पच राहिले. तसं मग बेळगी स्वत:च म्हणाले, ' याचं कारण मी ' बिल ' ' चार्ज ' करतो. माझ्या सल्ल्यासाठी पैसे गेलेले असतात याची सर्वांना जाणीव असते. त्यामुळे माझ्या आईच्या उपदेशाप्रमाणे, तो व्यर्थ जाण्याची शक्यता कमी असते. फुकटच्या सल्ल्याला केव्हाही किंमत नसते ! त्यामुळे माझ्या इतर 'सर्व्हिसेसना' मी जसा ' चार्ज ' लावतो तसाच या ' सर्व्हिस 'ला सुद्धा पैसे मोजलेले असल्यामुळे लोकांच्या ते चांगलं लक्षात रहातं. '

बेळगी थोडं थांबले. आय. जी. आणि सौ. प्रधान गप्प होते. तसं ते म्हणाले, ' फार वेळ घेतला तुमचा. नमस्कार !' त्याना पोचवण्यासाठी ते दारापर्यंत गेले परत येताना त्याचं समोरच्या घड्याळाकडे लक्ष गेलं.

चार वाजून गेले होते !

डॉ. पटवर्धन सव्वाचार वाजता येणार होते.

बेळगी त्यांच्या येण्याची वाट पहात बसले.

त्यांच्याशी करायच्या संभाषणाची जुळवाजुळव करीत ! □


दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झाली—

## मी नास्तिक का आहे

लेखक : **शहीद भगतसिंग**

किंमत दीड रुपया / व्ही. पी. ची प्रथा नाही.

संपर्क — **मागोवा प्रकाशन**

१२५९/२, जं. म. रस्ता, पुणे ४११ ००४.

‘ माणूस ’ दिवाळी अंकात हा विषय प्रथम आला. दिवाळी अंकातील लेखाच्या शेवटी तारीख दिली होती– ९ ऑक्टोबर १९८०. त्यानंतरचा वृत्तान्त या व यापुढील २।३ अंकांतून येत आहे...

# योद्धा शेतकरी

**लेखांक दुसरा**

लेखन आणि संकलन

**विजय परुळकर**

निफाडच्या सहकारी साखरकारखान्याचे संचालक आणि महाराष्ट्र राज्य साखर संघाचे अध्यक्ष श्री. माधवराव बोरास्ते ह्यांनी ९ ऑक्टोबर १९८० रोजी, एका विशेष सर्वसाधारण सभेमध्ये साडे-पाच हजार सभासदांच्या उपस्थितीत, उसाला १० टक्के उताऱ्याला टनामागे तीनशे रुपये आणि कांद्याला शंभर रुपये क्विंटल भाव मिळेपर्यंत कारखाना चालू करायचा नाही असा ठराव मांडला. ठराव एकमतानं मंजूर झाला. त्याच सभेत असंही ठरलं की २३ ऑक्टोबर-पासून शेतकऱ्यांनी बांधावरचा लढा सुरू करायचा; १ नोव्हेंबरपर्यंत शासनाची प्रतिक्रिया पहायची, इतर जिल्ह्यातील कारखान्यांचा प्रतिसाद पहायचा आणि शेतकरी संघटनेच्या पुढील आदेशानुसार शेतमालाच्या भावाविषयीच्या लढ्याची दिशा ठरवायची

निफाडच्या ह्या सभेनंतर नासिक, धुळे, जळगाव, अहमदनगर ह्या जिल्ह्यामधून ‘ दामाशिवाय घाम नाही – तीनशेशिवाय ऊस नाही ’ आणि ‘ कांद्याला मंदी तर उसाला बंदी ’ अशा घोषणा घुमू लागल्या.

निफाडच्या सभेनंतर शरद जोशी आपले सहकारी शंकर वाघ ह्यांच्यासह वेगवेगळ्या तालुक्याचे दौरे करत होते. महाराष्ट्र शासनाला २३ ऑक्टोबरपासून कारखाने चालू करण्याची घाई झाली होती; पण बहुसंख्य ऊसकरी शेतकरी संघटनेच्या आदेशाशिवाय कारखान्याला ऊस ‘ घालायला ’ तयार नव्हता. अहमदनगर जिल्ह्यात मात्र फुटीरतेचं वारं वाहू लागलं होतं. राजकारण्यांची बांधिलकी पत्करलेल्या काही साखरसम्राटांना शेतकऱ्यांच्या नुकसानीची पर्वा नव्हती. सत्तेवर असलेल्या आणि नसलेल्या, आजी आणि माजी नामदारांची थुंकी झेलण्यासाठी आतुरलेल्या काही संचालकमंडळींनी साम-दाम दंड-भेद वगैरेचा वापर करून आपले कारखाने २३ ऑक्टोबर रोजी सुरू करण्याचा विडा उचलला होता. पण कुणालाच त्यात यश मिळालं नाही. २३ तारखेला महाराष्ट्रातील एकाही साखर-कारखान्याचं गळीत सुरू झालं नाही हे सत्य आहे. शेतकरी संघटनेच्या आंदोलनानं मिळवलेला हा पहिला विजय !

२३ ऑक्टोबरनंतर काही कारखान्यांचे बॉयलर पेटविण्याचे उद्योग काही आमदार, खासदार, नामदार मंडळींनी केले. सुब्रह्मण्यम स्वामी, बबनराव ढाकणे प्रभृतींनी गव्हाणीत उसाच्या मोळ्या समारंभपूर्वक टाकल्या; पण प्रत्यक्षात कुठल्याच कारखान्यात संपूर्ण गळितास सुरुवात झाली नाही ही वस्तुस्थिती. दौंडजवळ नव्यानंच उभारण्यात आलेल्या साडेसात कोटी रुपयांच्या भीमा सहकारी साखरकार-खान्याच्या गळिताचा शुभारंभ माजी मुख्यमंत्री शरदराव पवार आणि आजी मुख्यमंत्री बॅरिस्टर अबदूर रहमान अंतुले ह्यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटामाटानं पार पडणार अशा आशयाची भली मोठी जाहिरात– दोघांच्या हसऱ्या फोटोंसह अनेक वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यात आली. समारंभाच्या दिवशी आजारी पडायचं असं मुख्यमंत्री अंतुलेसाहेब ह्यांनी अगोदरच ठरवलं असल्यामुळं हा भव्य सोहळा पार पडू शकला नाही आणि शरदरावांची ‘ पोझिशन ’ बरीच ‘ ऑक्वर्ड ’ झाली, ही गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे. श्री. शरद पवारांनी ह्या समारंभाचं आमंत्रण स्वीकारलं होतं ह्यावरूनच त्यांची शेतकरी संघटनेविषयीची- शेतकरी आंदोलनाविषयीची भूमिका स्पष्ट झाली होती.

महाराष्ट्रातील बहुसंख्य ऊसकरी शेतकऱ्यानी बांधावरच्या लढ्याचं रणशिंग फुंकलं होतं; पण हिमालयन रॅलीच्या सनसनाटी बातम्या देण्यात गुंगलेल्या आपल्या वृत्तपत्रानी त्याला विशेष महत्त्व दिलं नव्हतं. बळीराजा लढ्यास सज्ज झाला होता त्याच सुमारास महाराष्ट्रातील तीन लाख ऊसतोडणी कामगार आणि गाडीवाल्यानी वेतनवाढीची मागणी केली. मागील वर्षी देखील ऊसतोडणी कामगारानी असाच संप पुकारून काही काळ ऊसतोडणीचं काम स्थगित केलं होतं. त्या वेळी श्री. शरद पवारानी मध्यस्थी करून थोडी वेतनवाढ आणि भरघोस आश्वासनं ह्या उपायानी तडजोड घडवून आणली होती. ह्या खेपेस 'जोशी' बरोबर वाटाघाटी करण्यास तयार नसलेल्या मुख्यमंत्री अंतुलेसाहेबानी मजूरमंत्री तिडके, कामगारनेते आणि साखरकारखानदाराचे प्रतिनिधी ह्याची एक समिती स्थापून ऊसतोडणी कामगार आणि गाडीवाल्याच्या मागणीत अपेक्षेपेक्षा जास्त वाढ मजूर करून शेतकरी आणि शेतमजूर ह्याच्यात फूट पाडण्याचा डाव आखला होता.

२३ ऑक्टोबर रोजी माळेगाव सहकारी साखरकारखान्याच्या बॉयलर प्रदीपनसमारंभाच्या प्रसंगी कारखान्याचे चेअरमन अॅड. एच्. एस्. हिरेमठ ह्यानी उसास तीनशे रुपये भाव मिळावा ह्यासाठी खासदाराना घेराव घालावा अशी सूचना केली. श्री. हिरेमठ म्हणाले—

"उसाच्या दरासंबंधी साखरकारखाने अथवा राज्य सरकार याचेकडे काहीही अधिकार नाहीत. हा प्रश्न सोडविण्याचा अधिकार फक्त केंद्र शासनाकडे आहे. सरकारनं जाहीर केलेला उसाच्या दर महाराष्ट्रावर अन्याय करणारा आहे. वास्तविक महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या खासदारानी त्याविषयी दिल्लीमध्ये आवाज उठविला पाहिजे— शेतकऱ्याना रास्त भाव मिळावा ह्या मागणीसाठी राजीनामा देण्याची तयारी दर्शविली पाहिजे. दुर्दैवाने आपले खासदार ह्या प्रश्नावर मूग गिळून बसले आहेत. महाराष्ट्रातून लोकसभेवर निवडून गेलेल्या ह्या खासदाराना घेरावो घालून त्याचे राजिनामे मागितले पाहिजेत!" चेअरमन एस्. एस्. हिरेमठ ह्याच्या म्हणण्यात बरंच तथ्य होत. त्यानी जर शेतकरी संघटनेचा आदेश मिळेपर्यंत माळेगाव कारखान्याचा बॉयलर पेटवला नसता तर त्याच्या विधानाला वजन प्राप्त झालं असत.

वर्तमानपत्रातून काही साखरकारखाने सुरू होत असल्याच्या फुटकळ बातम्या प्रसिद्ध होत असतानाच शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी ह्यानी एका पत्रकाद्वारे कारखाने सुरू झाल्याचे अध्यक्षाचे दावे खोटे असल्याचं जाहीर केलं, २५ ऑक्टोबर १९८० च्या पत्रकात शरद जोशी म्हणाले, "महाराष्ट्रात एकही साखरकारखाना गळीत सुरू करू शकला नाही. राज्यशासनाने दिलेला आदेश शेतकऱ्यानी एकजुटीने धुडकावून दिला आहे. गळितासाठी ऊस तोडू देण्यास शेतकऱ्यानी नकार दिला आहे. उत्तरप्रदेशप्रमाणे पासष्ट टक्के लेव्हीचा भाव तीन रुपये पंचेचाळीस पैसे ठरविल्यास राहिलेली पस्तीस टक्के साखर पाच रुपये दहा पैसे दराने विकली तरी शेतकऱ्याला रास्त भाव मिळेल. शेतकऱ्याला दहा टक्के उताऱ्याला तीनशे रुपये टन असा भाव दिल्यास उत्पादनखर्च चार रुपये किलो होईल व सरकारने सरसकट या भावाने खरेदी केली तर जास्तीत जास्त पाच रुपये भावाने देशभर कोठेही साखर विकता येईल. १ नोव्हेंबर १९८० पर्यंत शेतकऱ्याच्या दहा टक्के उताऱ्याच्या उसास तीनशे रुपये भाव देण्याबाबत निर्णय झाला नाही तर शेतकरी संघटना नवे आदेश जाहीर करील!" असा इशाराही शरद जोशीनी दिला.

ह्याच सुमारास अर्थशास्त्रज्ञ प्रा. नीलकंठ रथ ह्यानी एका शिबिरात 'भारताची आर्थिक स्थिती' ह्या विषयावर विचार प्रकट करताना म्हटलं, "स्वातंत्र्यानंतर औद्योगिक उत्पादनाचे भाव भरमसाठ वाढले; पण शेतमालाच्या भावात मात्र अगदी अल्प अशी वाढ झाली. विकासयोजनाचा फायदा शहराना आणि श्रीमंतांनाच जास्त मिळाला. गरीब अधिकच गरीब झाला. शेतमालाचा किफायतशीर भाव ठरविण्यासाठी वास्तववादी दृष्टिकोनातून प्रामाणिकपणे नियोजन करण्याची आवश्यकता आहे."

शेतकरी संघटनेचे नेते, कार्यकर्ते, ऊसकरी शेतकरी, ऊसतोडणी-कामगार आणि काही अर्थशास्त्रज्ञ आणि विचारवंत उसाला रास्त भावाची मागणी करीत असताना कोपरगाव येथील सजीवनी साखरकारखान्याच्या सचालक मंडळीनी २३ ऑक्टोबर रोजी थाटामाटानं गळिताचा मुहूर्त केला. मुहूर्ताचा समारंभ झाला; पण प्रत्यक्ष गळितास मात्र सुरुवात झालीच नाही. २६ ऑक्टोबर रोजी कारखान्याच्या कार्यकारी संचालकानी कबुली दिली की, 'टाकळी गटात ऊसतोडणी कामगार गेले असता शेतकऱ्यानी ऊस तोडू दिला नाही.' सजीवनी साखरकारखान्याची क्षमता रोज दोन हजार टनाची; पण पहिल्या चार दिवसात रोज पाच-सहाशे टनापेक्षा जास्त ऊस कारखान्यात येऊच शकला नाही. दोन हजार टनाची क्षमता असताना पाच-सहाशे टन उसावर गळीत चालू ठेवण्याचा अट्टाहास करणं ह्या आडमुठेपणाला काय म्हणाव ? सजीवनी आणि काही इतर कारखान्यानी सत्ताधाऱ्याची मर्जी सभाळण्याखातर २३ ऑक्टोबर रोजी कारखाने सुरू करून शेतकऱ्यांशी गद्दारी केली आणि आंदोलनाच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट त्या परिसरातील आणि महाराष्ट्रातील शेतकरी कधीही विसरणार नाही. बांधावरच आंदोलन शेतकऱ्याला रस्त्यावर आणावं लागल ते अशा गद्दारीमुळे. त्यामुळे ज्यांचं रक्त सांडलं त्या पापाचे धनी अशा कारखान्याचे सचालक ही गोष्ट शेतकरी आंदोलनाच्या इतिहासात कायमची नमूद केली जाईल ! ¤

२७ ऑक्टोबर १९८०. रात्री साडेअकरा-पावणेबाराच्या सुमारास फोनची घंटा वाजली. शरद जोशीचा आवाज कानावर पडला. ते सांगत होते, 'श्रीगोंद्याला आज गोळीबार झाला... एक शेतकरी मरण पावला. श्रीगोंद्याच्या साखरकारखान्याच्या सचालक मंडळीनी दाडगाईनं कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न केला... शेतकरी संघटनेचा मोर्चा कारखान्यावर गेला असता पोलिसांनी लाठीहल्ला केला— गोळीबार केला... आपल्याला ताबडतोब श्रीगोंद्याला गेलं पाहिजे !'

मी ताबडतोब तयार झालो. आमच्याकडे वाहनाची अडचण. माझी गाडी गॅरेजमध्ये. शरद जोशींच्या बुलेटवरून श्रीगोंद्याला जायचं आम्ही ठरवलं. 'माणूस'च्या श्रीभाऊ माजगावकरांना फोन

करून बातमी कळवली. आम्ही रात्री मोटारसायकलनं श्रीगोंद्याला जाणार ही कल्पना श्रीभाऊना अजीबात मान्य नव्हती. त्यानी लगेच आपल्या एका डॉक्टर स्नेह्याला फोन करून आमच्यासाठी एका मॅटॅडोरची व्यवस्था केली. इतक्यात पिंपळगाव बसवंतहून लायटनिंग कॉल आला. माधवराव खंडेराव मोरे ह्याना श्रीगोंद्याच्या गोळीबाराची माहिती समजली होती. रात्री बारा वाजता गाडी घेऊन त्यांनी नासिक सोडलं होतं. पहाटे पाचपर्यंत ते पुण्यात पोहचणार होते.

अठ्ठावीस तारखेला पहाटे आम्ही पुणं सोडलं. गाडीत कुणी कुणाशी बोलत नव्हतं. शरद जोशी गाडी चालवत होते. त्याच्या बाजूला, फ्रंट सीटवर माधवराव खंडेराव मोरे खिन्न चेहऱ्यानं एखाद्या पुतळ्यासारखे निश्चल होऊन बसून होते. मागील सीटवर मी आणि शंकर वाघ सकाळची ताजी वर्तमानपत्रं चाळत होतो.

नऊ ऑक्टोबर रोजी घोषित झालेल्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनाबाबत आतापर्यंत उदासीन असलेल्या वर्तमानपत्रांनी श्रीगोंद्याला रक्त सांडताच मोठाल्या टाइपात भडक बॅनर लाइन्स दिल्या होत्या– श्रीगोंद्यास गोळीबार 'एक ऊस निदर्शक ठार.' गोळीबार, जाळपोळ, हिंसाचार हे प्रकार घडेपर्यंत वर्तमानपत्रे किंवा शासन कुठल्याच गोष्टीची दखल घेत नाही हे सत्य पुन्हा एकदा प्रकर्षानं जाणवलं.

तसं पहाता १५ ऑगस्ट १९८० रोजी शरद जोशींनी उसाच्या भावाविषयी शेतकरी आंदोलन करतील असं जाहीर केलं होतं; पण ग्रामीण जनतेच्या–शेतकऱ्याच्या–मनाचा कानोसा घेण्यास सर्वस्वी असमर्थ असलेल्या बड्या वृत्तपत्रांनी ह्या प्रश्नाकडे सुरवातीला काना डोळा केला आणि त्याबद्दल आश्चर्य वाटून घेण्याचंही कारण नाही. एखाद-दुसरा अपवाद वगळता ही वर्तमानपत्रं शहरवाल्याना आणि सुशिक्षित (?) मध्यमवर्गाला सकाळच्या चहाबरोबर तोंडी लावायला काही तरी सनसनाटी आणि चविष्ट मजकूर देण्यातच स्वत:ला धन्य मानतात. वर्तमानपत्राद्वारे जनजागरण किंवा प्रबोधन हा प्रकार सध्या तरी अस्तित्वात नाही. वृत्तपत्रकारितेची शुचिता हे शब्द कालबाह्य झाले असावेत अशी खात्री काही वृत्तपत्रातील संपादकीय वाचल्यावर पटते. अर्थात कुठं जर गोळीबार झाला, एखादी बस जाळण्यात आली, अश्रूधुराची नळकांडी फुटली किंवा लाठीहल्ला झाला की सगळ्यांच्या फ्रंटपेजवर मोठाल्या बॅनर लाइन्स !

श्रीगोंद्याच्या गोळीबाराची 'आमच्या बातमीदाराकडून' आलेली बातमी छापताना एका वर्तमानपत्रानं (आणि त्या बातमीदारानं) खोटेपणाचा कळस केला आहे ठळक मथळ्याखाली बातमी छापताना हे वर्तमानपत्र म्हणतं– 'जमावानं केलेल्या दगडफेकीत जखमी झालेल्यामध्ये प्रांताधिकारी जं. पी. बुधवंत ह्याचा समावेश आहे.' हाच बातमीदार पुढे म्हणतो, 'वातावरण तंग होत असलेलं पाहून प्रांतअधिकारी जे. पी. बुधवंत यानी जमावबंदीचे १४४ कलम जारी केले... परिस्थिती स्फोटक होत असल्याचे पाहून प्रांतअधिकारी बुधवंत यांनी राखीव पोलीसदलास गोळीबाराचा हुकूम दिला.' ही बातमी धादांत खोटी आहे हे मी सांगण्याची गरज नाही. प्रांत अधिकारी श्री. बुधवंतच तसं सांगतील ! आम्ही २८ तारखेला दुपारी साडेबारा-एकच्या सुमारास कचेरीवर जाऊन श्री. बुधवंत ह्याची भेट घेतली. त्या वेळी ते म्हणाले, 'काल कारखान्याच्या परिसरात दगडफेक होऊन दंगल आणि गोळीबार झाला तेव्हा मी घटनास्थळी नव्हतो. गोळीबार बाराच्या सुमारास झाला– मी अडीच–तीन वाजता तिथं पोहचलो.' (श्री. बुधवंत हे जखमी झाले नव्हते, हे तर त्याच्याबरोबर चहापान करताना आम्हाला स्पष्ट दिसतच होते.)

आम्ही श्रीगोंद्याला पोहचलो आणि सरळ कारखान्यावर गेलो. कारखान्याच्या कंपाउंडबाहेर दोन एस. आर. पी. च्या गाड्या उभ्या होत्या. एका बाजूला ऊस भरलेले दोन ट्रेलर्स उभे होते. त्याच्या चाकातील हवा काढण्यात आली होती. कंपाउंडबाहेरील मैदानात खारपडीचे दगड, विटाचे असंख्य तुकडे पडले होते, मजूर मंडळी घमेली घेऊन दगड-विटा गोळा करून मैदान साफ करीत होती. पुण्यातील आपल्या गोळीबारमैदानापेक्षा हे मैदान सपाट आणि स्वच्छ आहे. शोधून देखील इथं एरवी दगड सापडला नसता. मैदानात विखुरलेले दगड आणि विटांचे तुकडे हे मुळातले मैदानातील नव्हतेच हे पहाताक्षणी ध्यानात येत होत. कारखान्याच्या कंपाउंडच्या आतील बाजूस दगड किंवा विटाचे तुकडे विखुरलेले दिसत नव्हते. उसाच्या टिपऱ्या मात्र पडलेल्या दिसत होत्या. कारखान्याच्या कंपाउंडच्या मुख्य प्रवेशद्वारापाशी असलेल्या केबिन्सच्या सर्व काचादेखील शाबूत होत्या. मैदानातून दगडफेक झाली असल्यास ह्या काचा कशा शाबूत राहिल्या हा प्रश्न बुचकळ्यात टाकणारा होता.

ज्या ठिकाणी निदर्शक गोळी लागून ठार झाला ती जागा मुख्य प्रवेशद्वारापासून तीस-पस्तीस यार्ड लांब होती. सर्व परिसराची पाहणी करून आम्ही श्रीगोंद्याची कचेरी गाठली. तिथं श्री. बुधवंत आणि इतर अधिकाऱ्याशी चर्चा करताना एक गोष्ट स्पष्ट झाली की 'तरुण भारत' चा अपवाद वगळता इतर वृत्तपत्रानी कंट्रोलरूमकडून मिळालेल्या माहितीवरून 'आमच्या बातमीदाराकडून' आलेल वृत्त छापलं होत. 'तरुण भारत'चा वार्ताहर मात्र घटनास्थळी उपस्थित होता असं अनेकाकडून समजलं.

चहापान झालं. प्रांतसाहेबानी माझ्यासाठी तंबाखूचं खास पान मागवलं – त्याचं आभार मानून निरोप घेऊन आम्ही निघणार इतक्यात श्री. बबनराव ढाकणे कचेरीत प्रवेश करते झाले. अघळपघळ हसून श्री. शरद जोशीबरोबर सलगीच्या गप्पा करण्याचा त्यानी प्रयत्न केला. इथं गोळीबारात एक मनुष्य मेला होता ह्याचा त्यांना बहुतेक विसर पडला असावा !

माधवराव खंडेराव मोरेंच्या कपाळावरची शीर तट्ट फुगून ताड-ताड उडत होती. शंकरराव वाघाच्या डोळ्यातून निखारे सांडत होते; पण सर्वश्री बबनराव ढाकणे रुंद हसऱ्या चेहऱ्यानं अघळपघळ बोलत वारंवार टाळीसाठी हात पुढं करत होते. शरद जोशींचा चेहरा हळूहळू कठोर होत चालला–ढाकणेंच्या ते लक्षात आलं नसावं. त्याच्या चवदार गप्पा थांबायच लक्षण दिसेना तेव्हा त्याच्याकडं रोखून पाहात शरद जोशी म्हणाले–

'बबनराव, तुम्ही इथं श्रद्धांजली वाहण्यासाठी आलात हे आश्चर्य आहे. परवा तर तुम्ही स्वत: आणि सुब्रह्मण्यम स्वामी वगैरे मंडळींनी गव्हाणीत उसाच्या मोळ्या टाकून शहाद्याचा कारखाना समारंभपूर्वक सुरू करून दिलात...'

सर्वश्री ढाकणे एकदम सटपटले !

कचेरीतून बाहेर पडल्यानंतर श्रीगोंद्याचे आमदार बबन पाचपुते

ह्यांना शोधण्यात आमचे दीडदोन तास खर्ची पडले. कुणी सांगितलं ते उपोषणाला बसलेत. एक म्हणाला, नगरला गेलेत—काहीच्या मते ते गोळीबारात मरण पावलेल्या नाना चौधरीच्या अत्ययात्रेला गेलेत. शेवटी नाना चौधरीच्या वस्तीवर जाण्याचा आम्ही निर्णय घेतला. प्राताधिकारी बुधवते ह्यानी एक वाटाड्या बरोबर दिला.

¤

—सध्याकाळी पाच-साडेपाचची वेळ. श्रीगोद्याच्या गोळीबारात २७ तारखेला मरण पावलेल्या नाना चौधरीची वस्ती. अंत्ययात्रा सपवून मंडळी नुकतीच परतली आहेत. नाना चौधरीची चिता अजून धगधगते आहे. एका झोपडीवजा झापेखाली पंचवीस-तीस माणसं हरवल्यासारखी बसून आहेत. नाना चौधरीची तीन मुलं रडून रडून लालबुंद झालेले डोळे पुसत एका कोपऱ्यात अंग चोरून, भेदरल्याप्रमाणे उभी आहेत. झापेच्या मागे नाना चौधरीची झोपडी. त्या झोपडीला दार देखील नाही! एक मनुष्य वाकून आत जाऊ शकेल असं नुसतंच भगदाड आहे. त्या झोपडीसमोर नाना चौधरीची विधवा पत्नी—दरुबाई आणि पंचवीस-तीस बायकांचा घोळका सुन्नपणे बसून आहे प्राथमिक विचारपूस झाल्यानंतर माणसं हलके हलके बोलती होऊ लागली आहेत. माधवराव खंडेराव मोरे दूरवर एका एरंडीच्या झाडाखाली बसून नाना चौधरीच्या झोपडीकडं एकटक पाहात आहेत. त्यांच्या मनात भावनाचा काय गदारोळ उठला असेल ह्याची कल्पना न येण्याइतका त्यांचा चेहरा खिन्न आहे. शंकर वाघ अस्वस्थपणे झापेच्या आजूबाजूला येरझाऱ्या घालत आहेत. शरद जोशी संयम ठेवून आहेत तरी त्याच्या आवाजाला किंचित कंप आहे—स्वर जाणवण्याइतका दाटलेला. इतका वेळ मागं बसलेला एक पंचविशीचा तरुण एकाएकी बांध फुटल्यासारखा पोटतिडिकीनं बोलू लागला आहे स्वत.लाच वेटोळे घालत संथगतीनं गोलगोल फिरणारी कॅसेटमधील टेप त्याचा शब्द न् शब्द टिपून घेत आहे—कधी काळी हा आक्रोश कुणाच्या तरी कानी घालावा लागणार ह्याची त्या टेपला जणू जाणीव आहे. पचविशीचा तो तरुण म्हणतोय—

'दगडफेक झाल्यामुळं गोळीबार झाला म्हणता—पण ते दगड कुठले आहेत ते पाहिलेत का? अहो, ट्रॉल्या भरून आणलेले ते दगड आहेत. विहिरीच्या खारफाडाचे दगड आहेत ते. मैदानात तसले दगड नाहीतच. कारखान्याच्या परिसरात असले दगड गावत न्हाईत! मैदान इतकं साफ आहे की, बारकासा खडा देखील गावणार नाही. शेतकऱ्याला फेकायला दगड गावणारच नाही त्या मैदानात. जे दगड फेकले ते बाहेरून आणले होते. कारखान्याच्या मंडळीनी अगोदरच नियोजन करून बाहेरून हे दगड भरून आणून ठेवले होते.

'कारखान्याबाहेर शेतकऱ्यांचा जमाव आणि तरी देखील डायरेक्टरमंडळी आत कारखाना सुरू करण्याचा प्रयत्न करतात ह्याला मनगटशाहीच म्हणावी लागेल! शेतकरी मोर्चा घेऊन आले आहेत मग त्यांचा निर्णय घेतल्याशिवाय कारखाना का चालू करावा?—फार तर समारंभ अर्धा तास लेट झाला असता. कारखाना बंद ठेवा असं काही शेतकऱ्याचं म्हणणं नव्हतं. आमचं निवेदन स्वीकारा, मागण्यांची दखल घ्या एवढंच आम्ही म्हणत होतो.

'कारखाना काही अध्यक्षाच्या किंवा डायरेक्टरबोर्डाच्या मंडळींच्या मालकीचा नाही. आमच्या सर्वांच्या मालकीचा आहे. ह्या अगोदर देखील शेतकऱ्यांनी एकदा मोर्चा काढला होता तेव्हा डायरेक्टरबोर्डानं आपले सालाचे जे गडी होते ते ट्रॉल्या भरभरून आणले होते—मारामाऱ्या करण्याकरता. मनगटशाहीनच इकडचा कारभार चालू आहे. ही कालची तिसरी वेळ. शेतकऱ्यांचं म्हणणं ऐकूनच घ्यायचं नाही असं ठरवलंय ह्या मंडळीनी. काल आमचा मोर्चा गेला तेव्हा सभासद मंडळीची एक सभा घेण्याचा प्रयत्न केला—पण आमचा आमदार बबन पाचपुते बोलायला उठला तर त्याच्या हातातील माईक काढून घेऊन त्याला स्टेजवरून गचाडलं—मग तो आला गेटच्या बाहेर. त्याच्या पाठोपाठ सभासद बाहेर आले—डायरेक्टरबोर्डाच्या खिशातले तेव्हढे आत राहिले.

'आमदार बबन पाचपुते सागत होता की, सभेचा निर्णय लागेपर्यंत कृपा करून तुम्ही कारखाना चालू करू नका; पण चेअरमनची मंडळी म्हणायची—आम्ही सत्तावीस ऑक्टोबरला कारखाना सुरू करणारच. ह्या प्रकारातून शेतकऱ्याच्या बाजूचे कोण आणि मनगटशाहीच्या बाजूचे कोण हे मात्र स्पष्ट झाल

'शेतकऱ्यांनी ह्या वर्षी उसाचा भाव ठरवून मागितला आहे. श्रीगोद्याच्याच नव्हे तर आख्ख्या महाराष्ट्राच्या शेतकऱ्यानी भाव मागितला आहे. त्याचा अजून निर्णय व्हायचा आहे. दरवर्षी कारखाने पंधरा नोव्हेंबरला सुरू होतात. मग यंदाच ऑक्टोबर तेवीसपासून सुरू करण्याची घाई का? शेतकरी सघटनेनं पक्का चोख हिशेब करून दहा टक्के उताऱ्याला तीनशे रुपये भाव मागितला आहे. समजा, हा भाव थोडा जास्त असेल—पण त्याबद्दल चर्चा नको का व्हायला? वाटाघाटी करायला पायजे का नाही?—का एकदम मनगटशाहीनं कारखाना सुरू करायचा? यंदाच एव्हढी घाई का? अगदी एका माणसाचा जीव गेला तरी हरकत नाही—आम्ही कारखाना सुरू करणारच अशी बळजबरी का?'

संतापलेला हा तरुण व्यथित मनान काही रोखठोक सवाल करत होता. त्याला एका गोष्टीची मात्र कल्पना नसावी. चर्चा, वाटाघाटी ह्यातून निर्णय ठरणार अशी वेडी आशा त्यानं मनाशी बाळगली होती. ह्या तरुणाप्रमाणेच लाखो शेतकऱ्याना वाटत असणार की, उसाच्या भावाबद्दल शेतकरी संघटनेच्या नेत्याबरोबर वाटाघाटी करून सरकार लवकरच तडजोड करणार निर्णय घेणार. कामगार पुढाऱ्याच्याबरोबर सरकार नेहमी वाटाघाटी करतं. त्याचप्रमाणे शेतकऱ्याच्या नेत्याबरोबर देखील सरकार वाटाघाटी करील! पण सरकारनं वाटाघाटी करायच्या नाहीत अशी ठाम भूमिका घेतली होती. जरूर पडल्यास बळाचा वापर करायचा, अजिबात 'गय करायची नाही.' अशी ताठर भूमिका मुख्यमंत्री अंतुले ह्यानी स्वीकारली होती आणि समजा बोलणी करण्याची, वाटाघाटी करण्याची, वेळ आलीच तर शरद जोशीना वगळून इतर 'पुढाऱ्याशी' चर्चा करायची असा शासनानं जणू पक्का निश्चयच केला होता. हा शरद जोशी कोण? काय म्हणून त्याच्याशी आम्ही बोलणी करावीत? अशी मदांध भाषा सरकार वापरीत होतं. शरद जोशी कोण? हे शेतकरीच आता सरकारला समजावून सांगणार असं स्पष्ट चित्र सर्वत्र दिसत होतं.

संतापलेला तरुण शेतकरी साखरकारखान्याच्या संचालक मंडळाविषयी बरंच काही सांगत होता. त्याच्या भावनांना आवर घालत

सत्तरीच्या घरातील एक वृद्ध शेतकरी सांगू लागला–

' मी बाराच्या सुमाराला मोर्च्याच्या ठिकाणी गेलो. त्या वेळी दगडफेक चालू होती. मोर्चामधले शेतकरी उसाच्या टिपऱ्या करून फेकीत होते. दगड मारायला ××× आणि ××× अण्णाकडील काही माणसं होती. त्यानी फार भराभरा दगड मारले. स्वत: मी डोळ्यानी पाहिले. आपल्या बबन पाचपुतेबरोबरच्या शेतकऱ्यानी दगड नाही मारले. कारखान्याची दोन बडी माणसं, एकाचे चौधंपाचजण भाऊ, दुसऱ्याचे सात-आठ भाऊ–ह्या दहा-पंधरा माणसानी अत्याचार केलेला मी स्वत:च्या डोळ्यानी पाहिला. त्यांच्या तोंडावर उभं राहून हे सांगण्याची माझी तयारी आहे मला गोळी घालून मारलं तरी हरकत नाही. ह्या प्रत्येक भावाच्या कामावर दहा-दहा, वीस-वीस माणसं आहेत ते सगळेच लागले दगडं हाणायला. ××× बापूचे नऊ जण भाऊ, ××× अण्णाचे पाच जण भाऊ, त्यांचे पंचवीस-तीस गडी ट्रॉली भरून आले होते. दुसरे चाळीस-पन्नास लोक होते.... म्हणजे शे-दोनशे लोकांनी बबन पाचपुतेवर आणि शेतकऱ्यांवर अत्याचार केला. दगडाच्या ट्रॉल्या अध्यक्षाच्या माणसाजवळ–मैदानातल्या शेतकऱ्याकडे दगड नाहीत. मग त्यांनी ट्रॅक्टरमधला ऊस काढून त्याच्या टिपऱ्या केल्या आणि लागले फेकायला.

' दगड आणि टिपऱ्याची हाणाहाणी सुरू झाली तेव्हा गोळीबार झाला. गोळी झाडल्यावर कुणी म्हणालं ' अरं अरं, मेला मेला–चौधरी मेला ! ' आम्ही मग पुढं सरकलो–आणि तिथून पुढं माणसं पांगायला लागली. '

' ज्या फौजदारानं गोळी झाडली त्याच्या अंगावर शेतकऱ्यानी हल्ला केला होता काय ?'

' हल्ला नाही; पण त्याला दगडाचा आणि टिपऱ्यांचा मार बसायला लागला. दगड बसले पाठीमागून; पण त्यानं गोळी झाडली पुढच्या लोकांवर, ×××× अण्णाचा त्यो एक डॉक्टर आहे–तो म्हणे मरू दे, हाणा तिच्या आयला ! दगड हाणणाऱ्याच्या पाठीमागेच मी होतो. खाली मुडदा पडलेला. तरी ह्याचं म्हणणं अजून हाणा ! काय अन्यायाची गोष्ट आहे. मुडदा गाडीत टाकला तरी दगडफेक चालूच–'

शरद जोशी शेतकऱ्याचं सांत्वन करीत त्यांना मार्गदर्शन करीत होते. मी उठून नाना चौधरीच्या विधवा पत्नीच्या शेजारी जाऊन बसलो. महत्प्रयासानं डोळ्यातील अश्रू आवरत, हुंदके दाबत दरूबाईनं काळजात साठलेल्या दु:खाला वाचा दिली–

' आमची आता अशी विकट परिस्थिती होऊन बसली. गरिबाला मोर्चाला चल म्हणाले आणि गेल्यावर गोळी घातली. आता आम्ही हे कुणापाशी सांगावं ? आहे का कुणी ऐकणारं ? आज ह्या घरातला कारभारी मोर्चात गेला तर त्याच्यावर ह्यानी गोळी झाडली–का ?–तर त्यानं आपल्या मालाला भाव मागितला म्हणून ! अहो, शेतकऱ्याच्या मालाला किंमतच नाही. लेव्ही लावून लुटून न्यायचं शेतकऱ्याला, ज्याला ज्वारी घालता आली नाही त्यानं विकत घेऊन लेव्हीची भरपाई केली. बाजारभावानं महाग विकत घेऊन लेव्हीला स्वस्त घातली. तवा मामलेदार हक्कानं मागायला आला. त्येच आज आमच्याकडं ज्वारी आहे तर कुठं गेला ह्या मामलेदार ?'

दरुबाईचं बोलणं मी थक्क होऊन ऐकत होतो श्रीगोंद्याच्या आडरानातील वस्तीवरची एक पन्नाशीची अडाणी (?) बाई शरद जोशीचा विचार स्पष्टपणे मांडत होती. वास्तविक श्रीगोंद्याच्या परिसरात शरद जोशीची एकही सभा झाली नव्हती. तरी देखील शरद जोशीचं नावच नव्हे तर विचार देखील वस्तीवस्तीवर-झोपडी-झोपडीत पोहोचला आहे, त्याचा हा पुरावा होता आणि सत्तेनं आंधळे झालेले आमचे शासनकर्ते म्हणत होते, हा शरद जोशी कोण ? आम्ही काय म्हणून त्याच्याशी वाटाघाटी कराव्यात ? ¤

सरूबाई पुढं सांगत होत्या–

' ह्याच्या खताला मात्र भाव, भुईमुगाच्या बियाणाला भाव; पण भुईमूग विकायला गेलं की त्याला मात्र भाव नाही. शेतकऱ्याला कुणी मानीतच नाही ! खातेउतारा काढायला तलाठ्याकडे चार-चार चकरा मारल्या तरी मिळत नाही गरिबानं जगावं तरी कसं ? खतं महाग. डिझल नाही. रॉकेल नाही. खायाला नाही. दिवसभर काम करावं आणि बिगर तेलाचं कालवण खावं ! आणि ह्यांच्या ढेऱ्या मात्र म्हशीसारख्या सुटलेल्या ! शहरामध्ये कामगाराचं बरं हाये–ते संघटित हायेत ! जरा काय झालं की एकत्र येऊन मालका-बरोबर भांडण काढून आपल्याला पाहिजे ते मिळवून घेतात. मुंबईच्या झाडूवाल्याला हजार-बाराशे पगार मिळतो ! तो लई काम करतो व्हय ? आणि इथ शेतकऱ्याला धड अथरुण-पांघरुण मिळना ! कामगाराची संघटना हाये–शेतकऱ्याची न्हाई–पण आता उसामुळं लागले शेतकरी एकत्र व्हायला–म्हणूनच त्याना गोळ्या घालून मारायला लागलाय सरकार !'

राज्य चालवणाऱ्या नामदारापाशी दरूबाईला देण्यासारखं एखादं उत्तर, आश्वासन आहे का ? का डोक्यावरची झुलपं उडवत हे सवाल करणार–' ही दरूबाई कोण ?'

दरूबाई बोलत होत्या आणि त्यांच्या आजुबाजूला बसलेल्या महिलामधील अस्वस्थता वाढत होती. प्रत्येकीलाच जणू आपल्या मनातील धगधगणारी चीड व्यक्त करायची होती. शांताबाई पवार नावाची एक तडफदार व्यक्तिमत्त्वाची किसानकन्या धारदार आवाजात म्हणाली–

' ह्यांनी एकाला गोळी घालून मारलं म्हणून आता जास्त शेतकरी एकत्र येणार. इथून मागं नव्हते एवढे आता एक होणार आणि शरद जोशीच्या मागं उभं ऱ्हाणार ! शेतकऱ्यानी भाव मागितला की घाला गोळ्या अशी ह्याची नीती; पण आता बायका दिखील मागं ऱ्हाणार नाहीत ! सावरल्याच पायजेत आता बांगड्या ! त्या फुटतील म्हणून कुणी आता घाबरणार न्हाई ! आता घरी बसून काही उपयोग न्हाई, ह्या झोपडीला संभाळून आम्हाला काही मिळणार न्हाई ! आज एक बिचारा लढला आणि गेला ! तो शूर ! ! आज त्याच्या झोपडीला दार न्हाई. इतकी वर्षं राबला; पण झोपडीला साधं कवाड करायची त्याच्याकडं ऐपत नव्हती. आज त्याच्या नावाचं खातं पोराच्या नावावर करायचं तर तलाठी हजार दोन हजार मागतो. ह्याला काय पगार नसतो का सरकारचा ? शेतकऱ्याचं रक्त पितो हा ! कुनाकडं दाद मागायची आम्ही ? ऐकणारं हाये का कुणी सरकारात ?'

ह्या शांताबाई पवारसारख्या हजारो तडफदार स्त्रिया आज महाराष्ट्राच्या खेड्याखेड्यांतून पदर खोचून हेल्मेटधारी एम. आर.

पी. च्या गोळ्या झेलायला भरल्या मळवटानं उभ्या आहेत. आपला घरधनी मोर्च्यात उतरला तर आपल्या भाळीचं कुंकू पुसलं जाईल *किंवा कांकणं फुटतील ह्या भीतीचा लवलेशही त्यांच्या हृदयाला* नाही. धन्याच्या बरोबरीनं लढ्यात उतरायची त्यांची तयारी आहे. अंतुलेसाहेब, बेशक तुम्ही ह्यांना गोळ्या घालून ठार मारा ! काळ्या आईला अंजारून-गोजारून ज्या हातानं सोनं पिकवलं त्या भारत-मातेला खुशाल गोळ्या घालून मारा आणि हरुन-अल्-रशीदप्रमाणं वेशांतर करून इंडियामधील अर्धम्लेच्छ मडमिणीचे कँबेरे बघत शेत-कऱ्यांच्या उघड्यानागड्या पोरासमोर कर्जमाफीचे तुकडे टाका ! हा शरद जोशी कुणी का असेना, भारतीय किसान त्याचे विचार हृदयात साठवू लागला आहे हे सत्य आहे. ह्या किसानाबरोबर त्याची वीरपत्नी आता रणांगणात उतरत आहे. तुम्ही कोंबडं झाकून ठेवलंत म्हणून हा सूर्य उगवायचा थोडाच राहणार आहे ! शरद जोशी ही काळाची गरज आहे–तुम्हाला हे अजून उमजत नाही भारतीय किसानाचं भाग्य ! तुम्ही जितके दिवस गाफील राहाल तितका शेतकऱ्याचा फायदाच आहे.

नाना चौधरीच्या 'वस्तीवरील किसान स्त्रियांचे विचार ऐकून माझ्या मनातील खळबळ शांत होत होती. शेतकरी आंदोलनाच्या अंतिम विजयाविषयी पुसटशी शंकादेखील माझ्या मनात उरली नव्हती. शांताबाई पवार आपल्या धारदार आवाजात सांगत होत्या–

'आम्ही बाया काल काय म्हणत होतो... तुम्ही नका तीनशे रुपये भाव देऊ आमच्या उसाला ! दोनशेच द्या; पण ही जी महागाई आहे ती सगळीच कमी करा ! मग आमच्या उसाला, कांद्याला, भुईमुगाला भाव वाढवून नाही दिला तरी चालेल; पण आज आम्ही भुईमुगाचं बी घेतो कोणत्या भावात आणि भुईमूग विकतो कोणत्या भावात ह्याचा काही हिशेब हाये का न्हाई ? शंभर रुपये क्विंटलनं शेंग घ्यायची आणि तेल मात्र तेरा–चौदा रुपये किलोनं शेतकऱ्याला विकायचं हा काय न्याय झाला का ? एका क्विंटलला किती तेल पडतं ? पण त्याचा कोण विचार करतो का ? भाव मिळेपर्यंत माल साठवणं शेतकऱ्याला जमत नाही. हातावरलं पोट. चलन कमी पडलं की मिळेल त्या भावाला माल विकावाच लागतो ! नाही तर संध्याकाळी भाकरीची अडचण, अहो, बारीक हिशोब करा– उसाच्या लागवडीपासून सगळा खर्च परवडतो का शेतकऱ्याला ? त्याला दोन वेळेला भाकर तरी मिळते का पोटभर खायला ?'

शांताबाई पवार जे सागत होत्या त्या प्रश्नांची थोडीफार जाण मला शरद जोशींच्या सहवासात आल्यापासून झाली होती. शांताबाईंचं सर्व म्हणणं पटत होतं; पण 'इंडिया' मधील माझ्या परिचयातील *ग्रामीण विकास क्षेत्रात काम करणाऱ्या काही विचार*-वंतांची आठवण येऊन मी नकळत बोललो–

'आमच्याकडे शहरात काही अशी शिकलीसवरलेली शहाणी माणसं आहेत की त्यांना वाटतं शरद जोशी ऊसवाल्या शेतकऱ्याचे आंदोलन उभं करतात म्हणजे बड्या बागायतदार शेतकऱ्याचं नेतृत्व करतात ! शहरातल्या ह्या मंडळीचं म्हणणं आहे की ऊसवाला शेतकरी म्हणजे गबरू. श्रीमंत. त्याची बायको दागदागिन्यांनी मढलेली असणार !'

शांताबाईंच्या डोळ्यात अंगार फुलला. माझं बोलणं मध्येच तोडून, छातीवरचा पदर दूर सारत, गळ्यातील काळ्या मण्यांची पोत दाखवत त्या कडाडल्या–

'*अहो, साधं मंगळसूत्र मिळत न्हाई– मंगळसूत्र ! दागिन्यांच्या* कसल्या गोष्टी सांगता आणि नानाची ही झोपडी बघताय न्हवं–बिन कवाडाची–'

'अहो, पण आमच्या शहरातल्या लोकाना हे माहीत नाही.'

'तुमच्या शहरच्या लोकाना म्हणावं, उसातनं नुसतं चालून दाखवा– त्यांच्या नाजूक कातड्याची चाळण व्हईल! काय म्हाईती ह्या शहरच्या लोकाना ! त्यांना वरण चपात्या खायची सवय– थं भाकरीला लावायला चटणी आहे का नाही हे त्यांना काय कळणार !'

¤

नाना चौधरीच्या वस्तीवरून आम्ही निघालो तेव्हा सूर्य मावळ-तीला आला होता. आकाश रक्ताळलं होतं. नाना चौधरीच्या सांडलेल्या रक्ताचा एक थेंब सूर्यबिंब होऊन, बिनकवाडाच्या झोपडी-मागे पश्चिम क्षितिजावरून खाली सरकत होता. त्याच्या तांबूस प्रका-शानं सर्वांचे चेहरे पेटून उठले होते.

वाटेत पुन्हा श्री. बबनराव ढाकणे भेटले. नानाच्या वस्तीवर ते चालले होते. आम्ही आमदार बबनराव पाचपुतेंच्या शोधात आहोत असं समजताच ढाकणेसाहेब म्हणाले–

'पाचपुते नगरला गेले आहेत. मी पण इथून नगरलाच जाणार. तिथं आम्ही दोघं श्रीगोंद्याच्या गोळीबाराबाबत प्रेस कॉन्फरन्स् घेणार आहोत. तुम्हीसुद्धा नगरलाच या. माझ्याकडे रात्रीचा मुक्काम करा, जेवा. तिथं सर्वांची गाठ पडेल!'

मी शरद जोशींना विनंती केली की नगरची सडक पकडण्या-अगोदर आपण पुन्हा एकदा श्रीगोंद्यामध्ये चौकशी करू ! तिथं पाचपुते आपल्याला भेटण्याची शक्यता आहे ! 'शरद जोशींनी होकार दिला.

बबनराव पाचपुते आम्हाला श्रीगोंद्यात भेटले. ते शरद जोशींची वाटच पहात होते. नगरला जाण्याचा किंवा श्री. ढाकणेंच्या बरो-बरीनं तिथं प्रेसकॉन्फरन्स घेण्याचा त्यांचा इरादा नव्हता. इतकंच नव्हे तर मढेवडगाव इथं पाचपुतेंनी शरद जोशींची एक जाहीर सभाही आयोजित करून ठेवली होती.

आहे की नाही गंमत !

मी माझ्याच विचारात हरवलो होतो. बबनराव पाचपुते शरद जोशींना गोळीबाराविषयी सांगत होते–

'श्रीगोंद्याच्या गोळीबाराबद्दल 'तरुण भारत'मधे जी बातमी *छापून आली ती सत्य परिस्थितीला धरून आहे. साडेअकराच्या सुमा*-रास आम्ही मोर्चा घेऊन कारखान्यावर गेलो. पोलिसानी सांगितलं की कंपाउंडच्या बाहेर तुम्ही सभा घ्या ! त्याप्रमाणे आम्ही सभेला सुरुवात केली. मिनिस्टर चार वाजता गळिताच्या उद्घाटनाला येणार होते. आम्ही सबइन्स्पेक्टरला सांगितलं की तोपर्यंत आम्ही निवांत सभा घेऊ, जमल्यास आमच्यासाठी पिण्याच्या पाण्याची सोय करा !' आम्ही एक निवेदन तयार केलं आहे ते चेअरमनला किंवा मंत्र्याला देण्याची व्यवस्था करा. चेअरमन सभेला येणार असतील तर उत्तमच !

'आमची सभा चालू असताना एक ट्रक आणि काही ट्रॅक्टर ऊस घेऊन काटयाच्या बाहेर येऊन थांबले. हे ट्रक आणि ट्रॅक्टर डायरेक्टर मंडळीचे असावेत. आम्ही पोलिसाना सागितलं की आमचं निवेदन चेअरमनला किंवा मंत्र्याला दिल्याशिवाय ट्रक काटयावर चढवू नका! कारण आता आलेला ट्रक किंवा ट्रॅक्टर ह्याच्यातील उसामुळे कारखान्याचा पूर्ण गळित हंगाम सुरू होणार नाही. मजूर देखील संपावर आहेत. आमचं निवेदन मंत्र्याना किंवा चेअरमनला पोहोचे पर्यंत ट्रक-ट्रॅक्टर हलू देणार नाही, असं पोलिसानी आश्वासन दिलं.

त्या वेळी चेअरमन आणि व्हाइस चेअरमन पुढं आले. म्हणाले, कोण आडवं येतं बघू! आणि त्यांनी जबरदस्तीनं काटयावर ट्रक चढवला. माझे काही अनुयायी ट्रक अडविण्यासाठी पुढे झाले-पण त्यांना गचाडून बाजूला काढून दुसरी ट्रक देखील काटयावर चढवून-दोन्ही ट्रक कारखान्यात नेण्यात आले कार्यकर्त्यांनी विचारलं, 'आम्ही शांततेनं निवेदन देत असताना तुम्ही असं का करता?'

चर्चा करण्यासाठी आम्ही वीस लोक कारखान्यात पाठवले-बाकीची सभा चालू होती. ह्या वीस कार्यकर्त्यांना संचालक मंडळीनी दम देऊन बाजूला काढल आणि त्याच वेळी आतल्या बाजूनं (व्हाइस चेअरमनचा एक ट्रॅक्टर ट्रॉली लावून उभा होता-त्या ट्रॉलीत दगड भरले होते). दगडाचा पाऊस सुरू झाला. कारखान्याबाहेर कंपाउंड-जवळ उभ्या असलेल्या पोलिसावर आणि मैदानातील शेतकऱ्यांवर दगडाचा मारा सुरू झाला. त्याच वेळी पोलिसानी मैदानातील शेतकऱ्यांवर जोरदार लाठीमार सुरू केला. आम्ही लाठीहल्ल्याचा निषेध करून सभा चालू ठेवण्याचा प्रयत्न केला.

उसाच्या दोन ट्रक आत गेल्याच होत्या. आम्ही विचारलं की उद्घाटन-समारंभ चार वाजता आहे-त्याअगोदर तुम्ही कारखाना सुरू करणार नाही ना? संचालकांनी सागितलं, चारच्या अगोदर सुरू होणार नाही. त्याच वेळी आमच्या काही कार्यकर्त्यांनी आतून निरोप आणला की पूजा होऊन गव्हाणीत मोळी टाकण्याचं काम चालू झालं आहे. आम्ही म्हटलं-इथं मैदानात सगळे सभासद जमले आहेत, समारंभाला आम्हा सर्वांना तुमचं रीतसर आमंत्रण आहे. सभासदांना आत सोडा. बिगरसभासद मंडळी बाहेर थांबतील!

पण त्यांनी फक्त आपल्या मर्जीतील सभासदांनाच आत सोडलं आणि आम्हाला बाहेर रोखून धरलं. आम्ही म्हटलं कारखाना काही तुमच्या एकटयाच्याच मालकीचा नाही. ज्याच्याकडे निमंत्रणपत्रिका आहे त्या सर्वांना आत सोडा! पण ते ऐकेनात. तेव्हा आम्ही शेतकरी संघटनेच्या घोषणा देऊ लागलो.

त्या वेळी कारखान्याच्या आतून पुन्हा दगडाचा वर्षाव सुरू झाला. इतका वेळ शात असलेले शेतकरी घाबरले आणि जीव घेऊन पळू लागले. मैदानाच्या दुसऱ्या बाजूला, एका कोपऱ्यात पाच-पन्नास माणसं दगडानी भरलेली ट्रॉली घेऊन उभी होती. त्यानी दगडफेक सुरू करून आम्हाला बरोबर मधे गाठल. दोन्ही बाजूनी दगडफेक आणि पोलिसाचा लाठीहल्ला अशा कात्रीत शेतकरी सापडले. काही शेतकरी ट्रॉलीमधील ऊस काढून त्याच्या टिपऱ्या करून फेकू लागले.

शिंदे इन्स्पेक्टरला एक टिपरी लागली. त्यानी लगेच 'फायर!' अशी ऑर्डर दिली. मी त्याच्या जवळच होतो. त्यांना मी म्हणालो-तुम्ही सबइन्स्पेक्टर आहात. तुम्हाला फायरची ऑर्डर देण्याचा अधिकार नाही! तुम्ही अजून १४४ लागू केल नाही आणि तरी लाठी-हल्ला करताय हेच चुकीच आहे. मॅजिस्ट्रेटची परवानगी नसताना फायर करू नका! मी सर्व लोकाना शात करतो. कोण लोक दगड फेकताहेत ते मला पहायच आहे-असं सागून ज्या विशिष्ट कोपऱ्यातून दगड पडत होते त्या बाजूला मी निघालो. 'दगड फेकणाऱ्याना जागेवर धरा!' अशा सूचना मी देत होतो-शेतकऱ्यानी दगड फेकणाऱ्या दोघा-तिघाना त्याप्रमाणे धरले देखील होते-इतक्यात पाठीमागून फायरिंगचा आवाज आला.

वास्तविक फायर करणार नाही असा मला शब्द त्यानी दिला होता मी ताबडतोब मागे वळलो माझ्या समक्ष शिंदे फौजदार गोळ्या झाडत होते एका मुलाच्या पायाला गोळी लागून तो खाली पडला. मी त्याला सावरलं-एक गोळी नाना चौधरीना लागली. ते जागीच पाणी-पाणी म्हणत पडले!

शिंदे फौजदार फायर करत पुढे पळत होते त्या वेळी अरुण पाचपुते ह्या तरुणाने पाठीमागून येऊन त्याचा शर्ट धरला, पिस्तुलाच्या हात पकडला आणि फायरिंग थांबवल-शिंदे फौजदार मग तिथून निघून गेले. तोपर्यंत प्रांतसाहेब बुद्धवत तिथं नव्हते. ते उशीरा आले...' ¤

शतकानुशतकं केवळ गुराढोराप्रमाणे राबणारा शेतकरी शरद जोशीच्या विचारान जागृत होऊन माणूस म्हणून जगण्यासाठी जमिनीवर खिळलेली नजर नुसती वर करू पहात आहे-पण प्रस्थापितांना त्यानी असं नजर वर करून पहाणं देखील मान्य नाही. शेतकरी म्हणजे दोन पायाचं जनावर-मेंदू असून त्यानं विचार करायचा नाही, डोळे असून त्यानं पहायच नाही, वाचा असून बोलायचं नाही. गुलामगिरीचं जू मानेवर घेऊन त्यानं फक्त मरेस्तोवर कष्ट उपसायचे.

शेतकऱ्याला देखील वाटायचं-आपलं नशीबच असं! आपलं जीवन हे असच कष्ट उपसण्यासाठी. निवडणुकीच्या वेळी ढेरपोटया पुढाऱ्यानी आश्वासनाचा कडबा समोर टाकला की मतपेटीत मतपत्रिका टाकेपर्यंत तो चघळत दिवास्वप्नं पहायची. निवडणुका संपल्या; ढेरपोटे निवडून आले की पुन्हा माना खाली घालून, पुढील निवडणुका येईपर्यंत मरमर राबायचं; पण हे असं सतत चालू राहणं निसर्गनियमाला धरून नाही. कालचक्राचा हा गुणधर्म नाही. ज्याना कालचक्राच अस्तित्वच मान्य नाही त्याच्याशी आपला वाद नाही; पण जे कालचक्राला मानतात त्याना हे दशक शेतकऱ्यांचं आहे ह्याची जाणीव झाली असणार!

प्रत्येक सभेमध्ये शरद जोशी शेतकऱ्यांना सांगत होते-'सरकार तुम्हाला काय वाटेल ते देईल; पण शेतमालाचा संपूर्ण उत्पादनखर्च भरून निघेल असा भाव सहजासहजी देणार नाही-' तेव्हा काही शेतकऱ्यांना वाटलं असेल की जोशी उगाचच ह्या गोष्टीचा बाऊ करीत आहेत. एकदा उत्पादनखर्च मान्य केला की तो भरून निघेल असा भाव न देण्याइतकं आपलं मायबाप सरकार निष्ठुर असणं कसं शक्य आहे? सरकार तर म्हणतं की आमचे सर्व कार्यक्रम ऐंशी टक्के जनतेच्या म्हणजेच शेतकऱ्याच्या हितासाठीच आखलेले आहेत!-त्यानी असं आश्वासन दिल्यामुळेच आम्ही त्याना निवडून देतो-

मग ते आमच्या शेतमालाला किफायतशीर भाव देणार नाहीत हे कसं शक्य आहे ?

स्वातंत्र्य मिळून तेहतीस वर्षे झाली तरी आपले दारिद्र्य का हटत नाही हे कोडं ऐंशी टक्के भारतीयाना म्हणजेच शेतकऱ्याना उलगडत नव्हत. सरकार आपल्याला इतक्या सवलती देत, सबसिड्या देतं तरी आपण कर्जबाजारीच ! महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्याना तर आपली ५९ कोटी रुपयाची कर्जे माफ करण्याची वेळ येते– 'जळो जिणे लाजिरवाणे !'

पण तेहतीस वर्षांनंतर ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्यानंतर तेहतीस वर्षे उलटल्यावर शरद जोशी नावाचा एक मनुष्य आपल्या चैन, मौजा, आपला ऐषआराम, आपली 'करिअर' यावर पाणी सोडून देऊन 'चाकण'च्या कांद्याच्या आंदोलनाच्या निमित्तानं झोपी गेलेल्या बळीराजाला जागं करतो, पहाता पहाता बळीराजा आळस झटकून उठतो.

त्याच्या लक्षात येत की आपला वाटाड्या एक निखळ प्रामाणिक माणूस आहे. त्याला स्वार्थ नाही. कुठल्याही पक्षीय राजकारणाचा त्याच्या विचाराला स्पर्श झालेला नाही. तेव्हा आळस झटकून जागा झालेला बळीराजा सावधचित्त होतो. शरद जोशी हा त्याला एक अनोखा अनुभव असतो. ह्यापूर्वी असा माणूस त्यानं पाहिलेला नसतो !

¤

गाडी मढेवडगावला पोहचली तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. हजारो शेतकरी 'शरद जोशी झिंदाबाद'च्या घोषणा देत होते. मढेवडगावची ही शोकसभा होती. हुतात्मा नाना चौधरीची चिता अजूनही धुमसत असणार !

आमदार बबन पाचपुतेनी सभेचं प्रास्ताविक करताना स्पष्ट शब्दात जाहीर केलं, 'शेतकऱ्याना शेतमालाला रास्त भाव मिळाला पाहिजे ह्या मागणीसाठी मी माझ्या आमदारपदाचा राजीनामा तर देईनच; पण पक्षाचा देखील देईन !' त्यानंतर माधवराव खंडेराव मोरे बोलायला उभे राहिले– हा बलदंड किसान बोलायला उभा राहिला की शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर सर्वात प्रथम एक प्रश्नचिन्ह उमटतं– हा कोण ? आणि माधवरावांची पाचदहा वाक्यं कानी पडताच त्याच्या चेहऱ्यावरील प्रश्नचिन्ह विराम पावतं. एवढंच नव्हे तर पहाता पहाता श्रोता मंत्रमुग्ध होतो. माधवराव खंडेराव मोरे बोलतात ते तर 'प्रचितीचे बोल'– त्यांच्या प्रत्येक शब्दाला शेतकऱ्याच्या दृष्टीनं अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होतं.

स्वतःच्या भावनाना आवर घालून माधवराव श्रोत्याना सांगत होते–

'मित्रहो, आजच्या सभेचं दु:ख मी ह्यापूर्वीही भोगलेलं आहे. तुमच्या इथं काल एकजण बळी पडला, माझ्या पिंपळगाव बसवंतमध्ये माझे दोन तरुण जोडीदार गेले! त्यापैकी एकाचा तर वंश बुडाला. तुमचं दुःख मी पूर्णपणे जाणतो.

'लाठ्यांचा मार खाऊन, बंदुकीच्या गोळ्या खाऊन शेतकरी गुरासारखा ओरडतोय; पण त्याची कुणाला दयामाया नाही रे !– त्याचा आक्रोश कुणाच्याच कानी पडत नाही ह्याच दुःख पोटात मावत नाही !

'श्रीगोंद्याला गोळीबार झाला. एक शेतकरी मेला– ही बातमी कळल्यापासून चित्त ठिकाणावर राहिलेलं नाही. अरे, आम्ही काय मागतोय ह्यांच्याजवळ ? साखर करायला जेव्हढा खर्च येतोय तेव्हढे पैसे तरी द्या हे सांगायला तुम्ही कारखान्यावर गेलात, हे सांगायचा तुम्ही प्रयत्न केलात तर तुमच्यावर लाठीहल्ला आणि गोळीबार होतो !– मला तर काहीच समजत नाही.

'मी म्हणतो– अरे चार रुपये खर्च येतो साखरेला तेव्हढा तरी द्या ! पण हे देतात दोन रुपये बारा पैसे !! जगात एव्हढा अन्याय कुणावर झाला नसेल !

'बबन पाचपुते मोर्चा घेऊन गेला ह्यात त्याच काय चुकलं ? मित्रहो, घाबरू नका ! आपण सगळ्यानीच जायची तयारी ठेवू या. आमच्या भागात हिम्मत सुटलेली नाही ! तुम्हाला वाटत असेल की श्रीगोंद्याचा शेतकरी गेला...पण मी समजतो माझ्या घरातला माणूस गेला !

'सावध व्हा !– सरकारनं आपलं आंदोलन चिरडून टाकण्याचे प्रयत्न चालवलेत हे ध्यानात ठेवा ! आज दुर्लक्ष केलंत तर मरणार आहात ! लढाई फार मोठी आहे. आता माणसं मरायला लागली आहेत, पाच टन, दहा टन असा ऊस कमी भरेल ह्याचा आता विचार करू नका ! तुमच्या शंभर टन उसामधील पासष्ट टनाची तुम्हाला दिडकीदेखील मिळत नाही. उलटा घाटा घालावा लागतोय !

'वीस वर्षं ह्या हरामखोरानी रुपयाच्या जागी आपल्याला आठ आणे देऊन आपलं पासष्ट टक्के उत्पादन लुटून नेलंय... तरी आपण मेलो नाही. कसं तरी जगलोय ! मग यंदाच्या पिकाला पंधरावीस दिवस लेट झाला म्हणून काय होणार आहे ?– हिम्मत ठेवा !–'

माधवराव खंडेराव मोरेंच्या भाषणात मढेवडगावचा शेतकरी देहभान हरवून बसला. माझीदेखील तीच अवस्था झाली. शरद जोशी बोलायला उभे राहिले. त्यांचा आवाज कानी पडला आणि मी भानावर आलो. त्यांच्या आवाजाला आज एक वेगळी धार होती, सभेत विलक्षण गांभीर्य पसरल होत. शरद जोशी म्हणत होते–

'...जवळजवळ पन्नास वर्षांपूर्वी, जेव्हा आपल्या देशावरती इंग्रजाचं राज्य होतं तेव्हा, जालियनवाला बागेमध्ये भरलेल्या एका सभेवर इंग्रजाच्या पोलिसानी आणि लष्करानी चारी बाजूनी वेढा घालून गोळीबार केला, शेकडो भारतीय नागरिक गोळीबारात बळी पडले !

'आम्हाला तेव्हा वाटायचं– इंग्रजाचं राज्य आहे, ती बोलूनचालून परकी माणसं आहेत. आपण स्वातंत्र्याची मागणी करतो आहोत, त्यानी भारतामधून निघून जावं असं म्हणतो आहोत, त्यामुळे ते आमच्यावर गोळ्या झाडणं स्वाभाविक आहे.

आमची माणसं तेव्हा मेली– पण समोरचा माणूस आपल्याला गोळी मारतो ह्याबद्दल तेव्हा कुणाला आश्चर्य वाटलं नाही; कारण गोळी मारणारा परकीय होता– आमचा शत्रू होता. तो आमच्यावर गोळ्या झाडणारच !

पण काल,... श्रीगोंद्याच्या कारखान्याच्या मैदानात सभा घेणारे शेतकरी शत्रूसमोर गेले नव्हते. कारखान्याचे आज जे संचालक आहेत, अध्यक्ष आहेत, त्याना शेतकरी सांगत होते की हा कारखाना आम्हा सर्वांचा आहे, सर्वांच्या फायद्याकरता चालायचा आहे. पण ज्या

# आडसाली उसाचा एकरी उत्पादनखर्च

आडसाली उसाच्या उत्पादनखर्चाचा खालील तपशीलवार तक्ता प्रकाशित करण्यासाठी श्री. प्रल्हादराव नामदेवराव पाटील, कराड, उपाध्यक्ष निफाड सहकारी साखरकारखाना व श्री. मानसिंगराव जाधव बी. एस्. सी. (अॅग्रि.) एन्. एस्. आय. मॅनेजिंग डायरेक्टर, निफाड सहकारी कारखाना यानी परिश्रम घेतले व माहिती पुरवली. या तक्त्याची तात्रिक जबाबदारी अर्थातच शेतकरी संघटनेची आहे.

## ३) भांडवली गुंतवणूक

१) शेतजमीन मध्यम काळी बारमाही पाण्याची सोय असलेली — रु. १५०००–००

२) अंदाजे दहा एकरासाठी विहीर, टाकी, मोटार, इंजिन, नलिका, व्यवस्था इत्यादी याचा भांडवली खर्च रु. ८०००–०० एकरी गुतवणूक. — रु. ८०००–००

३) ट्रॅक्टर, ट्रॉली, त्याची अवजारे एकूण अंदाजे वीस एकरासाठी भांडवली गुंतवणूक रु. ११५०००–०० एकरी गुतवणूक — ५७५०–००

४) बैलजोड्या दोन, एकूण ६ एकरासाठी, भांडवली गुंतवणूक रु. १००००–०० एकरी गुंतवणूक — रु. ५००–००

५) ट्रॅक्टरसाठी शेड, बैलाचा गोठा, साठवणाची जागा याच्यासाठी एकरी गुतवणूक. — रु. १०००–००

६) इतर भांडवली गुतवणूक बैलगाड्या, टिकाव, फावडे, खुरपी, कुदळी, घमेली, पहारी, कुऱ्हाडी, विळे, कोयते, दोर वखर, नागरी, सपाट्या, पाभारी, पासां वसू वेसणी शिवळा जोते साखळ्या, स्प्रेपंप, डस्टर, पंप इत्यादी याजवरील एकरी गुतवणूक — रु. ५००–००

एकूण भांडवली गुतवणूक रु. ३०७५०–००

## ब) भांडवली गुंतवणुकीवरील चालू खर्च

१) जमिनीच्या किंमतीवर इतर गुतवणुकीत सहज मिळाले असते असे उत्पन्न (opprtunity cost) रु. १५०००–०० वर १० टक्के दराने १८ महिन्यांसाठी — रु. २२५०–००

२) भांडवल गुंतवणुकीतील कलमे अ २) ते अ ६) रु. १५७५०–०० याजवरील १२ टक्के दराने १८ महिन्याचे व्याज — रु. २८३५–००

३) भांडवल गुतवणूक कलमे अ २ ते अ ६) रु. १५७५०–०० याजवरील १० टक्के दराने १८ महिन्याचा घसारा — रु. २३६२–५०

एकूण भांडवली गुतवणुकीवरील चालू खर्च — रु. ७४४७–५०

## क) जमिनीची पूर्वमशागत

१) नांगरट ३ पाळ्या निव्वळ डिझेल तेल व मजुरी याचा खच — रु. १५०–००

२) हॅरो मारणे ३ पाळ्या वरील प्रमाणेच खर्च — रु. १००–००

३) बैलाकडून होणारी वखर पाळ्या सपाट्याच्या पाळ्या — रु. ६०—००

पूर्व मशागतीचा एकूण खर्च रु. ३१०—००

## ड) लागवड

१) ३ टन बियाणे रु. २०० दराने — रु. ६००–००

२) जमिनीची फळी मारून सरी पाडणे आणि लागवड याचा खर्च — रु. २५०–००

लागवडीचा एकूण खर्च रु. ८५०–००

## इ) मशागत

१) कट व दाड भरणे, पाट तासणे — रु. २५–००

२) ४ ते ५ निंदण्या — रु. ४८०–०२

३) खाणणी बैलाकडून अंतर्मशागत — रु. २२५–००

मशागतीचा एकूण खर्च रु. ७३०–००

## फ) खते वरखते इत्यादी

१) शेणखत अथवा हिरवळीचे खत — रु. १५००–००

२) ताग लावून जमिनीत गाडणे — रु. १००–००

३) युरिया १०० किलो — रु. २००–००
सु फॉस्पेट २०० किलो — रु. १७५–००
मिश्रखते १२५० किलो — रु. २२५०–००

४) खत लावणी औषध फवारणी मजुरी — रु. १००–००

५) औषधे — रु. १००–००

एकूण खर्च रु. ४४२५–००

## ग) इतर खर्च

१) पाणीपट्टी पाणीपुरवठा — रु. १३००–००

२) हत्यार अवजाराची दुरुस्ती — रु. १००–००

३) व्यवस्थापन ७५ रु. प्रति हेक्टरप्रमाणे १८ महिन्याचे एका एकराचे — रु. ५४०–००

४) शिक्षणकर रोजगार हमीकर वगैरे — रु. १२५–००

५) चालू खर्चासाठी लागणाऱ्या खेळत्या भांडवलावरील रु. ८३८० चे १८ महिन्याचे व्याज १२ टक्के दराने — रु. १५०८–००

एकूण खर्च रु. ३५७३–००

## आडसाली उसाचा उत्पादन खर्चाचा तपशील

अ) व ब) भांडवली गुतवणुकीवरील चालू खर्च — रु, ७४४७–००

क) फ) पीक खर्च — रु. ६३१५–००

ग) इतर खर्च — रु. ३५७३–००

एकूण उत्पादन खर्च रु. १७३३५–००

गृहीत उत्पन्न आडसाली व खोडवा धरून ६० टन

टनामागे उत्पादन खर्च रु. $\frac{१७३३५–००}{६०}$ — रु. २८८–९०

शेतकरी संघटनेची भावाची प्रतिटन — रु. ३००–००

शेतकऱ्यास दर एकरी दरवर्षी सुटणारा फायदा

$\frac{१२ \times (३००–०० \; २८८–९०) \times ६०}{१८}$ — रु. ४४४–००

तऱ्हेनं सरकार आज कारखान्यातून साखर जबरदस्तीनं घेऊन जात त्यामुळे शेतकऱ्याला खर्चापैकी निम्मी रक्कम सुद्धा पदरात पडत नाही. म्हणून महाराष्ट्रातील शेतकरी एक झाला आहे, संघटित झाला आहे. उसाच्या शेतमालाचा पहिला लढा देतो आहे. तर कृपा करून ह्या वेळी शेतकऱ्याविरुद्ध जाऊ नका!

– तुम्ही संचालक आहात, अध्यक्ष आहात–पण तुम्ही कारखान्याचे मालक नाही! शेतकऱ्यांनी तुम्हाला निवडून दिलं आहे. सहकारी साखरकारखान्याचे मालक आहेत सभासद शेतकरी! तेव्हा सगळ्या सभासदांचा विरोध असताना कारखाना सुरू करण्याची घाई करू नका!

– एव्हढी साधी मागणी कालच्या सभेत करण्यात आली; पण संचालक मंडळाला कारखाना सुरू करण्याची इतकी घाई झाली की गोळ्या घालून, माणूस मारून, कारखाना सुरू करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

मी मुद्दामच जालियनवाला बागेचा उल्लेख केला. पन्नास वर्षांपूर्वी इंग्रजानी जितक्या निर्घृणपणे गोळ्या चालवल्या तितक्याच दुष्टपणे शेतकऱ्यावर आज गोळ्या का चालविण्यात येतात?

आम्ही तर आमचा देश स्वतंत्र झाला असं समजतो! सरकार आमचं आहे! पोलीस आमचे आहेत! – मग इतक्या साध्या गोष्टी-साठी लगेच गोळीबार करून शेतकरी का मारला जातो?

"ह्याचं उत्तर फार महत्त्वाचं आहे. ध्यानात घेण्यासारखं आणि लक्षात ठेवण्यासारखं आहे! इंग्रजाचं राज्य संपलं तरी भारताची गुलामगिरी अजून संपली नाही, इंग्रज गेले पण 'इंडिया'वाले भारताचे राज्यकर्ते झाले.

सत्तेचाळीसमध्ये आपल्याला स्वातंत्र्य मिळालं असं आपण म्हणतो! – सत्तेचाळीस सालानंतर शेतकऱ्याला भाव मिळू लागले का? – नाही! मग इंग्रज गेले त्याचा फायदा काय झाला? काहीही नाही! गोरे इंग्रज गेले, काळे इंग्रज आले आणि शेतकऱ्याच्या शेतमालाला भाव द्यायचा नाही हे धोरण कायम राहिलं.

इंग्रजाच्या काळात आपल्यावर गोळीबार होत असे; पण आता का होतो ह्याबद्दल मुळीच आश्चर्य वाटून घेऊ नका. आपल्यावर असा गोळीबार होणारच! – कारण ही 'इंडिया'ची माणसं आपली नव्हेत. म्हणूनच ती भारतीय शेतकऱ्यावर आजही गोळीबार करतात!

आज मी हुतात्मा नाना चौधरीच्या वस्तीवर गेलो होतो. त्यांच्या पत्नी म्हणत होत्या– अहो, स्वराज्य मिळून तेहत्तीस वर्षे झाली; पण आमच्या झोपडीला कवाड नाही! धड छप्पर नाही!! – परिस्थिती अत्यंत बिकट! तरी त्या माउलीनं आपल्या नवऱ्याच्या बलिदानाचा धक्का धीरानं सोसलाय!

नाना चौधरीच्या वस्तीवरली परिस्थिती आणि एखाद्या शहरा-तील परिस्थिती ह्याची तुलना अभ्यासण्यासारखी आहे. नाना चौधरीच्या खेड्यावर–वस्तीवर जाता देखील येत नाही. साधा रस्ता देखील नाही तिथपर्यंत पोहचायला! – मग इतर सोयी सोडाच. त्याच्या उलट कुठल्याही शहरात बघा– सगळ्या सोयी, सगळी संपन्नता! – त्या संपन्न शहराचं नाव इंडिया आणि हुतात्मा नाना चौधरीसारख्या शेतकऱ्याचा जो देश आहे– तो म्हणजे 'भारत!'

आज श्रीगोंद्याला जालियनवाला बागची जी सुरुवात झाली त्याचा अर्थ एव्हढाच की अजूनही 'भारत' स्वतंत्र झाला नाही!

शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळू नये असं ज्यानी ठरवलं त्याचंच राज्य अजूनही चालू आहे... पण ज्या दिवशी जालि-यनवाला बाग घडलं त्याच दिवशी इतिहासात नमूद करण्यात आलं की इंग्रजांचं राज्य आता जास्त काळ टिकणार नाही! जालियनवाला बाग इथं सोडलेल्या एकेका रक्ताच्या थेंबातून तरुण पिढीला असा काही आवेश आला की पहाता पहाता शेकडो-हजारो हुतात्मे उभे टाकले आणि इंग्रजांना हिंदुस्थान सोडून जावं लागलं!

ज्या दिवशी पिंपळगाव बसवंत येथे शेतकऱ्यांच्या दोन तरुण मुलांचा गोळ्या घालून जीव घेण्यात आला, काल श्रीगोंद्याला नाना चौधरीचं रक्त सांडण्यात आलं तेव्हाच निश्चित झालं की आता शेतकऱ्यावरचा अन्याय जास्त काळ चालू शकणार नाही!

हा अन्याय केव्हा संपेल हे आता सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे! दोन महिन्यात, चार महिन्यात किंवा वर्षानंतर! – पण अन्याय संपणार हे निश्चित! पक्षीय राजकारणाने अन्याय बरबटलेल्या 'पुढाऱ्यां' पासून मात्र आपण सावध राहिलं पाहिजे!

"इथला एक तानाजी मालुसरा आज गेला; पण उद्या आपल्या-तूनच शेकडो तानाजी मालुसरे तयार होणार! ही लढाई चालू रहाणार! ह्या लढाईचा शेवट ठरलेला आहे. आपल्या धर्मात सांगितल्याप्रमाणे ज्या दिवशी सत्याचा विजय होईल, न्यायाचा विजय होईल त्याच दिवशी ही लढाई संपेल!"

¤

हुतात्मा नाना चौधरींना श्रद्धांजली अर्पण करून सभेचा शेवट झाला आणि मध्यरात्रीनंतर आम्ही मढेवडगाव सोडलं व पुण्याचा रस्ता पकडला.

¤

– गाडी तुफान वेगानं पुण्याचं अंतर काटत होती. शेतकरी आंदो-लनाचं पुढील स्वरूप काय असेल ह्याबद्दल मी मनाशी वेगवेगळे अंदाज बांधत नकळत स्वतःशीच गुणगुणत होतो.

**कोटी कोटी आता उठू दे किसान**
**निर्भयपणे आपुली उंच करुनि मान**
**मुक्तकंठे गाओ स्वातंत्र्याचे गान**
**मुक्त करू आता आपुले सारे क्लेष**
**येथुन तेथुन सारा पेटू दे देश**
**येवो आता तुम्हा थोडा तरी त्वेष.**

त्या गुणगुणण्याला चाल अशी नव्हतीच. ताल आणि लय असण्याची तर शक्यताच नव्हती. केवळ शब्दार्थानं भारावूनच मी गुणगुणत होतो. माझी गानसमाधी भंग करत- काहीशा थट्टेच्या सुरात शरद जोशी म्हणाले-

तुम्हाला स्वरज्ञान असावं; पण गळा साथ देत नाही... साने गुरुजींची ही कविता फक्त एकाच गळ्यात स्वरबद्ध होऊ शकते-लता मंगेशकरांच्या. जवानांच्यासाठी त्यांनी 'ऐ मेरे वतन के लोगो' हे गीत अजरामर केलं आता किसानांच्यासाठी त्यांनी ही कविता गाऊन अजरामर करावी अशी माझी इच्छा आहे. ¤

(क्रमशः)

## फिनिक्स निवड

# Breakthroughs

Astonishing advance in you lifetime in Medicine, Science and Technology

By Charles Panali.

भारतीय व इतर देशाच्या इग्रजी नियतकालिकात पुष्कळ वेळा विज्ञानात नवेनवे शोध लागतात असे आपण वाचतो. सुरुवातीस आपल्यासारख्या सामान्य माणसाचे आयुष्य आता थोडे सुखकर होईल असे वाटते; पण आपल्या आयुष्यात तसा फारसा काही फरक पडत नाही. बरीच वर्षे निघून जातात. कधी तरी स्मरणशक्तीच्या साखळीने आपल्याला त्या शोधाविषयी वाचलेले आठवते. मग आपण डॉक्टराच्या कानावर तो विषय घालतो व त्याविषयी चौकशी करतो, 'हे सर्व अजून पाश्चात्य देशातच उपलब्ध आहे. आपल्याकडे येण्यास अजून उशीर लागेल.' असे आपल्याला उत्तर मिळते.

आमच्या फिनिक्समध्ये काही डॉक्टरमंडळी आहेत. वरील पुस्तक वाचून माझे कुतूहल जागृत झाले व टेक्नॉलजी ट्रान्स्फरला किती काळ लागतो अशी त्याच्यापाशी सहज चौकशी केली. 'तीन ते वीस वर्षे' अशी वेगवेगळया डॉक्टरांनी उत्तरे दिली. आपण मग एकदम हिरमुसतो व हे शोध फक्त कागदावरच घडतात काय अशी आपल्याला शंका वाटते व एक दीर्घ उसासा सोडून आपण ते विसरून जातो. आपण जेव्हा परत नवीन शोध लागल्याचे वाचतो ते थोडेसे साशंक होऊनच; पण याचा अर्थ असा होत नाही की शोध लागतच नाहीत. पाश्चात्य देशात एखादा शोध एकदम जुना होतो तेव्हा तो इथे येतो. पानाटीचे हे पुस्तक सामान्य माणसाचा रस जागृत होईल अशा विषयाच्या शोधावर आहे. या पुस्तकाविषयी लिहिण्याच्या आधी एका गोष्टीचा खुलासा मी करू इच्छितो दर दिवाळीनंतर माणूसमध्ये माझे सदर 'फिनिक्स निवड' परत सुरू झाले की मला थोडीशी पत्रे येतात. कधीकधी काही लोक ग्रंथालयात प्रत्यक्ष येऊन प्रतिक्रिया व्यक्त करतात. त्या पत्रांच्या अनुषंगाने हा खुलासा आहे. मी 'माणूस' मध्ये ज्या पुस्तकांविषयी लिहितो ती सर्वच पुस्तके माझ्या ग्रंथालयात असतातच असे नाही. कधी मी ते पुस्तक दुसऱ्या ग्रथालयातून वाचलेले असते. आमच्या फिनिक्सच्या मेंबर्सपैकी 'पिकतं तिथं विकत नाही' ही म्हण बाजूला सारून मला विनाशुल्क काही पुस्तके वाचायला देतात! त्याशिवाय नियतकालिकातून नवीन पुस्तकांची माहिती मी गोळा करतो. उशीरा का होईना, बहुतेक ही सर्व पुस्तके मी केव्हा ना केव्हा तरी विकत घेतो. हवे ते ग्रंथ मिळण्यासाठी बरीच पुस्तकाची दुकाने Comb करावी लागतात.

या सदराविषयी दुसरा एक मुद्दा लिहायचा म्हणजे वाचकाची प्रतिक्रिया ती वाचून पुष्कळसे मनोरंजन होते. कधीकधी 'माणूस' चा वाचक किती सुज्ञ व जाणकार आहे याचीही प्रचिती येते. काही पत्रात एखादी चूक दाखवलेली असते. या सर्व गुणदोषाचे चित्राप्न करून मला या सदराबद्दल वाचकाच्या प्रतिक्रियेचे जे चित्र मिळते ते असे— माझ्या सदरात काही वेळा विषयातर होते, इंग्रजी शब्द फार नव्या परिच्छेदांचा वापर कौशल्यपूर्ण होत नाही, लिखाण धारदार, त्रोटक व एकदम थडकणारे, विषयाची विविधता चागली, roller-coaster type of writing (काही पत्रे इंग्रजीतसुद्धा असतात) writing contains stabbing insights, व्याकरणाच्या चुका, भाषा कधी कमावलेली तर कधी बालिश, पण शैली अगदी individualistic वगैरे वगैरे; पण माझा बचाव मी असा करतो की या जगात कोणताच माणूस परिपूर्ण नसतो मग कुणाचेच लिखाण परिपूर्ण नसणार. माझे काही दोष हळूहळू कमी करण्याचा मी प्रयत्न करीन. लिखित भाषेत कितीही अवधाने ठेवली तरी कमीच पडतात. बोली भाषेत कोणतीही अवधाने ठेवली नाहीत तरी चालते. हा फरक इतक्या प्रमाणात असेल याची जाणीव मी लिहायला लागलो तेव्हापासूनच मला होऊ लागली.

परवाच्या व्हॉयेजरच्या अतराळ तील प्रवासाचे वर्णन वाचून मी तर थक्कच झालो. ते चक्क शनिभोवतालच्या वर्तुळात शिरले व एकामागून एक असे फोटो व माहिती पाठविली की, वैज्ञानिक प्रथम उड्या मारायला लागले व नतर त्याची थक्क होण्याची क्षमताच संपली! हे यान शनीभोवतालच्या कड्याभोवती गेलं तेव्हा ठरलेल्या आराखड्यापेक्षा अवघे १२ मैल इकडे तिकडे गेले होते.

परंतु हा एक ब्रेकथ्रू असा आहे की, त्यामुळे माझ्या ब्रेकफास्टमध्ये काहीच फरक पडत नाही. साखर १०–११ रु. झाली की, माझा ब्रेकफास्ट कडू वाटायला लागतो व साहजिकच विचार येतो की, या ब्रेकथ्रूजमुळेच की काय सामान्य लोकांच्या, हालात अभिवृद्धी होत आहे. संख्याशास्त्र असे सांगत आहे की, दरवर्षी अधिकाधिक लोक दारिद्र्यरेषेखाली जात आहेत. मला असं सांगायचं नाही की, श्वास रोखून धरण्यासारख्या विज्ञानाच्या प्रगतीचा माणसाला अजिबातच उपयोग होत नाही. काही लोकांना अल्प प्रमाणात जरूर फायदा होत असेल; पण हे प्रमाण व्यस्त आहे. आता आपण या पुस्तकातील काही ब्रेकथ्रूजकडे बघू.

कॅन्सरवर एक अक्षेटॉमायसिन नावाचे नवीन औषध निघाले आहे. आतापर्यंतच्या सर्व कॅन्सरप्रतिबधक औषधात हे महत्त्वाचे आहे. हे औषध कॅन्सरपेशीना २६ मिनिटं चिकटून राहते व कॅन्सरपेशीच्या रासायनिक स्ट्रक्चरचा नायनाट करते. आधीची कोणतीच औषधे इतक्या अवधीपर्यंत कॅन्सरपेशींना चिकटू शकत नव्हती. या औषधाच्या चाचण्या पेशंटसवर आता सुरू झाल्या असतील.

कॅन्सरवरचा आणखीन एक ब्रेकथ्रू म्हणज 'आण्विक फटाके.' मेरी क्युरीनी जेव्हापासून रेडियम शोधून काढले तेव्हापासून त्याचा उपयोग कॅन्सरवर उपचार म्हणून करण्यात आला आहे एक्सरे, गामारे, अर्धआण्विक आल्फा बेटाची किरणे व न्यूट्रोन्स, पण आता एक खुमासदार कणाचा उपयोग होत आहे. Pions. हे कण कॅन्सरच्या गाठीपर्यंत पोचतात व तिथे आण्विक आतषबाजी उडते. या कणामुळे इतर पेशीना अपाय होत नाही

कॅन्सरचा विषय निघाला म्हणून डॉ. मनु कोठारी व लोपा मेहता याची आठवण येते, त्यानी एक 'The Nature of Cancer'

नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्यात त्यांनी असे प्रतिपादिले आहे की, शरीराच्या पेशींनी जनुकांनी अमका एक ठरवलेला उंबरठा ओलांडला की, कॅन्सर होतो. कोणत्याही इलाजाचा त्यावर उपयोग तर होत नाहीच; पण औषधाच्या माऱ्यामुळे शरीर थकते व इतर रोगही होतात.

आपल्याला स्मृतिभ्रंश आहे ? तर आता फक्त. नाकात एक फवारा सोडायचा Vasopressin चा. या औषधाने थोडा वेळ तरी स्मृतिभ्रंश होत नाही. सरकारी नोकराला फाइल सापडत नाही ? मारा त्याच्या नाकात फवारा ! असाही एक दिवस उजाडेल !

थोड्या प्रमाणात अल्कोहोल व अॅस्पिरिन (दोन्ही बरोबर नव्हे) घेतल्याने हार्टअॅटॅक येत नाही. हा शोध तसा जुना आहे; पण अलीकडे केव्हा व किती प्रमाणात याची जास्त माहिती मिळालेली आहे.

माणूस व वनस्पती याचे हायब्रीड ? त्याच्यामुळे वनस्पतींना हातपाय येणार नाहीत; पण त्यांच्यापासून वेगवेगळी औषधे व enzymes मिळतील. अगदी अलीकडे बॅक्टेरियापासून insulin मिळायला लागले आहे तसे. माणूस व वनस्पती याच्यामधल्या हायब्रीडमध्ये वनस्पतीच जास्त असेल.

आपण अलीकडे कॉम्प्युटर, लेसर बीम वगैरेबद्दल फोटो बघतो व वाचतो; पण एखादं DNA मॉडेल पाहिलं की, आपल्याला काही वाटत नाही. 'असतील पाटीचे मणी' असे म्हणून दुर्लक्ष करतो; पण या पाटीच्या मण्यांनी वैज्ञानिक विश्वात केवढे वादळ माजवले आहे ! जगातले पहिले अणुस्फोटाचे मशरुम बघून आइनस्टाइन, ओपनहेमर का कोण ओरडून उठला होता, 'It has the brilliance of a thousand Suns.' तेवढी क्रांती या पाटीच्या मण्यांनी केली आहे. फक्त हे मणी बघून तसे विलोभनीय कुणी पुटपुटत नाही एवढच.

वार्धक्य (Senility) कशामुळे येते ? आतापर्यंत वैज्ञानिकाची अशी कल्पना होती की, मेंदूतल्या पेशी हळूहळू नाश पावल्यामुळे वार्धक्य येते. आता नवा ब्रेकथ्रू असा की, वय वाढल्यामुळे शरीरातील रक्तवाहिन्या जाड होतात. त्यामुळे मेंदूला पुरेसे पोषण—ऑक्सिजन व रक्त-मिळत नाही. त्यामुळे म्हातारपण येते. त्यालाही एक ऑपरेशन शोधून काढले आहे रक्तवाहिन्यात enema देऊन फ्लश करून टाकल्या की झाले ! त्याला Endaraterectomy म्हणतात. असे ऑपरेशन केलेले पेशंटस् अगदी तल्लख व हुशार झाले आहेत. स्वत: किल्ली ठेवलेले आजोबा आता तुम्ही किल्ली कुठे ठेवली असे विचारणार नाहीत आणि मोरारजीसारख्या तरण्याताठ्या म्हाताऱ्यांनी असे ऑपरेशन केले तर काय होईल ? ते रागायलाच लागतील !

बये, दुर्गे, यातले काहीही नको. सकाळी एक कप साखरेचा गोड चहा मिळत राहिला की आम्हा अल्पसंतुष्टाचे काम भागले !

—जे. एन्. पोंडा

---

# आठव अण्णांचा

पृष्ठ ४ वरून

उद्विग्न होत. चित्रपटांतल्या वाढत्या यशामुळे त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले आणि ते आमदार होऊन राजकारणाच्या रिंगणात उतरले, तेव्हा साहजिकच त्याच्याकडे भरपूर पैसा येत असावा, असे साऱ्यांना वाटायचे. प्रत्यक्षात जी वस्तुस्थिती होती, ती वेगळीच होती. अशा उद्विग्न मन.स्थितीतच अण्णांनी १९६३ च्या 'केसरी'च्या पाडवा अंकामध्ये 'कर्ता' नावाची गोष्ट लिहिली आणि ती प्रसिद्ध झाल्यावर अण्णांच्या साऱ्या परिवारात एक विलक्षण भडका उडाला. त्या गोष्टीसंबंधाने मी पुणे-मुंबईच्या प्रवासातच त्यांच्याशी एकदा विस्ताराने बोललो. अर्थात गोष्ट प्रसिद्ध झाल्यानंतर तेरा-चौदा वर्षांनंतर आम्ही त्यासंबंधाने बोलत असल्याने बोलण्यात खूपच तटस्थता होती. 'कर्ता' या गोष्टीमध्ये अ.म. तडवळकर नावाचा एक लेखक आपली मातुश्री, आपले भाऊ आणि आपली बहीण याना पत्रे लिहून आपल्या मनातील भावना व्यक्त करतो आहे, असे वातावरण होते. प्रत्यक्षात अण्णांनी आपल्या साऱ्या परिवारासंबंधाचे एक वास्तव चित्र त्यामध्ये उभे केले होते. आपल्या नातेवाइकांनी निर्माण केलेले नाना तऱ्हेचे उद्विग्नकारक पेचप्रसंग आणि ते निस्तरताना 'कर्ता' म्हणून आपल्या आयुष्याची झालेली परवड यांचे एक विलक्षण परवडचित्र या कथेत अगदी कमालीच्या आत्मप्रत्ययाने साकार झाले होते.

'अण्णा, ती गोष्ट तुम्ही लिहावयाला नको होती !'

'लेका, आयुष्यभर त्या गोष्टीबद्दल सगळ्यांनी माझे वाभाडे काढले, तूच एक राहिला होतास !'

'अण्णा, पण...'

'ते पणबिण काही नाही. ती गोष्ट प्रसिद्ध झाल्यानंतर अनेकांनी टोचूनटोचून हैराण केले. माझ्या काही नातेवाइकांनी तर कित्येक दिवस माझ्याशी बोलणेच टाकले होते ! त्या वेळी मलाही ती गोष्ट प्रसिद्ध करावयास नको होती, असे वाटले होते; परंतु आता इतक्या वर्षांनंतर मला आता वाटते की, जी गोष्ट होऊन गेली ती चागलीच घडली. त्या गोष्टीमुळे काही थोडा वेळ मी माझ्या गोतावळ्यापासून दुरावलो होतो; परंतु लवकरच तो दुरावा नाहीसा झाला. मला माहीत आहे की, माझे सारे नातेवाईक माझ्यावर कमालीचे प्रेम करतात. एक प्रकारची ती आंधळी भक्तीच आहे, असे म्हणेनास का ! परंतु खरे सांगू का, आता मला खूप तीव्रतेने वाटते आहे की, देशस्थ देशस्थ म्हणून आपण हा जो दुबळेपणा पोसतो आहोत, तो आमच्या पुढच्या पिढीने कमी केला पाहिजे. माझा पिंडच वेगळा असल्याने मला माझ्या आयुष्यात ते फारसे जमणार नाही, हे मला ठाऊक आहे; पण आमच्यातल्या व्यंकटेशने ती वृत्ती आत्मसात केली आहे. व्यंकटेश आमच्यामध्ये अनेक बाबतीत खूपच वेगळा आहे. कोकणस्थामध्ये जी एक एलियनेशनची वृत्ती असते, ती फक्त त्याच्यातच काय ती दिसते आणि त्याच्या लौकिक यशाचे रहस्यही त्यातच आहे !'

अर्थातच देशस्थ म्हणून घरातल्या कर्तबगार व्यक्तींना जे भोगावे लागते त्याची आम्ही दोघांनीही त्या सभाषणात खूपच उजळणी केली. कारण दोघांच्याही अनुभवात तसे खूपच साम्य होते. तसं अण्णांचे माझे दूरचे नातेही होते. काराजतगीची आमची एक आत्या अण्णांच्याही नात्यातली होती; परंतु देशस्थांच्या दुर्गुणांचा इतका

सारा पाढा वाचूनही अण्णांना आपण देशस्थ म्हणून जन्माला आल्याबद्दल आणि ज्या तऱ्हेचे आयुष्य आपल्या वाट्याला आले होते त्याबद्दल कृतार्थताही वाटत होती. त्यांच्या वृत्तीतील हा गमतीशीर अंतर्विरोध अनेक पातळयावर नेहमीच दिसून येत होता.

या वृत्तीमुळे, ज्याला आपण आपला म्हटले आहे, त्याच्याबद्दल अण्णांच्या मनात नितात जिव्हाळा असे. अशा व्यक्तीच्या हातून अण्णांच्या बाबतीत काही आगळीक घडली तर ते कमालीचे प्रक्षुब्ध होत. असा एक प्रसंग माझ्यावर आला होता.

यवतमाळच्या साहित्यसंमेलनाचे अण्णा अध्यक्ष म्हणून निवडले गेले. अण्णाच अध्यक्ष होणार हे अगोदरच आम्ही ठरविले होते. यवतमाळचे स्वागताध्यक्ष सुधाकरराव नाईक यानी तसे अगोदर स्पष्टच सागून ठेविले होते आणि 'तसेच होईल' असे आश्वासनही आम्ही त्याना दिले होते. त्यामुळे संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी जी नावे सुचवावयाची, त्यामध्ये मुबईच्या साहित्यसघाकडून त्याचे नाव सुचविण्यात आल्याचे लक्षात येताच, पुण्याच्या साहित्यपरिषदेनेही ते नाव पुन्हा सुचविण्याची गरज नाही, हे लक्षात घेऊन अण्णाचे नाव आम्ही सुचविले नव्हते.

निवडीनंतर मी हारगुच्छ घेऊन अण्णाच्या घरी गेलो, तेव्हा अण्णा घुश्श्यातच होते.

'गड्या, तू माझ्याशी गद्दारी केली आहेस. मी तुझा हार स्वीकारणार नाही!' अण्णाच्या वाक्याने मी भानावर आलो.

अण्णानी मला पुरते फैलावर घेतले. मी काही न बोलता मुकाट्याने सारे ऐकून घेतले. थोड्या वेळाने त्याचा राग शात झाल्यावर ते म्हणाले,

'राजश्री, घाला आता हार! स्वत च्याच पोराने पायावर मुतल्यानंतर पाय तोडून कसे चालेल?'

अण्णाना मी सारी परिस्थिती समजावून दिल्यानंतर ते म्हणाले, 'तू सागतोस त्याने माझे समाधान झाले; पण इतराचे काय? अण्णांचे नाव साहित्यपरिषदेने सुचविले नाही, असेच लोक म्हणणार! साहित्यपरिषदेला अण्णा नको होते, असाच अर्थ लोक घेणार की नाही? गेल्या आठवड्यात शंभर-एक लोकांनी मला हे बोलून दाखविले!'

गप्प राहण्याखेरीज दुसरा इलाज नव्हता.

अण्णांची संमेलनाध्यक्षपदी निवड झाली, तेव्हा समेलनाला जेमतेम तीन आठवड्याचा अवधी होता सगळीकडे सत्कार घेऊन आठ-दहा दिवसात अध्यक्षीय भाषण लिहिण्याची किमया अण्णाच करू जाणे! ते पुरे झाल्यावर मी तसे म्हणालो सुद्धा.

'गड्या, मनात होते ते सारे भडाभड कागदावर उतरविले. तुम्हा प्राध्यापकांना ते रुचणार नाही. माणदेशच्या गावढ्या कवीला जे वाटते ते लिहिले आहे. तुम्हाला आवडो-नावडो. मला त्याची परवा नाही!'

अण्णांचे नेहमीप्रमाणे ते उत्तम भाषण होते. नवकाव्याबद्दलच्या त्यांच्या भावना त्यात व्यक्त झाल्या होत्या आणि 'गीतकारा' संबंधी आपली भूमिकाही त्यानी तळमळीने स्पष्ट केली होती.

अण्णांच्या अनेक भेटीपैकी त्यांच्या मृत्यू-पूर्वी पंधरवडाभर अगोदर झालेली भेट माझ्या काळजावर एखाद्या दगडावरच्या रेषेप्रमाणे कोरलेली आहे. अण्णाचे ऑपरेशन झाल्यानंतर भेटलो होतो, तेव्हा 'गुडबाय मिस्टर डेथ'च्या मूडमध्ये ते होते. मृत्यू अण्णाशी हस्तादोलन करून गेला, तेव्हा आता काही काळ त्याची भीती नाही. वॉर अँड पीसप्रमाणे बेचाळीसची पार्श्वभूमी घेऊन टिळकानतरच्या महाराष्ट्राचे चित्र आपल्या आत्मचरित्राच्या माध्यमातून एक मोठी कादंबरी लिहिण्याचे त्याच्या मनात होते. त्या मन.स्थितीतच ते म्हणाले,

'मी कोण आहे, असे तुला वाटते?'

मला त्याच्या प्रश्नाचा रोख कळेना. तेव्हा ते म्हणाले,

'सध्या मी भगवान एकलिंगजी आहे, बरं का?'

'म्हणजे?'

'ऑपरेशनने एक लग काढून टाकल्यामुळे सध्या मी 'एकलगजी' झालो आहे!' अण्णा हसत म्हणाले. हसता हसता ते एकदम गंभीर होऊन म्हणाले.

'भीमराव, रवीद्रनाथाना त्याच्या कवितेने नोबेल पारितोषिक मिळाले. तसे माझ्या गीतरामायणाबद्दल का मिळू नये?'

'अण्णा, रवीद्रनाथांना मिळाली नाही, इतकी लोकप्रियता तुम्हाला गीतरामायणाने मिळाली आहे. ती नोबेल-पारितोषिकापेक्षा मोठी नाही काय?'

'हे बघ, उगीचच नेहमीप्रमाणे शेंड्या लावू नकोस तुझे खरे मत सांग!'

मग मी त्याना लडनमध्ये रवीद्रनाथाना डब्ल्यू बी यीट्स्सारखा एक मोठा इंग्रजी कवी खंदा पुरस्कर्ता भेटला. त्याने इझ्रा पाउंडस्, ब्रॅडले, स्टाफर्ड ब्रुक यासारखी खदी मंडळी रवीद्रनाथाभोवती कशी उभी केली. याची हकीकत सागितली. तेव्हा ते अंतर्मुख होऊन म्हणाले,

'आम्हा मरगठ्ठयाना चागले इग्रजी येत नाही, इथेच आमचे सारे घोडे पेड खाते!'

त्यानतर महिन्याभरानेच अण्णाची शेवटची भेट झाली! दुर्गाबाई भागवतानी साहित्य-संमेलनामध्ये अण्णांची हंसमधल्या दिवाळी अकात प्रसिद्ध झालेल्या 'नागडे नातवंड' या कवितेस उद्देशून 'नवे राज्यकर्ते आले त्याचे काहीना दुःख होते' असे म्हटले होते, त्याच वेळी अण्णानी कपाळाला हात लावला होता!

अण्णांच्या या शेवटच्या भेटीत त्या कवितेचा मी विषय काढला, तेव्हा अण्णा थोड्याशा उद्वेगानेच म्हणाले,

'जाऊ दे रे, आता तुझ्या वाङ्मयीन गप्पा नकोत. आता मी फार दिवस जगणार नाही!'

'अण्णा, असे अभद्र बोलू नका!'

'आता अभद्र-बिभद्र काही राहिले नाही. आता जगण्याची इच्छाच मावळली आहे, नजरेसमोर आशेचा म्हणून किरण दिसत नाही. खूप लिहिण्याची इच्छा मनी बाळगली होती, ती सारी पुढच्या जन्मी पुरी होऊ द्या! मी तुझ्यावर काही वेळा रागावलो, बोललो हे मला सारे आठवतंय. वास्तविक माझा तसा अधिकार होता! गड्या, मला क्षमा कर! फक्त शेवटची एकच इच्छा आहे. अण्णाने जे काही लिहिले ते नितात श्रद्धेने, भक्तिभावाने, लोकाच्या भावना उन्नत, उदात्त करणारेच मी लिहिले. मी मागं एका गोष्टीत लिहिल्यामुळे माझी कचकड्यावरची कारागिरी जळून साफ होईल. मागं काही उरणार नाही; परंतु मी नदादीपाप्रमाणे तेवणारी जी कविता लिहिली आहे. ती युगानुयुगे उजळत राहील, गड्यानो, गीतकार म्हणून अशा वेळी माझ्याकडे उपेक्षेने पाहू नका!' □

रंगभूमी

# सत्तरीतली जर्मन रंगभूमी

आपल्या बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात किती तरी छान छान गोष्टी असतात; पण ते जाऊन बघण्याचे कष्ट कोणीही घेत नाही

आता हेच पहा ना ! कलकत्त्याच्या मॅक्समुल्लर भवननिर्मित व अरूपदत्त संयोजित एक छायाचित्रप्रदर्शन या कलादालनात भरले होते. प्रदर्शनाचा विषय होता 'सत्तरीतली जर्मन रंगभूमी !'

अं हं ! ही सत्तरीतली रंगभूमी म्हणजे वृद्ध अट्टाहासाने अमृत किंवा शताब्दी महोत्सवाकडे खेचत नेलेली रंगभूमी नाही, तर अत्यंत उत्साहाने रसरसणारी, चैतन्यमयी अशी ही रंगभूमी आहे. १९७० ते १९७९ हे दशक मांडणे, हा या प्रदर्शनाचा हेतू. जर्मन रंगभूमीच्या विकासाचा इतिहास किंवा आलेख वगैरे नाही.

प. जर्मनीसारख्या अत्यंत पुढारलेल्या आणि श्रीमंत राष्ट्राची नाटकामधील प्रगती-विशेषत: गेल्या दशकातील-चित्ररूपाने माडण्याचा हा प्रयत्न चांगला असला तरी अपुरा वाटतो एवढेच.

रंगभूमीचा विकास होण्याकरता सर्वसामान्य जनतेचा आणि विविध पातळयावर सरकारचा किती सहभाग लागतो ते प. जर्मनीकडे पाहिल्यावर कळते. मोठ्या गावात 'स्टेट थिएटर्स' आहेत तर लहान गावात 'म्युनिसिपल थिएटर्स' आहेत. या थिएटर्सच्या खर्चाचा प्रमुख वाटा सरकार किंवा स्थानिक स्वराज्यसंस्था उचलते.

अर्थात प्रेक्षकाचा उदड प्रतिसाद आणि नटमंडळीची व इतर नाटकवाल्याची जीव ओतून काम करण्याची तयारी हवीच.

एकेका लेखकाच्या काही कलाकृतीचे मिळून हजारो प्रयोग (किंवा Per formances) होत असतात. एखाद्या लेखकाचे २००–३०० प्रयोग म्हणजे तसा तो नगण्यच

आणि आश्चर्य म्हणजे हजारांच्यावर प्रयोग करणाऱ्यांमध्ये एकही सद्यःकालीन जर्मन लेखक नाही, तर सगळे जुनेच ! आणि यात सततचा पहिला नंबर पटकावून बसलाय 'शेक्सपियर' त्याच्या मागोमाग गोएथ (हं, आपला गटे हो– शाकुतल डोक्यावर घेऊन नाचणारा.) आणि बर्टोल्ट ब्रेख्त याचे क्रमांक येतात आणि मग आपल्याला माहीत असलेल्यांपैकी मोलिएर हा फ्रेंच लेखकही हजार-बाराशे प्रयोग करत असतो. सॅम्युएल बेकेट व 'शॉ'सुद्धा तीन-चारशे प्रयोगातून उभे आहेत.

हे जुने नाटककार पुढे आहेत म्हणून आपल्या येथील पुराणमताभिमान्यांनी खूष होऊ नये. कारण या सर्व नाटकांचे नुसतेच 'खूप' प्रयोग होत नाहीत, तर त्या जुन्या नाटकाचे त्यातल्या 'थीम' चे प्रत्येक दिग्दर्शक आपल्या पद्धतीनुसार, प्रतिभेनुसार वेगळा अर्थ लावत असतो. मूळ गाभ्याचा आविष्कार वेगळ्या तऱ्हेने प्रेक्षकापर्यंत पोचवू पाहतो आणि त्या नाटकाची आजच्या समाजजीवनाशी आजच्या समाजाच्या मनोवस्थेशी (Mentality) सांगड घालण्याचा प्रयत्न करीत असतो. या प्रयत्नात मग 'हॅम्लेट' मध्ये ब्लू-जीन्स व स्वेटर घातलेला शिपाई येतो, तर इ. स. पूर्वीच्या अँटीगनी व युरीपीडचे एक नाटक, या नाटकातील पात्रे मळके सूट, हॉस्पिटलमधील चाकाच्या गाड्या वगैरे वापरतात. लोकही शांतपणे ते बघतात, समजून घेण्याचा प्रयत्न करतात. ('काय सागू देवा, आमच्या काळी नटाचे काय पोषाख असत ! खरे शालू आणि खरे दागिने बरं !' असले उमाळे जुन्या–पुराण्या प्रेक्षकांना येत नसावेत !)

जुन्या नाटकाचे पुनर्मूल्यांकन (Reinterpretation) सोडले तर नवीन नाटकेही खूपच येतात. (दरवर्षी सुमारे २५ नवी नाटके, ऑपेरा, बॅलेसह बाहेर पडतात) आणि विषयसुद्धा खूपच वेगवेगळे. दोन्ही महायुद्धाच्या वेळची जर्मनी. हा विषय अजूनही तिथे लोकप्रिय आहे हे बघून आश्चर्य वाटले. एक नाटक तर चक्क 'डॉक्युमेंटरी ड्रामा' होते. आता बोला !) पण सर्वसाधारणपणे भर दिसला तो व्यक्ती आणि समाज याचे परस्पर सबध, व्यक्तिगत ताणतणाव, स्त्री–पुरुष याचे नाते, लैंगिकतेचा सार्वत्रिक प्रभाव व त्यातील गुतागुत यासारख्या खरोखरच 'अवघड' विषयांवर.

आपण ज्यांना बऱ्यापैकी ओळखतो असे लिओ टॉलस्टॉय, मॅक्सिम गॉर्की, इब्सेन सॅम्युएल बेकेट ही सर्व मंडळी असे वेगवेगळे विषय घेऊन अजूनही वावरताना दिसतात. ब्रेख्तच्या एका नाटकाचे 'इन द जंगल ऑफ सिरीज' हे नाव वाचल्यावर सत्यजित रेंचा 'जनआरण्य' आठवला. (साम्य कितपत आहे किंवा नाही याची काही कल्पना नाही.) 'होल्डलिन' या १८ व्या शतकातील जर्मन आहे कवीवरचे नाटकही येथे दिसते.

असे खूप वेगळे वेगळे विषय, पण आपण थक्क होतो ते त्याचे भव्य स्टेज व त्यावरील नेपथ्य आणि प्रकाशयोजना पाहून ! तो प्रकार अक्षरश: प्रचड आहे. उदाहरणादाखल वर उल्लेखिलेल्या 'होल्डरलिन' हे जर्मन कवीच्या जीवनावरील नाटक. त्यातले बंगल्यातले सीन्स किंवा गार्डनपार्टीचे सीन्स रंगमचावर कसे दाखवू शकले हा एक प्रश्नच आहे. Peer Gynt मधील स्फिंक्सचे दृश्य असेच भव्य. लाइटसुद्धा असेच परिणामकारक. ते फोटोसुद्धा असे सुरेख काढलेत की प्रत्यक्ष सीन किती जिवंत (खास समीक्षकी शब्द–प्रत्ययकारी) असेल याची कल्पना येते. जाता जाता एक नमूद करायला हवे, हे फोटो असे काढले आहेत की दृश्य स्टेजवरचे आहे की सिनेमातील याचा संभ्रम पडतो.

रंगभूषा, नेपथ्य आणि वेशभूषा ही प्रत्येक दिग्दर्शकाच्या प्रतिभेनुसार बदलते. हॅम्लेटमध्ये 'राणी' चक्क वक्षस्थळे अनावृत ठेवून स्टेजवर वावरते. (अब्रह्मण्यम् ?) वेश्या व लैंगिकता हा विषय ऑपेरामधून साकार होतो. (आणि अशा या जर्मनीत घाशीराम कोतवाल गेले म्हणून आपली संस्कृती बोबलते ! नवलच आहे.)

ते असो. या प्रदर्शनाच्या विषयावर बरेच काही लिहिता येण्यासारखे असले, तरी ते वाचन कळणारे नाही. बघायलाच पाहिजे ! यासारख्या अनेक विषयामधले आपल्याला कळत नसते, ते अशी प्रदर्शने बघूनच हळूहळू कळते. दोन देशाच्या रगभूमीवरील आविष्कारात काय फरक आहे ते कळू लागते. जर्मन नाटकातल्या मॉबसीनपुढे आपले गाजलेले मॉबसीन्स 'छोटे' वाटू लागतात, तर कलकत्त्यामध्ये अँटीगनी या

या नाटकाचा प्रयोग एक भव्य तंबू उभारून व जमिनीचेच स्टेज करून (एंट्री-एक्झिट चक्क भुयारी.) झाला होता ही नवीन माहिती कळते.

निदान वेगळी माहिती सहजगत्या मिळवण्यासाठी तरी यासारख्या प्रदर्शनाना आवर्जून भेट दिलीच पाहिजे !

—निखिल गजेंद्रगडकर

# क्रांती

## एक सरस प्रयोग

चित्रपटाच्या तुलनेत मराठी नाटके नेहमीच प्रयोगशील राहिलेली आहेत. ही प्रयोगशीलता आविष्करणाच्या पातळीवरच राहिलेली नाही तर आशयाबाबतही ती अधिक जागरूक आणि जागृत राहिलेली आहे, चित्रपटानी जरी स्वप्नरंजनावरच भर दिला तरी नाटके मात्र सामाजिक आशयाबाबत विशेष लक्ष देताना दिसतात. हे प्रयत्न अल्प असले तरी लक्षणीय आहेत खास.

'ड्रॉपर्स' या नाट्यसंस्थेने सादर केलेले 'क्रांती' हे दोन अंकी नाटक या सामाजिक राजकीय घटनांशी संबंध सांगणारे आहे म्हणून ते विशेष आहे. ड्रॉपर्सने केलेले आजवरचे प्रयोग वेगळी वाट चोखळताना दिसतात. नाटक या माध्यमाबद्दल काही वेगळा विचार करता येणे शक्य आहे का याचा अभ्यास ड्रॉपर्सवाले करीत असतात. या विचाराचे प्रयोगात रूपांतरही ते प्रयत्नपूर्वक करतात. क्रांतीमध्ये हा प्रयत्न जाणवतो.

क्रांती हे नाटक जॉर्ज ऑरवेल या जग-प्रसिद्ध कादंबरीकाराच्या ॲनिमल फार्म या कादंबरीवरून तयार केलेले आहे. हे रूपांतराचे काम व्यावसायिक रंगभूमीवरील नावाजलेले नाटककार श्री मधुकर तोरडमल यांनी केलं आहे. प्राण्यांच्या जगातील क्रांती ही शेवटी मानवाच्या क्रांतीएवढीच फसवी असते याच प्रत्ययकारी दर्शन या नाटकातून होतं.

या नाटकाच्या लेखनापेक्षाही त्याचा प्रयोग अधिक सरस होतो. दिग्दर्शक श्री. सुधीर मुगी यांनी दिग्दर्शनात प्राण्यांच्या जगातील बरेच संदर्भ चित्रीकृत केले आहेत आणि ते करत असताना या समूहनाटकातील कलाकाराचा तोलही साभाळला आहे. नाटकाचे कथानक एका शेतावर घडते.मानवाविरुद्ध लढा देऊन स्वतंत्रपणे पशुशाहीची स्थापना करण्याचे स्वप्न एका वृद्ध डुकराच्या मनात असते आणि हे स्वप्न ऐकन सर्वच प्राणिमात्र भारावून जातात. त्या दृष्टीने कार्यवाहीला लागतात माणूस ही जात नष्ट करण्याच्या प्रयत्नात या प्राण्याचे अनेक प्लॅन्स तयार होतात आणि माणूस नष्ट झाल्यावर काय फक्त प्राण्यांचंच राज्य या कविकल्पनेत ते जगू लागतात.

माणूसजातीचा पाडाव झाल्यावर वृद्ध डुकराच्या मनातील आदर्श पशुशाही स्थापन करण्यासाठी सारे प्राणी एकत्र जमतात आणि इथं नाटकाला खरी सुरुवात होते.

ही पशुशाही आदर्श करण्यासाठी नेतेपदावरूनच सोटाजी आणि गब्रू या डुकराच्यामध्ये संघर्षाची ठिणगी पडते.

या दोघामधील तणाव इतका वाढतो की एक जण दिवस म्हणाला की दुसरा रात्र म्हणालाच ! दोघामधून विस्तव जाऊ शकेना. यामुळे इतर प्राण्याची मात्र होरपळ होते. गब्रू पवनचक्की आणून प्राण्याचे कष्ट कमी करण्याच्या प्रयत्नात तर सोटाजी ती चक्की गब्रूच्या नेतृत्वाखाली उभी राहू नये या प्रयत्नात. गब्रूला या पशुशाहीतून हाकलून काढण्यासाठी सोटाजी कुत्र्याचे सैन्य आणतो. असेच त्याच्या विरुद्ध जाणाऱ्याची हकालपट्टी होते इतर प्राणी मात्र घाबरेघुबरे होतात. सोटाजी पशुशाहीत हुकुमशाहीची स्थापना करतात आणि वृद्ध डुकराच्या स्वप्नाचा भंग करतात. या स्वप्नात गढून गेलेल्या इतर प्राण्याचे हाल मात्र 'कुत्रा' खात नाही अशी परिस्थिती निर्माण होते. पवनचक्कीचे झालेले बांधकाम कोसळते आणि मग सोटाजी ही पवनचक्की पुन्हा मानवाच्याच साह्याने उभी करण्याऱ्या प्रयत्नात राहतो. ज्याच्या विरुद्ध लढा त्याच्याशीच सधान बांधण्याचा हा प्रयत्न पशुशाहीला मारक ठरतो, याच भान सर्वच पशूना असूनही या एकाधिकारशाहीला ते बळी पडतात.

'सर्वच प्राणी समान असतात; पण काही अधिक समान असतात' या तत्त्वावर चाललेली ही सोटाजीची हुकुमशाही . पशुशाहीला खड्डयात घालणारी ठरते. या नाटकात लेखकाने हुकुमशाहीचा उपहासात्मक आविष्कार केला आहे. हे खरे असले तरी नाटकातील भारतीय संदर्भ मात्र खटकतात. 'कठोर परिश्रमास पर्याय नाही' यासारखी वाक्ये मूळ संदर्भांना सोडणारी वाटतात. असे असले तरी नाटकाचा प्रयोग मात्र सफाईने सादर केला जातो, त्यामुळे लेखनातील काही त्रुटी खपूनही जातात.

प्रयोगाचे वैशिष्टय म्हणजे उत्तम टीमवर्क. भूमिकांना योग्य कलाकार मिळाल्यामुळे प्रयोगाला योग्य तो न्याय मिळतो दिग्दर्शक सुधीर मुगी यांनी प्रयोग देखणा केला आहे. सर्वच कलाकारानी योग्य ते बेअरिंग साभाळून त्याला साथच दिली. वेशभूषेचाही यात महत्त्वाचा वाटा आहे.

प्राण्याच्या सर्व हालचाली, लकबी, आवाज याबाबत कलाकारांनी खूपच परिश्रम घेतल्याचे जाणवले. त्यामुळे त्यांच्या डोक्यावर असलेल्या सूचक टोपांची गरजही उरली नाही.

गोपाळ उदास, सुधीर मुगी, प्रभाकर वाडेकर, बाबा कुलकर्णी, सुनेत्रा मिरासदार, कविता भागवत, पौर्णिमा गानू या सर्वांनीच भूमिका चांगल्या वठवल्या. प्रयोगाची तांत्रिक बाजू कुशलपणे हाताळण्यात बाळ मोघे, मोहन क्षीरसागर, दिलीप कोल्हटकर, अनंत कुलकर्णी याचा महत्त्वाचा वाटा होता.

—मुकुंद संगोराम


आवृत्ती संपत आली....

जनांचा
प्रवाहो
चालिला

लेखक : विनय हर्डीकर
मूल्य : वीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मराठी चित्रपट । सदानंद बोरसे

# सावज

## प्रेक्षकरूपी सावजाची निर्दय पारध

काही दिवसांपूर्वीच ' वंदिश ' नावाचा चित्रपट बघून बदलापूरच्या मेडिकल कॉलेजचा मी शोध घ्यायला लागलो होतो; पण निर्मांते कुमार पंजाबी आणि दिग्दर्शक अनंत माने या दोघांनी मला आणखी मूर्खात काढले. त्या कॉलेजच्या वरताण असे एक कॉलेज आणि तेही पुण्यातच असावे आणि ते मला माहीत असू नये, म्हणजे height of height होती. ' सावज ' चित्रपटात दाखविलेले हे पुणेरी कॉलेज कोणते ? काय ? एवढे पण नाही ओळखता येत ? अहो ऽ, जाऊ दे, मला पण नाही ओळखता आले !

तर तात्पर्य काय की, ' सावज ' नामे एक मराठी चित्रपट पुण्यात प्रदर्शित झाला आणि तो पाहण्याचे दुर्भाग्य मज अभाग्याच्या भाळी लिहिले गेले.

चित्रपट सुरू होतो एका शाळेत. जाई दादासाहेब पाटील नावाची एक मुलगी एस. एम. सी. परीक्षेत एक्क्याऐंशी टक्के मार्क मिळवून तालुक्यात पहिली आल्याबद्दल जगताप नावाचे मास्तर तिचे कौतुक करतात. मग जाई घरी जाते आणि पुढे बराच वेळ ती, तिचे वडील दादासाहेब पाटील आणि लहान बहीण कमल यांचे एकमेकांना आग्रह करीत पेढे खाणे आणि मधून मधून रडत जाईच्या मेलेल्या आईची आठवण काढणे चालते. तेवढ्यात दादासाहेब म्हणतात, ' जाई, ती बघ तुझी मावशी आली ! ' आणि मग जाईची मावशी दारात अवतरते. तेवढ्यात ते पहिल्या शॉटमध्ये दिसलेले जगताप मास्तर आपल्या दीक्षित नावाच्या सहकाऱ्याला बरोबर घेऊन जाईच्या घरी येतात आणि दादासाहेबांना सांगतात, ' दादासाहेब, तुमची जाई एकूणऐंशी टक्के मार्क मिळवून पहिली आली ! ' दोन मिनिटांत जाईचे दोन टक्के कमी कसे झाले, याचा विचार मी करीत असता चित्रपटात बऱ्याच नंतर माझ्या लक्षात आले की, जाईच्या पुढे होणाऱ्या अधोगतीचे प्रतीक म्हणून जणू जगताप मास्तरांच्या मुखाने नियतीच वदली— असे काहीसे



त्या संवादातून दिग्दर्शकाला अभिप्रेत होते. (डोळे दिपविणाऱ्या दिग्दर्शकी प्रतिभेचे हे तारे माझ्यापुढे अजून दिवसाउजेडीसुद्धा चमकतात.) असो, तर मग पुढे जाईला पुण्याला कॉलेजात पाठवायचे आणि पहिल्यांदा डॉक्टर आणि मग एम. एस. करायचे ठरते. त्याप्रमाणे जाई पुण्याला एका नामवंत (?) कॉलेजात दाखल होते. तिची होस्टेलमधील रूम-पार्टनर प्रेमा नामक एक 'चालू' मुलगी म्हणजे ती 'आयला' वगैरे म्हणते कॉलेजला दांड्या-बिड्या मारते, ड्रिंक्स घेते, 'बाई ग' च्या ऐवजी 'बाय जोव्ह, माय गॉड' वगैरे म्हणण्याचा जाईला उपदेश करीत 'you won't enjoy, you loose the great joy' असे तद्दन रद्दड, भिकार आणि 'ट' दर्जाचे इंग्रजी बोलत स्टायली मारते. तिचे म्हणे शेखर नावाच्या एका गृहस्थावर प्रेम असते. तिच्याच भाषेत शेखर तिचा बॉयफ्रेंड. जाईची तिच्यामुळेच शेखरशी ओळख होते. शेखर आणि जाईचेच लफडे जुळल्याचे पाहून प्रेमा भडकते. (खरे म्हणजे शेखरबरोबर जाईला मध्ये बसवून तिघांनी मोटारसायकलवरून फिरणे, दोघींनी मिळून शेखरला आइस्क्रीम भरवणे अशा आधीच्या प्रसंगांमध्ये थडगार असलेला हा मत्सराचा निखारा अचानक कसा काय फुलतो, ते प्रेमाच जाणे.) शेखरच्या नादाने जाई भराभर कॉकटेल घेण्यापर्यंत मजल मारते. (तरीही मनाने भारतीय पतिव्रताच असल्याने जाई अखेरपर्यंत शेखरसाठी 'तुम्ही' हे आदरार्थी बहुवचनी सर्वनामच वापरते) पुढे जाईचे 'कर्तृत्व' दादासाहेबांना कळल्याने ते तिचे कुलदीप नामक तरुणाशी लग्न ठरवतात. लग्नाच्या आदल्या रात्री जाई शेखरबरोबर पळून जाते. कुलदीपचे लग्न कमलाशी होते; पण दाखवलेली मुलगी आणि प्रत्यक्षात उभी केलेली मुलगी वेगळी असल्याने कुलदीप भडकतो. ह्या वक्री झालेल्या दहाव्या ग्रहाची शांती करण्यासाठी दादासाहेब सर्व मालमत्ता त्याच्या ताब्यात देतात. तर हे कुलदीपसाहेबही दिवटे निघतात. ते दारू अधिक तमासगिरीण अशा विधायक उपक्रमांवर घडघडा पैसा उडवतात. दरम्यान पैशासाठी शेखरने जाईला धंद्याला लावलेले असते. एक दिवस कुलदीपजी जाईकडे येतात आणि तिच्याकडेच मुक्काम ठोकतात. त्यांच्या शोधात आलेल्या कमलाची आणि जाईची भेट झाल्यानंतर सर्व घोळ निस्तरला जाऊन जाईबाई शेखरच्या डोक्यात दारूची बाटली फोडून त्याचा खून करतात आणि स्वत:ला कायद्याच्या स्वाधीन करतात.

अशी ही अनंत मान्याची कथा. पटकथा त्यांनीच रचली आहे. कथेतील काही गमती आधी सांगितल्याच. चित्रपटातील या आणखी काही गमती—जाई मॅट्रिकला एक्क्याऐंशी टक्के मार्क मिळवून पास झालेली; पण 'आंटी' हा शब्द अथवा 'माय गॉड' सारखे शब्दसमूह तिला माहीत नसतात. मॅट्रिकला इंग्रजी घेतले नव्हते म्हणावे तर पुण्याच्या कॉलेजात मेडिकलला जाण्यासाठी म्हणजे शास्त्रशाखेत तिने प्रवेश घेतला आहे आता हे कसे जुळावे? तर तीच गंमत आहे. शेखर जाई व प्रेमा बागेत फिरायला गेले असताना शेखर 'या नजरेचे बाण रोखुनी हृदयावरती नेम धरू, प्रेमावरती प्रेम करू' या एकाच गाण्याकरता पोषाख बदलून येतो; तो का व कसा? दोन्ही प्रश्नांचे उत्तर एकच—तीच तर गंमत आहे. शास्त्रशाखेच्या वर्गात मोजून बारा-चौदा बाक आणि तीस-पस्तीस टाळकी असलेले पुण्यातील कॉलेज हा संशोधनाचा विषय ठरावा. चित्रपटाच्या मध्यंतरानंतरचा निम्मा वेळ तर जुगार आणि निरनिराळ्या चमत्कारिक चेहऱ्यांनी नोटा मोजणारा शेखर या दोनच गोष्टींनी भरलेला आहे. जाईचे दारू पिणे व झिंगत झिंगत होस्टेलवर परतणे, शेखरने जाईचे दागिने मोडणे आणि मग आलेले पैसे दारू व जुगारात उडवणे या प्रकारांची पुनरावृत्ती बघून तर मला जांभया द्यायचा सुद्धा कंटाळा आला!

संपूर्ण चित्रपटात एकूण सूत्र पाहिले, तर शहरातील कॉलेजच्या वातावरणात—विशेषत: मुलींच्या वसतिगृहात—राहून भोळ्याभाबड्या मुली बिघडतात आणि अखेर एखाद्या नरपशूचे सावज बनतात. आता पुण्यासारख्या एखाद्या ठिकाणच्या कोणत्याही कॉलेजचे उदाहरण घेऊन ह्या सूत्रातील पोकळपणा सहज सिद्ध करता येईल; पण इतके कष्ट घेण्याइतपत चित्रपटाचा दर्जा वर चढणार नाही, याची नीट काळजी दिग्दर्शकासकट सगळ्यांनी घेतल्यामुळे ती तसदी घेण्याचे कारण नाही.

जाईची मध्यवर्ती भूमिका रंजनाने केली आहे. बरेचदा तिची पडद्यावरील अनुपस्थितीच सुसह्य होते. दिसण्यातील देखणेपण आपल्या अभिनयातील कमतरतेला भरून काढते, असा कुलदीप झालेल्या रवींद्र महाजनीचा गैरसमज झालेला असावा. अशोक सराफने शेखरची भूमिका चांगली केली. विशेषत: आधी उल्लेखलेले पुन्हा पुन्हा येणारे प्रसंगही वेगवेगळ्या प्रकारे पेश करून त्यात विविधता आणण्याचा त्याने प्रयत्न केला; पण बहुतेक वेळी विशेषत: जाईशी प्रेमालाप करताना सेकदा-सेकंदाला चेहऱ्यावर खलनायकी भाव आणून आपला दुष्टपणा वारवार सिद्ध करण्याची त्याची धडपड कृत्रिम होती. संपूर्ण चित्रपटात आपापल्या व्यक्तिरेखा नीट समजून घेऊन आणि त्यांचा तोल साभाळून काम केलेले दोनच कलाकार. एक—कमलची भूमिका केलेली उषा नाईक आणि दोन—दादासाहेब पाटलाचे काम केलेले गोविंद कुलकर्णी.

सावजचे गीतकार जगदीश खेबुडकर आणि संगीतकार राम कदम. 'भग्न जाहली स्वप्ने सारी उजाड झाली बाग। जीवन सारे मृगजळ ठरले यौवन ठरली आग। आगीत भावनांचा फुलवरा जळाला। डोळ्यास आसवाचा आहेर हा मिळाला॥' हे गीत शब्द, सूर आणि दृश्य या तिन्ही बाबतीत सरस उतरले आहे. एका टोकाला असे सुंदर गीत देऊन आणि दुसऱ्या टोकाला 'झिंग चॅक झिंग चॅक कमॉन कमॉन। हॅलो हॅलो हॅलो यग चॅप कमॉन कमॉन।' असे अत्यंतिक निरर्थक आणि टुकार गीत पाहून बाकी तीन गीतांनी मधली जागा भरून काढली आहे. गाण्यामध्ये अर्थातच एक कॅब्रे, एक मुजरा नाच, एक लावणी, दोन उद्यानगीते आणि एक शोकगीत असे सगळ्यांचे समप्रमाणात वाटप आहे.

हल्ली बहुतेक मराठी चित्रपट रंगीतच असतात. त्यामुळे 'सावज'च्या कृष्णधवलतेचा सराव व्हायला थोडा वेळच लागला.

प्रेक्षकाचे सावज बनवून त्याची निर्दय पारध करणाऱ्या चित्रपटांच्या माळेतील हा आणखी एक मणी. □